बुलढाणा | बुधवार । २ जुलै २०२५ । वर्ष-२ । अंक-३२० । पृष्ठे-१२ । किंमत-५ रु. | RNI : MAHMAR/2023/89148 | DAINIK MAHABHOOMI | बुलढाणा । छत्रपती संभाजीनगर । जालना । अकोला । वाशिम

PRAGYAN CIVIL SERVICES ACADEMY, BULDHANA
●MPSC / Integrated Batch
●सरळसेवा भरती TCS / IBPS पॅटर्न नुसार
आम्ही देतो तुमच्या स्वप्नांना आकार...!
● स्पेशल पोलीस व वनविभाग भरती ग्राऊंडसह शिकवणी
●ELIMINATION METHOD तसेच SHORT TRICKS सह...संपूर्ण बॅच...
वेळ - स.8.00 ते 12.00 सायं.-5.00 ते 8.00
संपर्क :- प्रा. ज्ञानेश्वर बावणे 9890759270/8788719604
पत्ता - दिव्य विवेकानंद बिल्डिंग,भारत शाळेजवळ, बुलढाणा

दैनिक
# महाभूमि
निर्मळ, निकोप, नि:पक्ष

स्व.सुशिलाबाई जैस्वाल ग्रुप ऑफ इंन्स्टीट्युशन
रामगांव ता.मोताळा जि.बुलडाणा
प्रवेश देणे सुरु आहे
-: उपलब्ध कोर्स :-
◇ B.A., B.Com, B.B.A., M.A.
◇ B.Sc (Clinical Science + Home Science) (महिला विद्यापीठ)
◇ इंग्लिश स्कुल (Nursary to 7th std.)
◇ 11 + 12 std (Art + Science & Commerce)
संपर्क - यश जैस्वाल - 9022327715, प्रा.व्ही.एम.धिरबस्सी (प्राचार्य)
प्रदिप कांडेलकर (मुख्याध्यापक) - 8605374377

https://dainikmahabhoomi.com https://epaper.dainikmahabhoomi.com

विधिमंडळ अधिवेशन ▸ नाना पटोले निलंबित, काँग्रेससह विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार

# दुसरा दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नाने गाजला

**मुंबई, वृत्तसंस्था :**

राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा १ जुलै हा दुसरा दिवस शेतकऱ्यांच्या प्रश्नांनी चांगलाच गाजला. दरम्यान, शेतकऱ्यांच्या मुद्द्यावरून गदारोळ, नाना पटोले निलंबित, काँग्रेससह विरोधकांचा कामकाजावर बहिष्कार अशा नाट्यमय घडामोडीही बघायला मिळाल्या.

भाजप नेते बबनराव लोणीकर तसेच कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा मुद्दा नाना पटोले यांनी उपस्थित केला. परंतु, नाना पटोले यांनी असंसदीय शब्दाचा वापर केल्याचे म्हणत अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी पाच मिनिटांसाठी सभा तहकूब केली. नाना पटोले यांनी मुख्यमंत्र्यांनी शेतकऱ्यांची माफी मागावी, अशी मागणी सभागृहात केली होती. नाना पटोले, विजय वडेट्टीवार थेट अध्यक्षाच्या डायसवर चढून राजदंडापुढे जाऊन लोणीकर प्रकरणात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माफी मागण्याची मागणी केली. त्यानंतर सभापतींनी नाना पटोलेंवर निलंबनाची कारवाई करण्यात आली.

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आक्रमक

■ एकिकडे नाना पटोले यांनी आक्रमक भूमिका घेतलेली असताना दुसरीकडे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील नाना पटोले यांच्या कृती वरुन काँग्रेसवर निशाणा साधला. सभागृहात आजपर्यंत अनेकदा आपण असे गोंधळ पाहिले आहेत. मात्र, अध्यक्षांचीच चुकी असल्यासारखे पटोले अध्यक्षांच्या अंगावर धावून गेले असल्याचे फडणवीस यांनी म्हटले आहे.



### विरोधकांचा एक दिवसाचा सभात्याग

■ नाना पटोलेंचे एक दिवसासाठी निलंबन झाल्यानंतर त्याचा निषेध म्हणून विरोधकांनी एक दिवसासाठी विधानसभेच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे. महाराष्ट्राच्या इतिहासात पहिल्यांदा असे झाले असेल की शेतकऱ्यांसाठी आवाज उठवण्यासाठी, शेतकऱ्यांच्या झालेल्या अवमानाविरोधात आवाज उठवण्यासाठी कुणीतरी निलंबित झाले आहे. आपण हा एक भयानक पायंडा पाडला आहे. महाराष्ट्राचे दुर्दैवं हे आहे की हे सरकार शेतकऱ्यांचे नसून निवडणूक आयोगाच्या आशीर्वादाने आमच्या डोक्यावर बसलेले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिलेली वचनं न पाळता त्यांचा अपमान करून यांना सत्ताधारी बाकांवर बसता येते हे आज निवडणूक आयोगाच्या आशीर्वादाने भाजपाने दाखवले आहे. त्यामुळे नाना पटोलेंच्या निलंबनाचा निषेध म्हणून आम्ही आज एक दिवसाच्या कामकाजावर बहिष्कार टाकला आहे, अशी प्रतिक्रिया शिवसेना (उद्धव ठाकरे) आमदार आदित्य ठाकरे यांनी दिली.

## पीक कापणी प्रयोगावर आधारित नवी विमा योजना

### कंपन्यांवर दोष सिद्ध झाल्यास ब्लॅकलिस्ट

**मुंबई:** राज्य शासनाच्या नव्या पीक विमा योजनेबाबत विधानसभेत चर्चेदरम्यान कृषिमंत्री यांनी सविस्तर माहिती देताना स्पष्ट केले की, दोषी ठरलेल्या विमा कंपन्यांवर कठोर कारवाई केली जाईल आणि अशा कंपन्यांना शासनाकडून ब्लॅकलिस्ट करण्यात येईल. शेतकऱ्यांना पीक कापणी प्रयोगाच्या आधारे योग्य आणि हमखास नुकसानभरपाई मिळेल, याची खात्री शासन घेत असल्याचे कृषिमंत्री ॲड.माणिकराव कोकाटे यांनी विधानपरिषदेत सांगितले.

पीक विमा कंपन्यांना होत असलेल्या नफ्याबाबत सदस्य अमोल मिटकरी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना मंत्री ॲड. कोकाटे बोलत होते. चर्चेमध्ये विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे, सदस्य सदाभाऊ खोत, सतेज पाटील यांनी सहभाग घेतला. कृषिमंत्री ॲड.कोकाटे म्हणाले की, ज्या कंपन्यांचा दोष सिद्ध होईल, त्यांच्यावर कारवाई होईलच, शिवाय त्यांना शासनाच्या यादीतून कायमस्वरूपी वगळण्यात येईल.

## बीड लैंगिक अत्याचार प्रकरणात 'एसआयटी' स्थापन करण्यात येणार

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**मुंबई, वृत्तसंस्था :**

बीड येथील अल्पवयीन मुलीच्या लैंगिक शोषण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केली.

सदस्य चेतन तुपे यांनी यासंदर्भातील मुद्दा उपस्थित केला होता. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, वरिष्ठ महिला आयपीएस अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'एसआयटी'ची स्थापना करून या प्रकरणाची कालबद्ध चौकशी करण्यात येईल. तसेच दोषींवर कठोर कारवाई करून दोषींना पाठीशी घालणाऱ्या सर्वांवरही कठोर कारवाई करण्यात येईल.



### पाच ब्रास वाळू तहसीलदारार्फत मोफत मिळणार

■ राज्य शासनाने राज्यात एक व्यापक वाळू धोरण लागू केले आहे. या धोरणाअंतर्गत घरकुलांसाठी स्थानिक वाळू घाटांमधून पाच ब्रास वाळू मोफत उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तहसीलदारांमार्फत ही वाळू लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवली जाणार आहे, अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानपरिषदेत दिली.

### अधिक व्याजाचे आमिष देणाऱ्या योजनांविरोधात पोलिसांची विशेष मोहीम

■ राज्यात अधिक व्याजदराचे आमिष दाखवून नागरिकांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या योजनांवर नियंत्रण ठेवण्यासाठी पोलिस विभागामार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत असून, नागरिकांनी अशा प्रकारच्या योजनांना बळी न पडता योग्य ती दक्षता घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले.

### मुंब्रा : हत्या प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात जाणार

■ मुंब्रा येथे अल्पवयीन मुलीवर झालेला अत्याचार आणि तिची निर्घृण हत्या ही घटना अत्यंत हृदयद्रावक असून, या प्रकरणात दोषींवर कठोर कारवाई केली जाईल, असे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी सांगितले. या गुन्ह्याचा तपास जलदगतीने पूर्ण करून पीडितेला न्याय मिळावा, यासाठी हे प्रकरण गृहराज्यमंत्री योगेश कदम फास्ट ट्रॅक न्यायालयात चालवण्यात येईल, असेही त्यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले.

## शक्तिपीठ विरोधात बळीराजा एकवटला

**कोल्हापूर, वृत्तसंस्था :**

नागपूर ते गोवा प्रस्तावित शक्तिपीठ महामार्गाच्या विरोधात मंगळवारी राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांनी एल्गार पुकारला. कोल्हापुरात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष राजू शेट्टी यांच्या नेतृत्वाखाली पुणे-बेंगलोर राष्ट्रीय महामार्ग सुमारे दीड तास रोखून सरकारला सज्जड इशारा दिला. कोणत्याही परिस्थितीत शक्तिपीठ महामार्ग होऊ देणार नाही, अशी



भूमिका शेतकऱ्यांनी घेतल्याने आता सरकारची चांगलीच कोंडी होणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट असणारा नागपूर ते गोवा या शक्तिपीठ महामार्गाला सुरुवातीपासूनच विरोध होऊ लागला आहे. बारा जिल्ह्यातून जाणाऱ्या या शक्तिपीठ महामार्गासाठी ८६,००० कोटीचा चुराडा होणार आहे. तर हजारो हेक्टर सुपीक जमीन ही या महामार्गामुळे बाधित होणार आहे. त्यातच शेतकऱ्यांना तुलनेत कमी मोबदला मिळणार असल्याने शेतकऱ्यांनी शक्तिपीठ महामार्गाविरोधात कृती समितीच्या माध्यमातून राज्यातील बारा जिल्ह्यांमध्ये अक्षरशः रान पेटवले आहे.

## निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांसोबतची बैठक पुढे ढकलली

**नवी दिल्ली :** बिहारमध्ये मतदार यादीच्या विशेष सघन पुनर्रचनाबाबत काँग्रेसच्या मागणीवरून निवडणूक आयोगाने विरोधी पक्षांच्या शिष्टमंडळासोबत बोलावलेली बैठक 'पुढे ढकलली' आहे, कारण आतापर्यंत कोणत्याही पक्षाने त्यांच्या उपस्थितीची पुष्टी केलेली नाही.

३० जून रोजी पाठवलेल्या ई-मेलमध्ये, काँग्रेसने मतदार यादी पुनर्रचना प्रक्रियेबाबत अनेक राजकीय पक्षांच्या वतीने २ जुलै रोजी निवडणूक आयोगासोबत तातडीची बैठक बोलावण्याची मागणी केली होती. ई-मेलमध्ये दावा करण्यात आला आहे की ते बहुपक्षीय शिष्टमंडळाचे प्रतिनिधित्व करत आहेत आणि त्यांनी विरोधी आघाडी 'इंडिया'मध्ये सहभागी असलेल्या जवळजवळ सर्व पक्षांची नावे घेतली आहेत. आयोगाने या पक्षांना बैठकीसाठी पुष्टी करण्यास सांगितले होते.

## रवींद्र चव्हाण यांची भाजपच्या प्रदेशाध्यक्षपदी निवड

**मुंबई, वृत्तसंस्था :**

महाराष्ट्राच्या भाजपा प्रदेशाध्यक्षपदी अपेक्षेप्रमाणे आमदार रविंद्र चव्हाण यांची निवड झाली आहे. सध्या ते महाराष्ट्र भाजपचे कार्याध्यक्षपद म्हणून काम करत होते. मुंबई येथे आता प्रदेशाध्यक्ष निवडीसाठी निरीक्षक असलेले केंद्रीयमंत्री किरण रिजिजू यांच्या उपस्थितीत चव्हाण यांची १ जुलै रोजी निवड करण्यात आली.



रविंद्र चव्हाण यांच्या निवडीची घोषणा किरेन रिजिजू यांनी केली. विद्यमान प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडून चव्हाण यांनी सूत्रे स्वीकारली आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मावळते प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, विनोद तावडे यासह भाजपाचे सर्व आमदार, पदाधिकारी उपस्थित होते.

मुंबईतील वरळी डोममध्ये हा कार्यक्रम संपन्न झाला. अत्यंत भव्यदिव्य अशा या कार्यक्रमाला आत्तापर्यंतची रेकॉर्ड ब्रेक गर्दी झाली होती. सर्व आसन व्यवस्था फुल्ल झाल्याने भाजप कार्यकर्त्यांना उभे राहून कार्यक्रम पाहावा लागला. विधानसभा निवडणूकीनंतर मंत्रिमंडळात संधी न मिळाल्याने काहीसा नाराज असलेल्या चव्हाण यांना पक्षश्रेष्ठींनी दिलेले प्रदेशाध्यक्षपदाचे आश्वासन पूर्ण झाले आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपने कोकण आणि इतर भागांत पक्षविस्तारावर भर देण्याचा निर्धार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कोकणात पक्षवाढीसाठी चव्हाण यांच्या योगदानाचे कौतुक केले.

## दोन वर्षांत ३.५ कोटी नोकऱ्या देणाऱ्या योजनेला मंजुरी

### १ ऑगस्टपासून ईएलआय लागू होणार

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

मोदी सरकारने एम्प्लॉयमेंट लिंक्ड इनसेंटिव्ह (ईएलआय) योजनेला मंजुरी दिली आहे. यानुसार येत्या दोन वर्षांत ३.५ कोटींहून अधिक रोजगार उपलब्ध केले जाणार आहेत. सर्वच क्षेत्रांमध्ये रोजगार निर्मिती करणे, नोकऱ्यांची क्षमता वाढविणे यासह सामाजिक सुरक्षा वाढविण्याची तयारी केली जात आहे.

देशातील बेरोजगारी कमी करणे हे या ईएलआय योजनेचे मुख्य उद्दिष्ट आहे. नवीन नोकरी करणाऱ्यांना म्हणजेच पहिल्यांदा नोकरी करणाऱ्यांना महिन्याचा पगार दोन टप्प्यांत दिला जाणार आहे.

यासाठी १५,००० रुपयांपर्यंतचा मासिक पगार गृहीत धरण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याची माहिती दिली आहे.



### दोन लाख कोटी रुपयांची तरतूद

■ या योजनेसाठी एकूण दोन लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. ४.१ कोटी तरुणांना रोजगार, कौशल्य आणि आर्थिक संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने पंतप्रधानांच्या पाच योजनांच्या पॅकेजचा भाग म्हणून २०२४-२५ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात ईएलआय योजनेची घोषणा करण्यात आली होती. १.९२ कोटी लाभार्थी पहिल्यांदाच कामगार क्षेत्रात प्रवेश करतील. या योजनेचे फायदे १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ दरम्यान निर्माण झालेल्या नोकऱ्यांना लागू होतील, असे प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

## न्यूज ब्रीफ

### थायलंडमध्ये कोर्टाने पीएमना पदावरून हटवले



**बँकॉक :** थायलंडच्या संवैधानिक न्यायालयाने पंतप्रधान पायतोंगतार्न शिनावात्रा यांना त्यांच्या पदावरून निलंबित केले आहे. त्यांच्यावर कंबोडियन नेते हुन सेन यांच्याशी फोनवर बोलल्याचा आरोप आहे. या संभाषणात त्यांनी थाई लष्कराच्या कमांडरवर टीका केली. थायलंडमध्ये ही एक गंभीर बाब मानली जाते कारण तेथे लष्कराचा खूप प्रभाव आहे. हे संभाषण लीक झाल्यानंतर देशभर संताप पसरला. न्यायालयाने ७-२ च्या फरकाने पंतप्रधानांना पदावरून काढून टाकले.

### स्फोटातील मृतांची संख्या ३४ वर

**सांगारेड्डी :** तेलंगणाच्या पसुम्यालाराम येथील सिगाची इंडस्ट्रीज फार्मा प्लांटमध्ये झालेल्या स्फोटातील मृतांची संख्या ३४ वर पोहोचली आहे, अशी माहिती १ जुलै रोजी पोलीस अधीक्षक परितोष पंकज यांनी दिली. आतापर्यंत ढिगाऱ्याखालून ३१ मृतदेह बाहेर काढण्यात आले आहेत, तर तीन जणांचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. बचावकार्य अंतिम टप्प्यात आले आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### ट्रम्प-मस्क यांच्यात पुन्हा जुंपली

**वॉशिंग्टन :** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि जगातील सर्वात श्रीमंत उद्योगपतींपैकी एक आणि टेस्लाचे मुख्य कार्यकारी अधिकारी एलन मस्क यांच्यातील वाद पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. मस्क यांनी ट्रम्प यांच्या नवीन कर व खर्च विधेयकावर जोरदार टीका केली. याला तत्काळ ट्रम्प यांनी उत्तर देत, दुकान बंद करून दक्षिण आफ्रिकेला परत जावे लागू शकते, असा इशारा दिला आहे.

### ढगफुटी सदृश्य पावसामुळे हाहाकार!

**बक्सर :** हिमाचल प्रदेशमध्ये ढगफुटी सदृश्य पडलेल्या पावसामुळे महाराष्ट्रातील पर्यटक अडकल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. यामधील काही पर्यटक सातारा जिल्ह्यातील असल्याची शक्यता वर्तवली जात आहे.

जून महिन्यात पावसाने सरासरी ओलांडली

## जुलैमध्ये सरासरीपेक्षाही जास्त पाऊस

**मुंबई, वृत्तसंस्था :**

देशात यंदा मान्सून वेळेआधी दाखल झाला. त्यानंतर वेळेपूर्वीच संपूर्ण देशात मान्सून पोहचला. यंदा मे महिन्यात मुसळधार पाऊस झाला होता. त्यानंतर जून महिन्यात देशात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला. परंतु आता जुलैमधील पावसासंदर्भात हवामान विभागाने महत्वाचे माहिती दिली आहे. यंदा जुलैमध्येही दमदार पाऊस असणार आहे. देशभरात सरासरीपेक्षा जास्त म्हणजे १०६ टक्के पाऊस जुलै महिन्यात पडणार असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे.

जून महिन्यात देशात सरासरी ओलांडणाऱ्या पावसाचा जोर जुलै महिन्यात कायमच राहण्याची शक्यता आहे. यंदाच्या जुलै महिन्यात देशात सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता ज्येष्ठ हवामान शास्त्रज्ञ के.एस.होसळीकर यांनी व्यक्त केली. देशात १०६ टक्के पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. महाराष्ट्रात सर्वदूर चांगल्या पावसाचे संकेत असल्याने राज्यभर सरासरीपेक्षा अधिक पावसाची शक्यता आहे.



### पुणे, मुंबईत सरासरी ओलांडली

■ यंदा मे महिन्यात चांगला पाऊस झाला. त्यानंतर जूनच्या सुरुवातीला पावसाने ब्रेक घेतला होता. विदर्भ, मराठवाडा वगळता राज्यातील इतर भागात जून महिन्यात पावसाने सरासरी ओलांडली आहे. पुणे आणि मुंबईतही पावसाने जून महिन्यातील सरासरी ओलांडली आहे. मुंबईत सरासरीच्या तुलनेत ४९.७ मिलिमीटर अधिक पाऊस झाला आहे. जूनमध्ये पुण्यात सरासरी १७३ मिलिमीटर पाऊस पडतो. मात्र यंदा २९ जूनपर्यंत २६३ मिलिमीटर पाऊस नोंदवला गेला.

**५ जुलै नंतर पाऊस सक्रीय होणार :** राज्यात यंदा सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार असल्याचा अंदाज हवामान विभागाने मे महिन्यात व्यक्त केला होता. राज्यात जून ते सप्टेंबर या चार महिन्यात सरासरीच्या १०६ टक्के पाऊस पडणार असल्याचा अंदाज आहे. जुलै महिन्यात राज्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासा देणारी बातमी आहे. या महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस पडणार आहे. ५ जुलै नंतर राज्यात पाऊस सक्रीय होणार आहे.

## विमान कोसळता कोसळता वाचले!

### ९०० फुटांपर्यंत आले होते खाली

**नवी दिल्ली, वृत्तसंस्था :**

एअर इंडियाच्या विमानाच्या अपघाताची घटना ताजी असतानाच आणखी एक घटना समोर आली आहे. एअर इंडियाचे दिल्लीहून व्हिएन्नाला जाणारे विमान तांत्रिक बिघाडामुळे ९०० फुटांपर्यंत खाली आले होते. सुदैवाने हे विमान कोसळले नाही, तांत्रिक बिघाडामुळे ही घटना घडली.

दिल्लीच्या इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावरुन इंडिया बोइंग ७७७ या विमानाने उड्डाण केले. हे विमान दिल्लीहून व्हिएन्नाला चालले होते. त्यानंतर काही मिनिटांताच हे विमान तांत्रिक बिघाडामुळे खाली येऊ लागले. वैमानिकाला स्टॉल वॉर्निंग, ग्राऊंड प्रॉक्सिमिटी वॉर्निंग सिस्टिम, जीपीएस सिंक या बाबतची माहिती कॉकपिटमध्ये मिळाली. ज्यानंतर विमानात तांत्रिक बिघाड आहे हे त्याला कळले. १४ जून रोजी ही घटना घडल्याचे समोर आले आहे. पहाटे २ वाजून ५६ मिनिटांनी या विमानाने दिल्लीहून उड्डाण केले होते. त्यानंतर अवघ्या काही मिनिटांत हे विमान ९०० फूट खाली आले. स्टिक शेकर अलार्मही झाला. ज्यानंतर वैमानिकाने हे विमान योग्य उंचीवर नेले आणि उड्डाण सुरु ठेवले. या घटनेत कुठलाही अपघात झाला नाही. तसेच कुठलीही जिवीत हानी झाली नाही. ९ तास ८ मिनिटांच्या उड्डाणानंतर हे विमान व्हिएन्नाला सुरक्षित पोहचले. त्यानंतर या ठिकाणी वेगळा क्रू आला आणि त्यानंतर हे विमान टोरांटोला रवाना झाले.



## न्यूज ब्रीफ

### सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले

**मुंबई :** राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी ५७ हजार ५०९ कोटीच्या पुरवणी मागण्या मांडल्या आहेत. यावरून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी सरकारला पहिल्या दिवशी धारेवर धरले आहे. राज्यावरील आर्थिक बोजा वाढला आहे, सरकारचे आर्थिक संतुलन ढासळले आहे, त्यामुळे राज्यातील गरिबांवर, दुर्लक्षित समाजावर अन्याय होतो आहे, अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली आहे. याबाबत अधिक बोलताना ते म्हणाले आहेत की, चालू आर्थिक वर्षात मांडलेल्या अर्थसंकल्पात सरकारने एक विक्रम केला असा मी उल्लेख केला होता. त्यावेळी महसुली तूट ही ४५ हजार ८९१ कोटी रुपयांची होती. राज्याच्या अर्थमंत्रांनी पुन्हा पुरवणी मागण्या मांडल्या, त्या ५७ हजार ५०९ कोटीच्या आहेत. सरकारचे बहुमत असल्याने या पुरवणी मागण्या मंजूर होतील. त्यावेळी सरकारला १ लाख ३ हजार ४०० कोटी कमी पडणार आहेत.

### कृषी विभागातर्फे महाकृषी ए.आय.धोरण कार्यशाळेचा शुभारंभ...

# नाविन्यपूर्ण तंत्रज्ञान वापरुन शेतकऱ्याचे आयुष्य समृद्ध करणार : कृषीमंत्री कोकाटे

**मुंबई / वृत्तसंस्था**

मानव विरहित शेती, 'ए आय' आधारित हवामानाचे अंदाज व हवामान अनुकूल पीक पद्धती घेणे, काटेकोर सिंचन पद्धती विकसित करणे, जिल्हास्तरावर शेती प्रयोगशाळा उभारणे, शेतीसाठी मोबाईल व्हॅनची सोय करणे, पीक साठवणूक सुविधा वाढवणे, शेतीसाठी कमी खर्चात नाविन्यपूर्ण तंत्रद्यान वापरून, उत्पादन वाढवून शेतकऱ्याचे आयुष्य समृद्ध करण्यावर शासनाचा भर आहे, असे मत कृषीमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी व्यक्त केले.

यशवंतराव चव्हाण सभागृह येथे १ जुलै रोजी स्व.वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कृषी दिना निमत्ताने 'महाकृषी ए. आय. धोरण या विषयावर' कृषी विभागातर्फे कार्यशाळा आयोजित केली होती. या कार्यशाळेच्या उद्घाटनाप्रसंगी कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे बोलत होते. यावेळी कृषी राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल, प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी, कृषी आयुक्त सूरज मांढरे, नानाजी कृषी संजीवनी प्रकल्पाचे संचालक परिमल सिंह यावेळी उपस्थित होते.



कृषिमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे म्हणाले की, शेतकऱ्यांच्या हिताच्या शासन अनेक योजना राबवत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाची जोड शेतीला दिली जावी यासाठी महाकृषी ए. आय. धोरण शासन राबवत आहे. काळाची गरज ओळखून शेतीमध्ये बदल होणे अपेक्षित आहे. शेतीतील उत्पादन वाढले आहे मात्र शेत मालाची गुणवत्ता कायम राखणे हे मोठे आव्हान आहे. फक्त भरमसाठ खत वापरणे हा जास्त उत्पादन देण्याचा मार्ग नाही.

### शेतकऱ्यांना समृद्ध करणारे निर्णय : मंत्री ॲड.जयस्वाल

शेती व शेतकऱ्यांच्या विकासासाठी शासन अनेक महत्वपूर्ण निर्णय घेत आहे. शेतकऱ्यांना शेती नुकसानीसाठी सरसकट मदत देण्यात येत आहे. शेतीमध्ये भांडवली गुंतवणूक करणे, महाकृषी ए. आय. धोरणाची राज्यात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे. शेतीमध्ये आज अनेक आव्हाने आहेत शेतमालाला योग्य बाजारभाव आणि बाजारपेठांची योग्य माहिती असणे आवश्यक आहे, असे कृषी राज्यमंत्री ॲड.आशिष जयस्वाल यांनी सांगितले. प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी म्हणाले की, महाकृषी एआय धोरण या विषयी आज शेतकऱ्यांशी सवांद साधता येईल.

## आषाढी एकादशीला एसटी कर्मचाऱ्यांना मोफत भोजन व्यवस्था



**मुंबई / वृत्तसंस्था**

आषाढी एकादशी निमित्त श्री क्षेत्र पंढरपूर येथे विठुरायाच्या दर्शनासाठी येणाऱ्या लाखो भाविकांच्या सेवेसाठी एसटीच्या ५,२०० बसेसची व्यवस्था केली आहे. या बसेस घेऊन येणारे चालक, वाहक त्यांची देखभाल करणारे यांत्रिक कर्मचारी, पर्यवेक्षक, अधिकारी यांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था मोफत करण्यात आली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

मंत्री सरनाईक म्हणाले, गेली कित्येक वर्ष विठुरायाच्या भक्तांची सेवा एसटी व एसटीचे कर्मचारी सातत्याने करत आहेत. ऊन, वारा पाऊस याची तमा न बळगता अतिशय निष्ठेने त्यांचे कर्तव्य ते बजावत असतात. आषाढी वारीच्या काळात यंदा स्वखर्चाने सलग तीन दिवस या सर्वांच्या चहा, नाश्ता व जेवणाची व्यवस्था (एकादशीला उपवासाचे पदार्थ) करीत आहे. या निमित्ताने माणसातील विठुराया ची सेवा करण्याची संधी मिळत आहे. त्यामुळे दरवर्षी अशा प्रकारचा उपक्रम राबविणार असल्याचेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

आषाढी वारीच्या काळात ५,६ व ७ जुलै रोजी चंद्रभागा बसस्थानक, भिमा बसस्थानक, विठ्ठल बसस्थानक व पांडुरंग बसस्थानक येथे सुमारे १३ हजार एसटी कर्मचारी या मोफत भोजन व्यवस्थेचा लाभ घेतील.

## तीन पिढ्यांचा वारसा सोडून भाजपमध्ये प्रवेश ; कुणाल पाटलांचा काँग्रेसला रामराम

**मुंबई / वृत्तसंस्था**



काँग्रेसचे कट्टर समर्थक असणारे व माजी आमदार कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेशावेळी चंद्रशेखर बावनकुळे, रवींद्र चव्हाण तसेच गिरीश महाजन यांच्या उपस्थितीत कुणाल पाटील यांचा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. विकास कामांना निधी मिळत नसल्याने कुणाल पाटील यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्याचे त्यांनी म्हटले आहे.

कुणाल पाटील यांच्या आजोबांपासून वडील व त्यानंतर कुणाल पाटील असे तीन पिढ्या काँग्रेसमध्ये होते. परंतु आता कुणाल पाटील यांनी भाजपचे कमळ हाती घेतले आहे. विकास करायचा असेल तर भाजपसोबत जायला हवे असे त्यांनी म्हटले होते. कुणाल पाटील यांच्या भाजप प्रवेशामुळे उत्तर महाराष्ट्रात भाजपची ताकद आणखी वाढण्यास मदत होणार आहे. कुणाल पाटील यांचे धुळे जिल्ह्यात व परिसरात चांगलेच वर्चस्व असून याचा आगामी महापालिका निवडणुकीत भाजपला चांगला फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे.

पुढे बोलताना कुणाल पाटील म्हणाले, अनेक वर्षांची मागणी होती की मनमाड इंदौर रेल्वे व्हावी, जेव्हा २०१४ साली भाजपचे सरकार आले तेव्हा ही रेल्वे सुरू झाली. असे अनेक प्रलंबित प्रश्न होते जे सुटले असते तर त्याच काळात खानदेशचा विकास झाला असता.

## आर्थिक अडचणीतील जिल्हा बँकांसाठी निधीची गरज : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

**नवी दिल्ली / वृत्तसंस्था**

राज्यातील आर्थिक अडचणीत असणाऱ्या सात जिल्हा बँकांना शेतकऱ्यांना कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी वर्ष २००४ प्रमाणे किंवा वर्ष २०१४ मध्ये केंद्र सरकारने प्रायोजित केल्यानुसार अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. केंद्राने या बँकांचे पुनरुज्जीवन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केंद्र सरकारकडे करण्यात आल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिली.

नवी दिल्ली येथील भारत मंडपममध्ये केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सहकार मंत्रालयाच्या 'मंथन' उच्चस्तरीय बैठकीमध्ये सहकार क्षेत्राच्या विकासावर सखोल चर्चा झाली. या बैठकीला केंद्रीय सहकार राज्यमंत्री कृष्णपाल गुर्जर, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, सहकार मंत्रालयाचे सचिव डॉ. आशीष कुमार भूटानी आणि देशभरातील विविध राज्यांचे सहकार मंत्री, सचिव यांसह सहकार क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते.



आंतरराष्ट्रीय सहकारिता वर्ष २०२५ च्या पार्श्वभूमीवर आयोजित या बैठकीत सहकार क्षेत्रातील सुधारणा, डिजिटल सक्षमीकरण, प्राथमिक सहकारी संस्थांचे बळकटीकरण आणि नव्या राष्ट्रीय सहकारी धोरणाच्या मसुद्यावर सविस्तर चर्चा झाली.

महाराष्ट्राचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बैठकीत राज्यातील सहकार क्षेत्रातील यशस्वी उपक्रमांचा आढावा घेतला. राज्यातील ३१ जिल्हा मध्यवर्ती बँकांपैकी २३ बँकां सक्षमपणे कार्यरत आहेत. मात्र, उर्वरित सात बँका डबघाईला आलेल्या आहेत.

## पाककला



**– रुपाली गायकवाड**
सुप्रसिद्ध कुक तथा सहाय्यक कृषी अधिकारी,
बुलढाणा मो. ९४२२९४३६०५ (वेळ: सायं. ७ ते ९)

### भगरीची आंबोळी

**साहित्य :-** १/४ कप साबुदाणा, १ कप भगर, १ कप पाणी, अर्धा टी स्पुन ईनो, पावकप दही, मीठ.

**कृती :-** सर्वप्रथम मिक्सरच्या भांड्यामध्ये साबुदाणा फिरवुन याची पुड बनवुन घ्या. आता यामध्ये भगर घालुन परत एकत्र फिरवुन घ्या. आता हे मिश्रण एका बाऊलमध्ये काढून घ्यावे. त्यामध्ये दही, मीठ घालुन मिक्स करून घ्या. आता १ कप थोडं थोडं पाणी घालत सरसरीत बॅटर बनवुन घ्या. आता झाकण ठेऊन १५-२० मिनीटे रेस्ट साठी ठेवा. बॅटर चांगले मुरले की त्यामध्ये अर्धा टी स्पुन ईनो घाला, किंवा रात्रभर हे मिश्रण फर्मिगटेशनसाठी ठेवा म्हणजे ईनो घालायचे काम पडणार नाही. आता गरम तव्यावर चमचाभर तेल पसरवुन पळीभर बॅटर पसरून घ्या. वरून झाकण ठेऊन खालील बाजु क्रिस्पी व ब्राऊन होई पर्यंत भाजुन घ्या. फक्त एकच साईड भाजुन घ्यावी, म्हणजे वरून जाळी छान येते. शेंगदाणा चटणी बरोबर सर्व्ह करा



वरील पाककृतीचे व्हिडीओ Rupalis Food Culture या यूट्यूब चॅनलवर पाहू शकता.




### राशीभविष्य

- **मेष :** आजचा दिवस अडचणींचा राहील. ठरलेल्या भेटी लांबणीवर पडतील. व्यवहारात नुकसान संभवतं.
- **वृषभ :** व्यवहारात अपेक्षित लाभ होईल. नोकरीत सहकाऱ्यांशी जमवून घ्यावं. मानसिक स्वास्थ्य लाभेल.
- **मिथुन :** वाढत्या खर्चावर नियंत्रण ठेवावं. कौटुंबिक जबाबदाऱ्या वाढतील. स्थावर प्रश्न प्रलंबित राहतील.
- **कर्क :** मोठी खरेदी तुर्तास नको. व्यवसायात अपेक्षित उलाढाल होईल. धार्मिक कार्याचं समाधान मिळेल.
- **सिंह :** जुनी दुखणी पुन्हा उद्भवतील. आर्थिक फसवणूक संभवते. प्रगतीचे नवनवे पर्याय समोर येतील.
- **कन्या :** इतरांचा सल्ला विचारपूर्वक घ्यावा. व्यवहारात मध्यस्थी टाळावी. नव्या ओळखीतून लाभ होईल.
- **तूळ :** .कामाची बरीच धावपळ राहील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राखावी. बोलण्यातून गैरसमज संभवतात.
- **वृश्चिक :** व्यवसायाचा व्याप वाढेल. घरगुती उद्योगात उत्कर्षाच्या संधी लाभतील. प्रवास लाभदायक ठरेल.
- **धनु :** मनावरचा ताण हलका होईल. अपेक्षित ध्येय साध्य करू शकाल. प्रकृतीच्या तक्रारी उद्भवतील.
- **मकर :** रखडलेली कामं मार्गी लागतील. प्रियजनांच्या भेटीने समाधानी व्हाल. बाकी स्थिती उत्तम राहील.
- **कुंभ :** चैनीवर अधिक खर्च होईल. नव्या भेटीने उत्साह वाढेल. उपजत कला–गुणांचा विकास होईल.
- **मीन :** खरेदीचा उत्साह राहील. नोकरीत बदली, बढतीचे योग आहेत. कौटुंबिक मतभेद टाळायला हवे.

### २ जुलै — दिनविशेष

- **१९७६:** व्हिएतनाम युद्धानंतर उत्तर व्हिएतनाम आणि दक्षिण व्हिएतनामचे पुन्हा एकत्रीकरण.
- **१९९६ :** प्रसिद्ध अभिनेता राजकुमार यांचं निधन.
- **२००२ :** स्टीव्ह फॉसेट हा उष्ण हवेच्या फुग्याद्वारे पृथ्वी प्रदक्षिणा करणारा पहिला माणूस ठरला.
- **२०१७ :** कृषीमूल्य आयोगाच्या अध्यक्षपदी पाशा पटेल यांची नियुक्ती.
- **२०१८ :** पीडीपी नेत्या मेहबूबा मुफ्ती काँग्रेसच्या संपर्कात असल्याची माहिती.

### आरोग्यमंत्र — शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी..

आहार हाच उपचार असं एक मत मांडलं जातं. या धर्तीवर बघता सध्या डिटॉक्स डाएटचा बोलबाला बघायला मिळत आहे. डिटॉक्स डाएट म्हणजे आहाराच्या माध्यमातून शरीराची अंतर्गत स्वच्छता करणं. तुम्हीही या आहारतंत्राचा अवलंब करण्याच्या विचारात असाल तर त्याबाबतचे समज–गैरसमज जाणून घ्यायला हवे. शरीराची अंतर्गत स्वच्छता करायची तर अँटिऑक्सिडंट्सयुक्त फळं आणि भाज्या खायला हव्यात. याविषयी अधिक विस्ताराने जाणून घेऊ या.



✻ शरीराची अंतर्गत स्वच्छता ही एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. त्वचा, फुफ्फुस, किडनी, आतडं आणि यकृत हे अवयव विषारी घटक बाहेर टाकण्याचं काम करतात. या कामाची गती शरीराच्या चयापचय क्रियेवर अवलंबून असते. अँटिऑक्सिडंट्सयुक्त फळं आणि भाज्या खाऊन शरीराच्या स्वच्छतेची ही प्रक्रिया विनाव्यत्यय सुरू ठेवता येते. ✻ शरीराच्या अंतर्गत स्वच्छतेसाठी साखर, जंक फूड तसंच बार्बेक्यू केलेले पदार्थ टाळायला हवेत. अशा पदार्थांमुळे शरीराच्या विविध अवयवांच्या डिटॉक्सिफिकेशन प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो✻ वनस्पतीजन्य पर्यायी पदार्थ तसंच ग्रीन टीमुळे शरीर शुद्धिकरणाची प्रक्रिया वेगवान होऊ शकते. ✻ फळांचे रस, सुप्स यासारख्या पदार्थांमुळे शरीर शुद्धिकरण अधिक चांगल्या प्रकारचे होतं हा गैरसमज आहे. म्हणूनच केवळ त्यावर अवलंबून राहणं योग्य ठरणार नाही. यामुळे उपासमार होऊ शकते.

### हेल्थ वेल्थ — हाड मोडलं तर...

शाळेत किंवा घरी कोणी नसताना हाड मोडलं तर घाबरून जाऊ नका. पडल्यानंतर कड्कन् काही तरी मोडल्यासारखा आवाज आला, लागलेला भाग सुजला, संवेदना हरवल्यासारखं वाटत असेल तर हाड मोडलं असण्याची शक्यता असते. हाड मोडलं तर सर्वात आधी त्या भागावर कापडात गुंडाळलेला बर्फ लावता येईल. दुखापत झालेला अवयव हलवू नका किंवा हाड पुन्हा बसवण्याचा प्रयत्न करू नका. हाड स्थिर रहावं यासाठी त्या भागावर आधार ठेवा. यामुळे डॉक्टरांकडे जाईपर्यंत तुम्हाला आराम मिळेल. त्यासाठी तुम्ही लाकूड, पुठ्ठा किंवा दुमडलेल्या वर्तमानपत्राचा वापर करू शकता. तातडीने डॉक्टरांकडे जा. शस्त्रक्रियेच्या आधी काहीही खाऊ किंवा पिऊ नका. हाड मोडलेल्या व्यक्तीने झोपायला हवं. जखम धुवू नका. फ्रॅक्चर डोऊ नये म्हणून रस्त्यावरून चालताना खड्ड्यांकडे नीट लक्ष द्या. खेळताना योग्य ती आयुधं वापरा. क्रिकेट खेळताना हेल्मेट, पॅड्सचा वापर करा. बाईकवरून जाताना किंवा सायकल चालवताना हेल्मेट घाला.

### ब्युटी मंत्रा — मोठ्या प्रवासाला निघताय?

मोठ्या अंतरावरील किंवा परदेश प्रवासासाठी विमानप्रवासाला प्राधान्य दिलं जातं. पण जास्त कालावधीचा विमानप्रवास शारीरिकदृष्ट्या थकवणारा असतोच याशिवाय त्वचेवरही परिणाम करत असतो. त्यामुळे अधिक कालावधीच्या विमानप्रवासातही त्वचा टवटवीत कशी ठेवावी याविषयी...

✻ मेक अप उतरवा– प्रवासाला निघताना मेक अप केला असला तरी कालांतराने उतरवावा. चेहऱ्यावर मेक अप ठेवून विमानात विश्रांती घेणं जवळपास अशक्य असतं. जास्त काळ मेक अप चेहऱ्यावर राहिल्याने त्वचेचं नुकसान व्हायची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे हायड्रेटिंग क्लिंजिंग मिल्कने मेक अप उतरवावा.

✻ त्वचा रिफ्रेश करा– विमानासारख्या बंद ठिकाणी त्वचेला पुरेसा ऑक्सिजन मिळतोच असं नाही. त्यामुळे हायड्रेटिंग मिस्टचा स्प्रे चेहऱ्यावर करावा. यामुळे त्वचा रिफ्रेश होईल. **क्रमश:**

### पंचांग

**बुधवार, २ जुलै २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७,
आषाढ शु. ७, नक्षत्र : उ. फाल्गुनी
चंद्रराशी : कन्या, योग : वरियान
सूर्योदय: ६.०७, सूर्यास्त: ७.१८

### फॉरवर्डस

**वक़्त तक़ हीं देतें हैं हम तहज़ीब रिश्तों क़ो ज़नाब...**

**वरना ठुकरा देनें क़ा हुनर भी ज़मानें सें हीं सीखा हैं हमनें....!**

### फॅशन पॅशन

✻ जास्त ट्रेंडी दिसायचं असेल तर तुम्ही चेक्सवाला शर्ट घालू शकता. ✻ डेनिमऐवजी शॉर्टस ट्राय करता येईल. ✻ व्हाईट शर्ट, डेनिम शॉर्टसवरही तुम्ही व्हाईट स्नीकर्स कॅरी करू शकता. ✻ शॉर्टसोबत प्रिंटेड शर्टचा फॅशनेबल ऑप्शनही तुमच्याकडे आहे. ✻ जीन्ससोबत किंवा कॅज्युअल पॅंट्ससोबत पोलो नेक टी शर्टसनी तुम्ही आपला लूक खुलवू शकता. ब्लॅक पॅंट आणि टी शर्टसोबतही व्हाईट स्नीकर्स कॅरी करता येतील. ✻ बेज रंगाची चिनो, गडद रंगाचा शर्ट किंवा ब्लेझर आणि व्हाईट स्नीकर हा लूकही क्लासी आहे.

### करिअरवाटा — संस्था नव्हे विषय महत्त्वाचा

उच्च शिक्षणाच्या अभ्यासक्रमाची निवड करताना बहुसंख्य विद्यार्थ्यांच्या मनात संभ्रम असतो. कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यावा याबाबतही अनेक शंका असतात. करीयरबाबत काही चुकीच्या कल्पना असल्यास नुकसान संभवतं. काही अभ्यासक्रमांना उगाचंच महत्त्व दिलं जातं. मात्र पुढे त्याचा काहीही उपयोग नाही हे समजल्यावर फसवणूक झाल्यासारखं वाटतं. म्हणूनच विद्यार्थ्यांनी काही बाबींची दखल घ्यायला हवी. उदाहरणार्थ अनेक मुलांना एखाद्या महाविद्यालयाविषयी भलतंच आकर्षण असतं. पण त्या कॉलेजमध्ये त्यांच्या आवडीचा विषय नसतो. अशा वेळी आवडीचा विषय मिळाला नाही तरी चालेल असं म्हणून केवळ कॉलेजच्या प्रेमापोटी मुलं तिथे प्रवेश घेतात. नंतर तिथं फार चांगलं शिकवलं जात नाही हे त्यांच्या लक्षात येतं. अशा वेळी अभ्यासक्रम आवडत नसूनही पुढं शिकत रहावं लागतं किंवा आवडीच्या विषयासाठी कॉलेज बदलावं लागतं. वास्तविक अशा प्रसंगी कॉलेज बदलणं श्रेयस्कर ठरतं. या गडबडीत एखादं वर्ष वाया गेलं तरी चालेल पण जन्मभर नावडता विषय शिकण्याची शिक्षा वाईट असते. त्यामुळे शिक्षणसंस्थेला नव्हे तर आपल्या आवडीच्या विषयाला प्राधान्य द्या.



### खेचाखेची — भाऊ म्हणाला

**नवरा :–** माझ्या बहीणीच्या हाताला काय चव आहे.... आहाहा...

**बायको :–** नका फार कौतूक करू..
भाऊबिजेच्या दिवशीच गिळायला जाणार..... मग का नाही चांगल करणार?

**नवरा :–** अगं असा तुझा भाऊ मला म्हणाला गं.....!

### वेगळं काही

हॅरियट दोन मुलांची आई आहे. केविनसोबत तिचं लग्न होणार होतं. पण लग्नाच्याच दिवशी तिने लग्न मोडण्याचा निर्णय घेतला. या दोघांचं लग्न ज्या हॉटेलमध्ये होणार होतं तिथलं बिल केविनने भरलं नव्हतं. याबाबत त्याने हॅरियटला काहीच सांगितलं नव्हतं. याचा धक्का बसल्याने तिने लग्न मोडण्याचा निर्णय घेतला. केविनने आपला विश्वासघात केल्याचं तिचं म्हणणं आहे. हॅरियटने ८१ हजार रूपयांचा पोशाख शिवला होता. हा पोशाख वाया जावू नये यासाठी तिने लग्नाच्या पार्टीऐवजी ब्रेकअप पार्टी करायचं ठरवलं. लग्नानंतर ते जिथे हनीमूनला जाणार होते तिथेच तिने ही पार्टी केली. या पार्टीत लग्नातले सगळे पाहुणे सहभागी झाले होते.

### लाईफस्टाईल — परफ्युम निवडताना...

दिवसभर फ्रेश राहण्याचा एक मार्ग म्हणजे उत्तम परफ्युम वापरणं. मात्र परफ्युम निवडताना काळजी घ्यायलाच हवी. याविषयी...



✻ परफ्युम निवडताना व्यक्तिमत्व आणि त्वचेचा विचार करणं गरजेचं असतं. अनेकदा त्वचेवर परफ्युम लावल्यावर वेगळ्याच सुगंधाचा अनुभव येण्याची शक्यता असते. त्यामुळे आधी सुगंध त्वचेवर पारखून नंतरच निवडावा. ✻ परफ्युमवर इडीपी लेव्हल नमूद केलेली असते. परफ्युमची इडीपी पातळी जास्त तितक्या प्रमाणात सुगंध जास्त टिकतो. त्यामुळे ही पातळी पाहूनच परफ्युमची खरेदी करावी. ✻ रोजच्या वापरासाठी हलका किंवा फ्रुट फ्लेवर्ड सुगंध निवडावा तर पार्टीसाठी थोडासा स्ट्राँग परफ्युम वापरावा. ✻ सुटेबल परफ्युम निवडण्यासाठी सर्वप्रथम एका स्ट्रीपवर लावून पहावा. ती स्ट्रीप त्वचेवर घासावी. हा सुगंध पाच मिनिटांपेक्षा अधिक काळ टिकून राहिला तर तो लाँग लास्टिंग आहे असं समजावं. ✻ परफ्युम निवडताना भारंभार सुगंध स्प्रे करून पाहू नये. सगळ्यात जास्त आवडलेले पाच परफ्युम निवडा आणि त्यातून हव्या त्या परफ्युमची निवड करा. लव्हेंडर आणि सिट्रस परफ्युम्स थकवा दूर करतात.

दैनिक
महाभूमि
dainikmahabhoomi@gmail.com
बुधवार , २ जुलै २०२५

# बुलढाणा भूमि

## हवामान अंदाज

सूर्योदय : ५.४७ सकाळी
सूर्यास्त : ७.०९ सायं.
तापमान
कमाल : २९°
किमान : २४°

## सोने-चांदी

| | |
|---|---|
| सोने (२२ कॅरेट प्रति तोळा) | ९६,३०० |
| सोने (२४ कॅरेट प्रति तोळा) | ९७,३०० |
| चांदी (प्रति किलो) | १०,४००० |

## बाजारभाव

**चिखली कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | २३५० | २५५० |
| हरभरा | ४५०० | ५२०० |
| सोयाबीन | ४२०० | ५२२० |
| तुर | ५७५० | ६४६० |
| ज्वारी | १५०० | १८०० |

**खामगाव कृ.उ.बा.समिती**

| शेतमाल | किमान | कमाल |
|---|---|---|
| गहू | १८०० | २४५० |
| हरभरा | ५१०० | ५६५० |
| सोयाबीन | ३७७५ | ४३५० |
| तुर | ५३०० | ६७७५ |
| ज्वारी | १६६० | २४९० |

## दखल...

### विनोदाचे महत्व

धावपळीच्या जीवनात
व्यक्ति होतो संत्रस्त
संवादासाठी विनोदी
शैलीचा कराल वापर
चैतन्य संचारेल सर्वत्र . .

हास्याचे उडता कारंजे
मन होई ताजे ताजे
तनावाला मिळते मुक्ति
जिवनाला मिळते शक्ति

■ प्रा. अशोक सारडा, मेहकर.
( ९४२१३९४३३९ )

## शासनाची उदासीनता : सर्वसाधारण वार्षिक योजनेची स्थिती

# निम्मे वर्ष उलटले, जिल्हा विकासासाठी दमडीही नाही!

अभिषेक वरपे




**बुलढाणा :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी वार्षिक योजनेतून ६१२.३९ कोटी रुपयांचा निधी मंजूर आहे. परंतु, नवीन आर्थिक वर्ष सुरू होवून तीन महीने आणि चालू वर्षातील सहा महीने उलटून गेले तरी जिल्हा विकासासाठी छदामही मिळाला नाही. परिणामी, विकासकामे ठप्प झाली असून निधी साठी प्रशासकीय यंत्रणेला प्रत्येक महिण्यात प्रतीक्षा करावी लागत आहे.

जिल्ह्याचा सर्वांगीण, सर्वव्यापी विकास व्हावा, यासाठी जिल्हा वार्षिक निधीतून कामे प्रस्तावित करून प्रत्यक्षात केली जातात. शिक्षण, आरोग्य, बांधकाम यासह मूलभूत घटकांचा या विकासकामांमध्ये समावेश आहे.

> जिल्हा वार्षिक योजनेनुसार (सर्वसाधारण) अंतर्गत ४००.७८ कोटी रुपये मंजूर आहे. अद्यापपर्यंत शासनाकडून निधी प्राप्त झालेला नाही.
>
> **–राहुल पवार,**
> जिल्हा नियोजन अधिकारी

एकूणच जिल्ह्याच्या विकासासाठी वार्षिक योजनेचा निधी आणि योजनेतून केलेली कामे महत्त्वपूर्ण ठरतात. एप्रिल महिन्यात आर्थिक वर्षाला प्रारंभ झाल्यानंतर या वर्षासाठीचा विकास आराखडा तयार केला. त्यात विविध घटकांचा विचार करून कामे प्रस्तावित केली.

एप्रिल महिन्यात हा आराखडा तयार झाला असून, जून महिना संपत आला तरीही या आराखड्यातील तरतुदीनुसार एक रुपयाही जिल्ह्याला मिळालेला नाही. ३० जून अखेरपर्यंत प्रत्येकवर्षी जिल्हा नियोजनमधून किमान २० ते ६० टक्के निधी मिळतो. त्यानुसार जिल्हा परिषदेसह सर्वच विभागांकडून विकासकामे हाती घेतली जातात. परंतु, यंदा जून संपला तरी निधी नसल्याचे चित्र आहे.

### ५१९. ४३ कोटींचा प्रारुप आराखडा

■ जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत ४००.७८ कोटी, अनुसूचित जाती उपयोजना घटक कार्यक्रमाअंतर्गत १०० कोटी व आदिवासी घटक कार्यक्रमाअंतर्गत १८.६५ कोटी अशा एकूण ५१९. ४३ कोटींचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला असून या प्रारुप आराखड्यास पालकमंत्री मकरंद पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली होती. लवकरात लवकर हा निधी मिळणे अपेक्षित आहे.

### निधी अभावी कामे रखडली

■ आराखडा प्रस्तावित करून तीन महिन्यांचा कालावधी उलटला, तरीही निधी मिळाला नाही. निधी नसल्याने यंत्रणांकडून कामांचे प्रस्तावही येईनात. त्यामुळे प्रशासकीय मान्यता आणि कामेही रखडले आहेत.

# अंढेरा परिसरात वन्यप्राण्यांनी केले पिकांचे नुकसान

## पंचनामे करून तत्काळ मदतीची मागणी

अंढेरा / प्रतिनिधी



देऊळगाव राजा तालुक्यातील अंढेरा गावाला चहू बाजूंनी वनक्षेत्र लाभले आहे. गत वर्षी पडलेल्या दुष्काळानंतर यंदा अंढेरा परिसरात योग्य वेळी पाऊस झाल्याने शेतकऱ्यांनी आशेने सोयाबीन, मका व इतर खरीप पिके तसेच फळबागा लावल्या आहेत. मात्र, जवळपास १५० ते २०० नीलगाई, रोही व हरिण अशा वन्यप्राण्यांनी अनेक शेतीपिके फस्त केली आहे.

अंढेरा येथील महिला शेतकरी गीता उत्तम सानप यांनी गट क्र. १५६ मध्ये केशर व बादाम जातीचे २०० आंब्याचे कलमे लावून फळबाग उभी केली होती. मात्र, वन्य प्राण्यांनी ही बाग फस्त केली. वन विभाग व महसूल प्रशासनाने तत्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई द्यावी आणि शेतकऱ्यांच्या मालमत्तेचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी अंढेरा येथील शेतकऱ्यांकडून केली जात आहे.

''ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे, त्यांनी ऑनलाइन अर्ज करावा'' अर्ज मुख्य कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर तो आम्हाला दिला जातो. त्यानंतर सात दिवसाच्या आत पंचनामा करणे बंधनकारक आहे. आता पंचनाम्यासाठी तीन सदस्यीय समितीत दोन नवीन सदस्यांचा समावेश करण्यात आला आहे. एक सरपंच आणि एक ग्रामसेवक. त्यामुळे आता समितीत एक वनरक्षक, एक कृषी सहाय्यक, एक तलाठी, एक सरपंच आणि एक ग्रामसेवक असे पाच सदस्य असतील. आज जर अर्ज मिळाला, तर उद्याच आम्ही पंचनामा करून शेतकऱ्यांचे समाधान करू, असे वनरक्षक छाले यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सांगितले.

# सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त शैक्षणिक साहित्याचे वाटप

बिबी / प्रतिनिधी



अदिती अर्बनचे संस्थापक, 'दैनिक महाभूमि'चे मुख्य संपादक तथा शिक्षक भारतीचे राज्य संघटक सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त ३० जून रोजी लोणार तालुक्यातील विविध शाळा, महाविद्यालयांत विद्यार्थ्यांना वह्या, पेन अशा शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले होते.

बुलढाणा जिल्ह्याचा सामाजिक क्षेत्रात सुरेश देवकर यांचा नावलौकिक आहे. समाजहिताच्या अनेक उपक्रमात त्यांचा सक्रिय सहभाग असतो. याशिवाय, शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे भरीव योगदान आहे. ३० जून रोजी ठिकठिकाणी त्यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला. अदिती अर्बन या संस्थेच्या माध्यमातून राज्यभरात त्यांनी कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे.

दरम्यान, त्यांच्या वाढदिवशी बुलढाणा, वाशिम अकोला या जिल्ह्यांमध्ये शैक्षणिक साहित्य वितरणाचा उपक्रम राबविण्यात आला. त्यानुसार, लोणार तालुक्यातील बिबी येथील वसंतराव नाईक विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,

शरद विद्यालय, वसंतराव नाईक विद्यालय खळेगाव, पंडित नेहरू विद्यालय मलकापूर पांग्रा व किनगाव जट्टू येथील शिवाजी हायस्कूलमध्ये इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना वही व पेनचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अदिती अर्बन बिबी शाखेचे शाखा व्यवस्थापक योगेश संतोष गायकवाड, श्रीकृष्ण श्यामसुंदर पंधे आदींनी परिश्रम घेतले.

## न्यूज ब्रीफ

### पोलीस निरीक्षक अंबुलकर गुन्हे शाखेचे प्रमुख



**बुलढाणा :** जिल्हा पोलीस प्रशासनामध्ये अनेक बदल पहायला मिळत आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे तत्कालीन प्रमुख अशोक लांडे यांची बदली झाली असून त्यांच्याजागी पीआय सुनील अंबुलकर यांच्याकडे गुन्हेशाखेची जबाबदारी देण्यात आली आहे. पीआय अंबुलकर आतापर्यंत डीएसबीचे प्रमुख म्हणून काम पाहत होते. यापूर्वी जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशनमध्ये ठाणेदार म्हणून त्यांनी कामकाज पहिले आहे. पोलीस निरीक्षक अशोक लांडे हे सीआरओ ला रवाना होणार असल्याची माहिती रात्री उशिरा प्राप्त झाली आहे. मावळते एलसीबी चे पोलीस निरीक्षक अशोक लांडे यांचा कार्यकाळ डिसेंबर २०२५ रोजी संपणार होता. परंतु अवेळी लांडे यांची बदली झाली आहे.

# विविध मागण्यांसाठी भारत मुक्ति मोर्चाची निदर्शने

## संतप्त घोषणांनी वेधले शासनाचे लक्ष्य

बुलढाणा / प्रतिनिधी




ईव्हीएम हटाव, ओबीसी आधारित जातीनिहाय जनगणना करण्यात यावी, बोधगया येथील महाबोधी महाविहार बुद्धांच्या ताब्यात देण्यात यावे यासह अन्य प्रमुख मागण्यांसाठी 'भारत मुक्ती मोर्चा' च्या नेतृत्वात विविध संघटनांनी १ जुलै रोजी मलकापूर रोड येथे निदर्शने केली.

विविध मागण्यांसाठी 'भारत मुक्ती मोर्चा'ने बंदची हाक दिली होती. या बंदला समिश्र प्रतिसाद मिळाल्याचे मंगळवारी दिसून आले. दरम्यान, राष्ट्रीय पिछडा वर्ग, बहुजन क्रांती मोर्चा आणि बुद्धिस्ट इंटरनॅशनल नेटवर्कने या लढ्यात सक्रिय सहभाग नोंदविला. भारतीय लोकशाही प्रणाली ही सक्षम विरोधी पक्षनेता भयमुक्त निष्पक्ष व पारदर्शी निवडणूकावर आधारित असताना सत्ताधारी व विरोधी पक्ष दोन्हीवर अनियंत्रित कब्जा करून भारतातील लोकशाही प्रणाली परिवर्तीत केल्या जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. बोधगया येथील महाबोधी महाविहार बुद्धांच्या ताब्यात देण्यात यावे, अशीही मागणी करण्यात आली. याप्रसंगी, अनेकांची उपस्थिती होती.

## शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु

**बुलढाणा :** एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला अंतर्गत चालविण्यात येणाऱ्या आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह, कोलवड जि. बुलढाणा येथे शैक्षणिक सत्र २०२५-२६ करीता प्रवेश प्रक्रिया सुरु झाली आहे. जिल्ह्यांतील पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन गृहपाल एस.एस. चौरपगार यांनी केले आहे.

# जिल्हा पोलीस दलातील १५ अधिकारी, कर्मचारी सेवानिवृत्त

## एसपी नीलेश तांबे यांच्याकडून सत्कार

बुलढाणा / प्रतिनिधी




.जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन अंतर्गत कार्यरत १५ अधिकारी, कर्मचारी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहे. यानिमित्ताने, ३० जून रोजी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक नीलेश तांबे यांच्याहस्ते सेवानिवृत अधिकारी, कर्मचाऱ्यांना त्यांच्या कुटुंबियांसमेवत गौरवविण्यात आले.

देऊळगाव राजा येथील उपविभागीय कार्यालयातील उपनिरीक्षक विश्वनाथ राठोड, गुलाबराव काळे, साखरखेर्डा ठाण्यातील पोहेकॉ प्रविण बोर्ड, मेहकरचे रमेश बाजड, बोराखेडी उपनिरीक्षक राजु आगासे, बुलढाणा ग्रामीणचे सहाय्यक फौजदार रविंद्र वानखडे, जिवानिशा शाखेचे उपनिरीक्षक विलास कड, मेहकरचे पोहेकॉ दत्तात्रय लोडे, मोटर परिवहन विभाग बुलढाणाचे सहाय्यक फौजदार विजयसिंग महाले, बिबीचे पोहेकॉ रामप्रसाद चतूर, खामगाव नियंत्रण कक्षातील सहाय्यक फौजदार नागोराव पवार, शिवाजी नगर स्टेशनचे अरुण इंगोले, शेगाव शहरचे गणेश पवार, बिबी पोलीस स्टेशनचे पोकॉ भगवान नागरे, बुलढाणा शहर पोलीस स्टेशनचे पोहेकॉ सुनील दळवी यांचा सेवानिवृतीनिमित्त प्रमाणपत्र, शाल, श्रीफळ देवून कौटुंबिक सत्कार करण्यात आला. याप्रसंगी पोलीस अधीक्षक निलेश तांबे, अप्पर पोलीस अधीक्षक बि. बी. महामुनी आदी हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन हवालदार निलेश रत्नपालखी यांनी केले.

## रेशनचा काळा बाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले

# रेशनचे धान्य विकले, शिधापत्रिका होणार रद्द!

डोणगाव / प्रतिनिधी



राष्ट्रीय अन्न सुरक्षा तसेच अंत्योदय योजने अंतर्गत विनामूल्य मिळणारे तांदूळ व गहू आदी धान्य अवैधरित्या विकल्याचे आढळल्यास शिधापत्रिका रद्द करण्यात येईल, असा इशारा तहसीलदार निलेश मडके यांनी दिला आहे. यामुळे, आता परिसरात रेशनचा काळा बाजार करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मेहकर तालुक्यातील गरजूंना राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम २०१३ अंतर्गत विनामुल्य धान्याचे वितरण करण्यात येते. या योजनेची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी पुरवठा विभागाची असून विभागामार्फत स्वस्त धान्य दुकानदारांच्या माध्यमातून तालुक्यातील प्राधान्य व अंत्योदय योजनेतील हजारो रेशन कार्डधारकांना मोफत धान्याचे वाटप करण्यात येते. सदर धान्य वाटप योग्य पद्धतीने करण्यासाठी पुरवठा विभागामार्फत 'ई-पॉस' मशीनद्वारे धान्य वाटप करण्यात येते.

शासकीय धान्याची खरेदी, विक्री नियमबाह्य आहे. तसे आढळून आल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, त्यामुळे कुणीही शिधापत्रिकाधारक व्यावसायिकांकडे विक्री करताना आढळून आल्यास त्यांचे लाभार्थी यादीतून नाव वगळण्यात येईल, तसेच शिधापत्रिका रद करण्यात येईल.

त्याचप्रमाणे, शासकीय धान्याची अवैध साठवणूक करणाऱ्या व्यावसायिकांवर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, असा इशारा निलेश मडके तहसीलदार यांनी दिला आहे.

### 'पॉस मशीन' मुळे पारदर्शकता

■ पॉस मशीनद्वारे मशीनवर लाभार्थ्यांचा अंगठ्याचा ठसा घेतल्याशिवाय धान्य वाटप होत नसल्याने धान्याच्या काळाबाजारावर आळा बसला आहे. त्या सोबत धान्य वाटपात पारदर्शकता सुद्धा आली आहे. दरम्यान पावसाचे दिवस बघता शासन निर्देशानुसार पुरवठा विभागाने लाभयार्थ्याने तीन महिन्याचे धान्य एकत्रित देण्याचा निर्णय घेतला, त्यासाठी सर्व स्वस्त धान्य दुकानांमध्ये तिन्ही महिन्यांचा शिधा पाठविण्यात आला व उर्वरित दुकानदारांना धान्य पाठविणे सुरु आहे.

### अन्यथा कारवाई अटळ

■ आपल्या हक्काचे धान्य विक्री करू नका, असे आवाहन तहसीलदार मडके यांनी केले आहे. विकत घेणाऱ्या दुकानदारांवर सुध्दा कार्यवाही करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.


## दिपस्तंभ मल्टीपर्पज फाऊंडेशन, बुलढाणा व्दारा संचालित

स्व. आर. के. पाटील कॉलेज सिव्हील सर्विसेस पिंप्रीगवळी (१२०२) ता.मोताळा जि.बुलढाणा
स्व. मधुकरराव काशीकर प्रशासकीय सेवा महाविद्यालय, मह (१२०३) ता.जि.बुलढाणा

**स्थापना - २०२१**

कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ रामटेक व्दारा संलग्नित
(महाराष्ट्र शासन मान्यता प्राप्त)
Email:- deepstambh11267@gmail.com

वरील महाविद्यालयामध्ये पुर्णवेळ प्राचार्य, लिपीक आणि शिपाई खालील रिक्त जागांसाठी अर्ज मागविण्यात येत आहेत. (कायम विनाअनुदान तत्त्वावर)

**Employment Notice**

| अ.क्र. | पद | एकुण पदे | पदाचे स्वरुप | संवर्ग |
|---|---|---|---|---|
| १. | प्राचार्य | ०२ | पुर्णवेळ | संवर्ग |
| २. | मुख्य लिपीक | ०२ | पुर्णवेळ | खुला |
| ३. | वरीष्ठ लिपीक | ०२ | पुर्णवेळ | खुला |
| ४. | कनिष्ठ लिपीक | ०२ | पुर्णवेळ | खुला |
| ५. | शिपाई | ०८ | पुर्णवेळ | ------- |

**पात्रता** - विद्यापीठ अनुदान आयोग, महाराष्ट्र शासन आणि कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक अनुसार
**शैक्षणिक अर्हता** - सेवा शर्ती आणि वेतनश्रेणी महाराष्ट्र शासन, विद्यापीठ अनुदान आयोग आणि कविकुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ, रामटेक यांच्या संयुक्त विद्यमान नियमांनुसार असेल.
**पात्र उमेदवाराने** - अध्यक्ष दिपस्तंभ मल्टीपर्पज फांऊडेशन बुलढाणा, पाण्याच्या टाकीजवळ, दलाल ले आऊट, विश्राम भवनासमोर
बुलढाणा - ४४३००१ वर शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्रासह अर्ज पाठवावा किंवा
Email:- deepstambh11267@gmail.com या ईमेल वर दि.२० जुलै २०२५ किंवा त्यापुर्वी प्राप्त होईल असे पाठवावे, शासन नियमानुसार दिव्यांगांना प्राधान्य दिले जाईल. (शारीरीक आणि दृष्टी)
**प्राचार्याची नियुक्ती** - केवळ ५ वर्षाच्या कालावधीसाठी किंवा वयाच्या ६० वर्षापर्यंत, यापैकी जे आधी असेल ते.

**स्वाक्षरी**
**अध्यक्ष, दिपस्तंभ**
**मल्टीपर्पज फाऊंडेशन बुलढाणा**

## अधिवेशनातील 'निलंबनास्त्र'!

अधिवेशन कुठलेही असो विरोधकांना निलंबनाचा सामना करावाच लागतो. आवाज उठवला तर निलंबन निश्चित! गदारोळ, घोषणा देणे, आरोप करणे आणि नंतर अधिवेशनातील कामकाज तहकूब करणे हे आता नविन राहिले नाही. अधिवेशनामध्ये लोकहिताची कामे कमी आणि कामकाज तहकूब करण्यावरच जास्त जोर राहतो. ३० जूनपासून राज्य विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाला सुरूवात झाली. पहिल्याच दिवशी विधानसभेचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी काँग्रेस आमदार नाना पटोले यांना सभापतींच्या खुर्चीवर चढल्याबद्दल मंगळवारी संपूर्ण दिवसासाठी विधानसभेतून निलंबित करण्यात आले. पटोले यांनी भाजपचे आमदार बबनराव लोणीकर आणि कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्यावर शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा आरोप केला आणि त्यांच्यावर कारवाईची मागणी करत सभापतींच्या खुर्चीवर चढले. मागणी योग्य होती, पण ती चुकीच्या पध्दतीने व्यक्त केली. माजी विधानसभा अध्यक्ष पटोले यांच्यावरील कारवाईनंतर काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहातून वॉकआउट केले आणि संपूर्ण दिवसभर सभागृहाच्या कामकाजावर बहिष्कार टाकण्याची घोषणा केली. शेतकऱ्यांशी संबंधित मुद्दे उपस्थित करण्यापासून ते मागे हटणार नाहीत, जरी असे केल्याबद्दल त्यांना दररोज सभागृहातून निलंबनाचा सामना करावा लागला तरी, अशी भूमिका पटोले यांनी घेतली. विरोधक म्हटल्यावर आक्रमकता तर हवीच! पण ऐवढीही नाही की ज्यामुळे शिस्तभंग होईल. लोणीकर यांनी अलीकडेच जालना जिल्ह्यातील परतूर विधानसभा मतदारसंघातील शेतकरी सभेत म्हटले होते की, जे त्यांच्या पक्षावर आणि सरकारवर टीका करतात त्यांना हे माहित असले पाहिजे की त्यांना आमच्यामुळे कपडे, बूट, मोबाईल, योजनांचे आर्थिक लाभ आणि पेरणीसाठी पैसे मिळत आहेत. कोकाटे यांनी दावा केला होता की शेतकऱ्यांनी कर्जमाफीचे पैसे लग्नांवर खर्च केले. राज्याचे कृषीमंत्री म्हणाले की, भिकारीही एक रुपया घेत नाही, परंतु सरकार त्या रकमेचा पीक विमा देत आहे, ज्याचा काही लोक गैरवापर करत आहेत. त्यामुळे लोणीकर आणि कोकाटे यांच्यावर शेतकऱ्यांचा अपमान केल्याचा आरोप होणे स्वाभाविक आहे. दरम्यान, पटोले सभापतींच्या व्यासपीठावर चढले आणि लोणीकर आणि कोकाटे यांच्यावर कारवाईची मागणी केली. त्यानंतर सभापतींनी जाहीर केले की ते पटोले यांना संपूर्ण दिवसासाठी सभागृहातून निलंबित करत आहेत. १ जुलै हा दिवस किसान दिवस म्हणून साजरा करत पटोले यांनी नंतर भाजपच्या नेतृत्वाखालील राज्य सरकारवर निशाणा साधला आणि त्यांनी शेतकऱ्यांकडे दुर्लक्ष आणि अनादर केल्याचा आरोप केला. अधिवेशनात राजकारण करण्यापेक्षा अवकाळी पाऊस, कर्जमाफी, पीक विमा आणि शेतकरी बोनस हे या प्रश्नांवर चर्चा होणे अपेक्षित आहे. सरकारने आश्वासने दिले पण ती पूर्ण केली नाहीत असा दावा विरोधकांकडून होत आहे. भाजप सरकारने शेतकऱ्यांसाठी बोनस जाहीर केला पण तो कधीही दिला नाही. त्यांनी पीक विमा योजना देखील बंद केली आहे. शेतकऱ्यांना पाठिंबा देण्याऐवजी सत्ताधारी पक्षाचे नेते त्यांचा अपमान करत असल्याचा आरोप पटोले यांनी केला. सत्ताधारी पक्ष शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर विरोधी पक्षांना बोलू देत नाही का? असे करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना शिक्षा करतात का? पावसाळी अधिवेशनात आता निलंबनास्त्र हेच चित्र दिसेल का?

# अर्थव्यवस्थेला चालना पण ठेवीदारांवर कुऱ्हाड!

**नोंद**
- कैलास ठोळे
आर्थिक घडामोडीचे अभ्यासक

रिझर्व्ह बँकेने रेपोदरात ५० बेसिस पॉइंट्सची कपात करण्याची घोषणा करून सामान्यजनांना मोठी भेट दिली. ती बाजाराच्या अंदाजापेक्षा जास्त आहे. यामुळे घर, वाहन आणि इतर सर्व प्रकारची कर्जे आणि ईएमआय स्वस्त होतील. असे असले, तरी नव्या मुदत ठेवींचे व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. यामुळे ठेवीदारांच्या, विशेषत: ज्येष्ठ नागरिकांच्या उत्पन्नावर परिणाम होणार असल्याने एका वर्गाची नाराजी वाढण्याची शक्यता आहे.

मुदत ठेवींचे व्याजदर आणि रेपो दर यांच्यातील संबंध सरळ आहे. रेपो दर वाढतो तेव्हा मुदत ठेवीवरील व्याजदर वर जातात आणि रेपो दर कमी होतो तेव्हा मुदत ठेवीवरील व्याजदर कमी होतात. देशात गेल्या काही वर्षांमध्ये बचतीच्या प्रमाणात घट होत आहे. मुदत ठेवींचे व्याजदर कमी झाल्याने अनेकांनी गुंतवणुकीसाठी वेगळे मार्ग चोखाळले आहेत. त्यात 'एसआयपी'चा वाटा मोठा आहे. लोक व्याजदर कमी असणाऱ्या बँकांकडून कर्ज घेतात तर जादा परतावा देणाऱ्या बँकांमध्ये पैसे गुंतवतात. परिणामी, बँकांचे रोख गुणवत्ता प्रमाण घसरले आहे. बँकांकडे फारसा निधी राहिलेला नाही. बँकांना हजारो कोटी रुपयांच्या ठेवींची गरज असताना ठेवींचे प्रमाण घटले आहे. ठेवी आणि कर्जाच्या प्रमाणात तफावत पडत चालल्याने बँका अडचणीत येऊ शकतात. बँकांमध्ये मुदत ठेव ठेवणाऱ्यांमध्ये मुख्यत: ज्येष्ठ नागरिकांचा समावेश असतो. आता रिझर्व्ह बँकेने रेपो दरामध्ये ०.५० बेसिक पॉईंटने कपात केल्यानंतर कर्जावरचे व्याजदर कमी केले आहेत. त्याच प्रमाणात साधारण अर्धा टक्क्यांनी ठेवीवरचा व्याजदरही कमी होऊ शकतो. हा व्याजदर सहा टक्क्यांच्या आसपास येणार असल्याने ज्येष्ठांच्या उत्पन्नात कपात होईल. परिणामी, मुदत ठेवीतील गुंतवणूक आणखी कमी होऊन बँकांना शॉर्ट मार्जिनचा फटका बसू शकतो. अशा वेळी गुंतवणुकीचे अन्य पर्याय शोधण्याबरोबरच मुदत ठेवींमध्ये दीर्घकालीन गुंतवणूक करण्याचे टाळले पाहिजे. आता कमी मुदतीच्या मुदत ठेवींचा विचार करणे हा एक शहाणपणाचा निर्णय असू शकतो. रेपोदरात वाढ होऊन, मुदत ठेवीवरचे व्याज वाढल्यास त्यात दीर्घकालीन गुंतवणुकीचा विचार करता येईल. कोरोनाच्या काळात विकासाला चालना देणे आणि तत्कालीन आर्थिक परिस्थितीला मदत करणे हे उद्दिष्ट असल्यामुळे कमी रेपो दराचा निर्णय घेण्यात आला होता. कमी रेपो दरामुळे अर्थव्यवस्थेत तरलता सहजतेने प्रवाहित होऊ शकली. आता महागाई नियंत्रणात आहे. बाजारात उलाढाल कमी होत आहे. त्यामुळे रिझर्व्ह बँकेने रेपोदर कमी करून बाजारात चलन फिरवण्याचा निर्णय घेतला आहे. वित्तीय संस्था सामान्यत: ठेवींचे दर निश्चित करण्यासाठी आरबीआयच्या रेपो दराचा वापर करतात. ऐतिहासिकदृष्ट्या, पॉलिसी दर कपातीमुळे बँकांनी सर्व कालावधीसाठी ठेवींचे दर कमी केले आहेत. काही बँका आणि बिगरबँकिंग वित्तीय कंपन्यांनी (एनबीएफसी) अलीकडेच ४००-४५० दिवसांच्या कालावधीसाठी विशेष उच्च-व्याज ठेव योजना सुरू केल्या आहेत. तथापि, वित्तीय संस्थांनी सूचित केले आहे की या तिमाहीमध्ये त्यांच्या ठेवींचे दर समायोजित करण्यास विलंब होऊ शकतो. कारण त्यांना कर्जवाढ करण्यासाठी ठेवींची आवश्यकता आहे. ठेवींच्या दरांमध्ये घट झाल्यामुळे ज्येष्ठ नागरिकांच्या निष्क्रिय उत्पन्नात घट होऊ शकते. ते प्रामुख्याने मुदत ठेवीवरील कर्जाच्या उत्पन्नावर अवलंबून असतात. त्यामुळे, निवृत्त व्यक्तींना त्यांच्या निश्चित मासिक उत्पन्नाला पूरक म्हणून मुदत ठेवीच्या व्याजापलीकडे जाऊन पर्यायांचा शोध घ्यावा लागेल. रिझर्व्ह बँकेने रेपोददरांमध्ये कपात केली आहे. हे आर्थिक वाढीला चालना देण्यासाठी अनुकूल धोरणाकडे वळण्याचे संकेत देते.

या वातावरणात व्याजदरांमध्ये घसरण होऊ शकते, हे लक्षात घेऊन मुदत ठेवींमध्ये गुंतवणूक करणाऱ्यांना आपल्या पोर्टफोलिओचा आढावा घ्यावा लागेल आणि योग्य परतावा मिळवण्यासाठी योग्य धोरणे विचारात घ्यावी लागतील. येत्या काही महिन्यांमध्ये मुदत ठेवींचे दर कमी होण्याची अपेक्षा आहे. सामान्यत: बँका आणि बिगर बँकिंग संस्था अल्पकालीन ठेवींवर व्याजदर कमी करतात आणि दीर्घ मुदतीच्या (५-१० वर्षे) मुदत ठेवीवर जास्त व्याजदर ठेवतात. म्हणजेच पैसे लवकर परत हवे असणाऱ्यांना उत्पन्न वाढवण्यासाठी त्वरीत पावले उचलावी लागतील. दर कमी होण्यापूर्वी एक-दोन वर्षांच्या एफडीमध्ये अतिरिक्त निधी गुंतवण्याचा विचार करावा लागेल. पर्यायी स्थिर उत्पन्न गुंतवणूक पर्यायांचाही विचार करावा लागेल. मुदत ठेवीचे व्याजदर कमी होतात, तेव्हा गुंतवणूकदार स्थिर उत्पन्नाच्या पर्यायांमध्ये विविधता आणू शकतात. एक पर्याय म्हणजे बिगर बँकिंग संस्थांकडून उच्च दर्जाच्या कॉर्पोरेट एफडीमध्ये गुंतवणूक. किमान गुंतवणूक रक्कम जास्त असली, तरी कॉर्पोरेट क्षेत्रातील एक-दोन वर्षांच्या एफडी तुलनात्मक कालावधीच्या बँक एफडीपेक्षा ५० बेसिस पॉइंट्स जास्त दर देतात. लहान कालावधीच्या एफडी परिपक्व होतात, तसतसे गुंतवणूकदार नवीन प्रचलित दरांवर पुन्हा गुंतवणूक करू शकतात.



रिझर्व्ह बँकेच्या निर्णयामुळे अर्थव्यवस्थेला नवी चालना मिळेल तर रिअल इस्टेट बाजारात अपेक्षा वाढल्या आहेत. रिअल इस्टेट तज्ज्ञांचे म्हणणे आहे, की रिझर्व्ह बँकेचा रेपोदर कपतीचा निर्णय रिअल इस्टेट क्षेत्रासाठी एक नवीन बूस्टर डोस ठरू शकतो. यामुळे घर खरेदीदारांचा आत्मविश्वास वाढेल. रेपो दर ५० बेसिस पॉइंट्सने ५.५ टक्क्यांपर्यंत कमी करण्याचा रिझर्व्ह बँकेचा निर्णय स्वागतार्ह पाऊल आहे. भारताच्या आर्थिक विकासगतीला पाठिंबा मिळण्याचे हा एक मजबूत संकेत आहे. रिअल इस्टेट क्षेत्रासाठी हे महत्वाचे प्रोत्साहन आहे. त्यामुळे गृहनिर्माण क्षमता आणि खरेदीदारांच्या भावनांमध्ये लक्षणीय सुधारणा होईल. कमी व्याजदरांचा थेट परिणाम मासिक हप्त्यांमध्ये (ईएमआय) कपातीच्या स्वरूपात होतो. त्यामुळे संभाव्य घर खरेदीदार अधिक आत्मविश्वासाने खरेदीचा निर्णय घेऊ शकतील. ही विकास योजना पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांसाठी फायदेशीर आहे आणि त्यामुळे परवडणाऱ्या आणि मध्यम श्रेणीतील घरांची मागणी वाढेल. विकासकांच्या दृष्टिकोनातून, सुलभ कर्ज उपलब्धतेमुळे प्रकल्पांची अंमलबजावणी सुरळीत होण्यास आणि तरलता वाढण्यास मदत होईल. ही दर कपात तसेच पायाभूत सुविधा आणि शहरी विकासावरील सरकारचे लक्ष रिॲल्टी क्षेत्राला पुनरुज्जीवित करेल आणि भारताच्या विकासाच्या कथेत महत्त्वपूर्ण योगदान देईल. यामुळे चांगल्या दराने कर्ज उपलब्ध होईल.

रेपो दरात अलिकडे झालेली ५० बीपीएस कपात रिअल इस्टेट क्षेत्रासाठी चांगली ठरणार आहे. याचे कारण असे की रिझर्व्ह बँकेने घरगुती खासगी वापराला प्रोत्साहन देण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. यामुळे ईएमआय कमी होईल आणि नवीन घर खरेदीदारांसाठी चांगल्या दराने गृहकर्ज उपलब्ध होतील. खरेदीदारांसाठी हा मोठा दिलासा असेल. कारण मालमत्तेच्या किमती सतत वाढत असल्यामुळे रिझर्व्ह बँकेने व्याजदरात कपात केल्याने घर खरेदी करणाऱ्यांना दिलासा मिळू शकतो. विशेषत: मध्यम उत्पन्न गटातील आणि पहिल्यांदाच घर खरेदी करणाऱ्यांमध्ये मागणी वाढण्याची अपेक्षा आहे. या निर्णयामुळे निवासी बाजारपेठेत स्थिरता येईल आणि मागणी वाढेल. तसेच भांडवल खर्चात कपात झाल्याने प्रकल्पांची अंमलबजावणी आणि निधी सुलभ होईल. बँकेचा हा निर्णय निधीचा नेमका वापर करणारा आणि गुंतवणुकीला चालना देणारा आहे.

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण बैठकीनंतर आता व्यावसायिक बँका स्वस्त दरात कर्ज देतील. हे पाऊल रिअल इस्टेट क्षेत्रात बूस्टर डोस म्हणून काम करेल. रिझर्व्ह बँकेने रेपो दर कमी करून देशातील सामान्य लोकांना अलिकडे मोठा दिलासा दिला. या कपातीनंतर रेपो रेट सहा टक्क्यांवरून ५.५ टक्क्यांवर आला. वर्षभरातील ही तिसरी कपात आहे. २०२५ मध्ये रेपो रेटमध्ये कपात करण्याची ही तिसरी वेळ आहे. देशातील महागाई कमी करण्याबाबत आणि आर्थिक विकासाला पाठिंबा देण्यासाठी अधिक उदारमतवादी चलनविषयक धोरण स्वीकारण्याबाबत रिझर्व्ह बँकेचा वाढता विश्वास यातून दिसून येतो. रेपो दर कमी करण्याचा सर्वात मोठा फायदा म्हणजे कर्ज देण्याचा खर्च आणखी कमी होईल. म्हणजेच बँका आता गृहकर्ज, वाहन कर्ज, वैयक्तिक कर्ज, किरकोळ कर्जांवरील व्याजदर कमी करतील.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# विकासाच्या वाटेवर अंतर्विरोध कायम

**नोंद**
- भागा वरखडे
ज्येष्ठ पत्रकार

महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालचे सरकार सत्तेत येऊन सहा महिने झाले आहेत. या सरकारने एकीकडे पायाभूत विकासाच्या कामांना प्राधान्य दिले असताना दुसरीकडे सरकारची तिजोरी लाडक्या बहिणींमुळे रिकामी झाली आहे. विकासकामांच्या घोषणा भरपूर होतात; परंतु पैसा कुठून आणणार हा जसा प्रश्न आहे, तसाच सरकारमधील अंर्तविरोध ही सरकारपुढची मोठी समस्या ठरत आहे.

राज्यामध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. त्यामध्ये रस्ते, रेल्वे, बुलेट ट्रेन, जलमार्ग आदींसह बंदर आणि विमानतळ विकासाच्या कामांचा समावेश आहे. या संपूर्ण विकासाच्या 'इकोसिस्टीम'मुळे राज्यात मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक होत आहे. मुंबई ते अहमदाबाद बुलेट ट्रेनचे काम वेगाने सुरू आहे. पहिले रेल्वे स्टेशन बांधून तयार आहे. टोकियोमध्ये मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेनची चाचणी यशस्वी झाली आहे. पुढच्या वर्षी ही बुलेट ट्रेन भारतात येणार असली, तरी या ट्रेनने प्रवास करण्यासाठी आणखी तीन वर्षे वाट पहावी लागणार आहे. मुंबईमध्ये मोठ्या प्रमाणावर पायाभूत सोयीसुविधांच्या विकासाची कामे सुरू आहेत. पुण्यातही रिंगरोडसह अन्य कामे सुरू आहेत. मुंबईमध्ये सागरी किनारा रस्ता, अटल सेतू, विविध मेट्रो मार्गांची कामे ही त्यातली ठळक उदाहरणे आहेत. या सर्व विकासकामांमुळे मुंबईमध्ये ५० अब्ज डॉलरपर्यंत गुंतवणूक होत आहे. नव्या मुंबईशेजारी तिसरी मुंबई उभी रहात आहे. पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ हे प्रकल्प 'गेमचेंजर' ठरणारे आहेत. यासोबतच पुणे येथील नवीन विमानतळ, शिर्डी, नागपूर विमानतळाचा विकास विकासात महत्त्वाची भूमिका बजावणार आहेत. सागरी किनारा रस्ता विरारपर्यंत वाढवण्यात येत आहे. वाढवण बंदर हे जगातील पहिल्या दहा बंदरापैकी एक असेल. ते समृद्धी महामार्गाशी जोडले जाणार आहे. या परिसरात चौथी मुंबई वसवण्यात येणार आहे. दरम्यान, नागपूर ते गोवा 'शक्तिपीठ महामार्ग' निर्माण करण्यात येत आहे. मात्र हे घडत असताना दुसरीकडे सत्ताधाऱ्यांमध्ये अधिकारांसाठी रस्सीखेच होत असल्याच्या बातम्या सातत्याने येत आहेत.

राज्यात गुंतवणूकदारांना सोयीसुविधा मिळण्यासाठी तसेच वेगाने गुंतवणूक येण्यासाठी 'इज ऑफ डुईंग बिजनेस'मध्ये राज्य झेप घेत आहे. गुंतवणूकदारांच्या सुविधेसाठी मैत्री पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या माध्यमातून 'सिंगल विंडो सिस्टीम' कार्यान्वित करण्यात आली आहे. गुंतवणूकदारांना 'सिंगल विंडो' सिस्टीममुळे उद्योग स्थापन करण्यास महत्वाचे सहकार्य मिळत आहे. दळणवळणाच्या सोयीसुविधांच्या होणाऱ्या विकासामुळे राज्यात मालवाहतूक वेगाने करण्यात येत आहे. येत्या काळात मुंबईजवळील जवाहरलाल नेहरू बंदरापासून नागपूरपर्यंत आठ तासांमध्ये जाता येईल. वाढवण बंदरामुळे विकासाला नवा कोन प्राप्त होणार आहे. नागपूर येथे कार्गो हब विकसित करण्यात आले आहे. यासोबतच पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावरही कार्गो हब विकसित करण्यात येत आहे. नवी मुंबईत नवीन 'एज्युसिटी' निर्माण करण्यात येत आहे. जगभरातील विविध नामांकित विद्यापीठे या परिसरात शैक्षणिक दालन उघडणार आहेत. त्यासोबतच हेल्थ सिटी, इनोवेशन सिटीचेही निर्माण करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारताने जागतिक गुंतवणूकदारांसाठी एक विश्वासार्ह स्थान म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. त्यात महाराष्ट्र अग्रेसर आहे. यंदा देशात आलेल्या ८१ अब्ज डॉलरच्या थेट विदेशी गुंतवणुकीपैकी एकट्या महाराष्ट्रात ३९ टक्के म्हणजेच सुमारे ३२ अब्ज डॉलर आले. याचा अर्थ असा की,



भारतात गुंतवणूक करणाऱ्या प्रत्येक दहा डॉलरपैकी चार डॉलर हे महाराष्ट्रात गुंतवले गेले.

राज्यात विविध प्रकल्पांची कामे सुरू असताना आणि अनेक प्रकल्पांच्या घोषणा होत असताना सरकार पायाभूत कामे करणाऱ्या काही कंत्राटदारांचे पैसे मात्र देऊ शकलेले नाही. एक लाख कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेची बिले समोर असताना ठेकेदारांच्या हातावर लाखो रुपयांपैकी काही लाख रुपये ठेवून बोळवण केली जात आहे. त्यामुळे कंत्राटदारांनी अनेक कामे थांबवली आहेत. दुसरीकडे, लाडकी बहीण योजनेने सत्तेत येता आले; परंतु या योजनेचा सुमारे ३६ हजार कोटी रुपयांचा खर्च हे राज्यापुढचे मोठे आव्हान ठरत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय, आदिवासी विभागासह अन्य विभागांचा खर्च वळवला जात आहे. त्यातून महायुतीतच कलगीतुरा रंगला आहे. अर्थमंत्री अजित पवार यांच्यावर शिवसेनेचे मंत्री तुटून पडले आहेत. महायुती सरकारकडून दलित आणि आदिवासी उपाय योजनांसाठी अर्थसंकल्पात ४० टक्के निधी वाढवून दिला खरा; पण वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या नावाखाली एका हाताने दिलेला निधी दुसऱ्या हाताने काढून घेतला जात आहे. 'लाडकी बहीण योजने'साठी या दोन्ही विभागांच्या निधीची पळवापळवी एकीकडे सुरू असताना दुसरीकडे लाडकी बहीण, बळीराजा वीज सवलत, घरकुल योजनेच्या नावाखाली सामाजिक न्याय विभागाच्या सहा हजार ७६५ कोटींवर वर्षभरात महायुतीकडून डल्ला मारला जाणार असल्याची शक्यता चर्चेत आहे. निवडणुकीच्या तोंडावर सुरू केलेली 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' महायुती सरकारच्या चांगलीच अंगलट आली आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनी अजितदादांची पाठराखण करताना निधी वळवल्याचा आरोप करणाऱ्यांना अर्थसंकल्प नीट कळलेला नाही, अशी टीका केली आहे.

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली तीन मोठ्या पक्षांचे बहुमतातले महाविकास आघाडी सरकार कोसळण्यामागे एकनाथ शिंदे यांचे बंड कारणीभूत ठरले. त्यांनी ठाकरे यांची साथ सोडताना जी नाराजी, कुरघोडी, आरोप-प्रत्यारोप, निधीवाटपात भेदभाव असे एक ना अनेक आरोप केले होते. त्याचीच पुनरावृत्ती आता महायुती सरकारमध्ये होत आहे. फडणवीस यांच्या नेतृत्वात महायुती सरकार पुन्हा प्रचंड बहुमताने सत्तेत आले आहे. या सरकारला विरोधी पक्षांकडून कुठलाही धक्का नसला, तरी अंतर्गत कलहाच्या वादळाची धास्ती कायम आहे. यामुळे दोन तलवारी एकाच म्यानात सांभाळणे फडणवीस यांच्यासाठी कसोटीचा काळ ठरणार आहे. महायुतीमध्ये भाजप सर्वाधिक जागांसह मोठा भाऊ म्हणून मिरवत असला तरी राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेनेकडूनही आपापल्या पक्षाच्या विस्तारासाठी जोरदार हालचाली सुरू आहेत. पक्षविस्तार करताना हे तीनही पक्ष विरोधकांचे पक्ष आणि त्यांचे नेते फोडण्याऐवजी मित्रपक्षांचेच नेते गळाला लावत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचा अपवाद वगळता महायुती सर्वत्र एकत्र येऊन लढणार असल्याचे नेते सांगत असले, तरी कार्यकर्ते मात्र स्वबळाचा आग्रह धरत आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत भाजप, राष्ट्रवादी आणि शिवसेनेमध्ये स्वबळाची चाचपणी सुरू आहे. महायुतीमध्ये पहिल्यांदा खातेवाटप, मंत्रिपदे, पालक मंत्रिपदांवरून नाराजीनाट्य रंगले. पालकमंत्रिपदाचा घोळ तर सरकारला सत्तेत येऊन सहा महिने उलटले तरी सोडवता आलेला नाही.

यातच आधी दबक्या आवाजात बोलली जाणारी निधीवाटपात मिळत असलेली सापत्नपणाची वागणूक आता शिवसेनेच्या मंत्र्यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समोरच चर्चेला आणली. महायुतीमध्ये अजित पवार नकोत, ही भूमिका शिवसेनेच्या नेत्यांनी आजपर्यंत वारंवार बोलून दाखवली. आता त्याची धग थेट रायगडपर्यंत पोहोचली. फडणवीस, शिंदे, पवार या प्रमुख नेत्यांनी सरकार आणि महायुती मजबूत असल्याचे अनेकदा ठणकावून सांगितले आहे; पण त्यांच्याकडून आपापले मंत्री, नेते, पदाधिकारी, आणि कार्यकर्त्यांना आवर घालण्यासाठी त्या त्या पातळीवर प्रयत्न केले गेल्याचे दिसून आलेले नाही. फडणवीस यांच्या सरकारमध्ये सध्या सहा राज्यमंत्री आहेत; मात्र त्यापैकी फक्त एका राज्यमंत्र्याला निर्णय घेण्याचा अधिकार देण्यात आला आहे. उर्वरित पाच मंत्र्यांना अद्याप मुख्यमंत्री फडणवीस यांनी कोणतेही अधिकार दिलेले नाहीत. तीन राज्यमंत्र्यांनी याबाबत फडणवीस यांच्याकडे तक्रार केली आहे. त्यांच्या खात्याचे कॅबिनेट मंत्री निर्णय घेतात, तेव्हा या राज्य मंत्र्यांना माहिती दिली जात नाही. काही मंत्र्यांना अद्यापही पुरेसा कर्मचारी वर्ग मिळालेला नाही.

**(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

# सगळेच हळवे नसतात..!



**आयुष्याच्या मनपटलावर**
- क्षितीजा गायकवाड-तरंगे
सहायक अभियंता श्रेणी - १
जलसंपदा विभाग

आतापर्यंतच्या आलेल्या अनुभवावरुन आयुष्याचा विचार करतांना आपला जन्म नक्की कशासाठी झाला असेल हा प्रश्न मला सरासरी वर्षातून एकदातरी पडतो. प्रश्नाचं उत्तर भलेही सापडत नाही पण स्वत:पेक्षा जेव्हा इतरांसाठी काही वस्तू घेतली अथवा कोणासाठी आपलं समजून काही मदत केली, तर आनंद होतो असे मला अजूनही जाणवते. बराच कालावधी गेल्यानंतर किंवा काही अनुभव आल्यानंतर अस लक्षात येते की, आपण ज्यांना गरजेच्या वेळी मदत केली, ज्यांच्या दुखात आपण सोबत राहून साथ दिली, असे कितीतरी लोकं आपली गरज संपली की केलेल्या उपकाराची जाणीव ठेवत नाहीत. जाणीव ठेवली पाहिजेच असे काही नाही परंतु आपल्याविषयी कोणाकडे वाईट बोलल्याचे समजतं तेंव्हा कळतं सगळेच मनाने हळवे नसतात. जग बदलतं चाललं, माणसं व्यवहारीक झाली आहेत. आपण पण स्वत: मध्ये बदल करायला पाहिजे. यावर माझ्याच विचारांचे आपआपसात वादविवाद सुरु होतात. मनात असंख्य प्रश्न उभे होतात पण उत्तर भेटत नाही.

मनामध्ये असंख्य प्रश्न घेऊन जेंव्हा एखाद्या मृत्यु पावलेल्या माणसाची जळती चिता आपण पाहतो, तेंव्हा बऱ्यापैकी माणसाचा घमंड उतरलेला असतो, असे माझे मत आहे. पण, पुन्हा लक्षात येते की सगळेच हळवे नसतात..!

आयुष्याच्या वाटेवर पैसा कोणाला नकोय? समाजात मान-सन्मान कोणाला नकोय? प्रसिद्धी, एश्वर्य कोणाला नकोय? पण हे सगळं मिळवण्यातच सगळे एवढे व्यस्त झाले की, शेवटी साध्य काय आहे किंवा या शर्यतीत आपण लहान-लहान क्षण जगायचं तर विसरत नाही ना, हे माणसाच्या लक्षात येत नाही. आयुष्यात अपेक्षेचे ओझे एवढ करुन ठेवल आपण की, डोक्यात फक्त घड्याळ चालत राहते. अर्थात प्रत्येकाचे घड्याळ वेगळ्या स्वारुपाचे असते. कोणाला पैसे कमवून आनंद होतो, तर कोणाला मान-सन्मान मिळवून, पण हे सगळ माध्यम आहे जीवन जगायच. हे कमवणच म्हणजे जीवन नसाव बहूतेक!

तसही कितीही श्रीमंती आली तरी मृत्युला चकवा देता येण आजपर्यंत कोणालाच शक्य झाल नाही. याचा अर्थ या गोष्टी दुय्यम आहेत असही नाही. घरातील सदस्यांपैकी कोणावर गंभीर आजाराचे डोंगर कोसळले तर पैशाशिवाय गत्यंतर नाही, हे ही तेवढच खरे आहे. सार्वजनिक माध्यमांवर कोणाच्या उपचारासाठी आर्थिक देणगी हवी असलेले मजकूर पाहिले की, असे वाटते अशी वेळ कोणावरच येऊ नये. खुप लोक अशावेळी नाव न घेताही मदत करतात, तेंव्हा आपण कमवलेले धन ज्यांचा आपल्याशी काहीही संबंध नाही, अशा मानवाला झाला हे झाले साध्य असे समजायला हरकत नाही. पण थांबायच कुठे? हे लक्षात घेऊन पैशाची किंवा प्रसिद्धीची वाटचाल माणसाने केली तर अपेक्षेचं ओझं कमी होऊन आनंदी व समाधानी जीवन जगायला योग्य मार्ग दिसेल. **(क्रमश:)** **(ही लेखकाची वैयक्तिक मते आहेत.)**

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक **सुरेश बाबुराव देवकर** (अदिती एन्टरप्रायजेस बुलढाणा) यांनी भास्कर प्रकाशन प्रा.लि.प्लॉट नं. टी ५१, फेज नं.४ एमआयडीसी ग्रोथ सेंटर अकोला येथे मुद्रित करुन दैनिक महाभूमि मुख्य कार्यालय, बी.के. कॉम्प्लेक्स, धाड नाका, बुलढाणा- ४४३००१ येथे प्रसिद्ध केले.मुख्य संपादक-**सुरेश बाबुराव देवकर** *कार्यकारी संपादक-**ब्रह्मानंद रुपराव जाधव** (पीआरबी कायद्यानुसार मजकुराच्या निवडीची जबाबदारी यांची)
दैनिक महाभूमि
आर.एन.आय.नं. MAHMAR/२०२३/८९१४८ ईमेल-**dainikmahabhoomi@gmail.com.** कार्यालय मोबा. **8960040018/19** (बुलढाणा न्यायालय कक्षेत)
This newspaper is printer, publisher and editor and Owner by **Suresh Baburao Deokar** (Aditi Enterprises Buldhana) Printed at Bhaskar Prakashan Pvt.Ltd Plot no.T-51, Phase No.4 MIDC Growth Center Akola (Maharashtra) Published at Head Office : DAINIK MAHABHOOMI B.K.Complex, Dhad Naka, Buldhana-443001, (M.S.) Executive Editor : **Bramhanand Ruprao Jadhao** RNI No.MAHMAR/2023/89148

दैनिक महाभूमि
छत्रपती संभाजीनगर भूमि
बुधवार, २ जुलै २०२५
mahabhoomimarathwada@gmail.com

न्यूज ब्रीफ

## विरगाव ग्रामपंचायतीचा आरोग्य विभागाकडून गौरव

**वैजापूर :** टिबी मुक्त भारत योजने अंतर्गत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विरगाव ग्रामपंचायतीचा आरोग्य विभागाकडून गौरव करण्यात येवून पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्राथमीक आरोग्य केंद्र लाडगाव येथे गौरव पुरस्कार कार्यक्रम घेण्यात आला.

## सिडको ते वरझडी बससेवा सुरू

**करमाड :** शालेय मुलींसाठी अहिल्याबाई होळकर योजनेअंतर्गत नाथनगर, वडखा, वरझडी अशी मोफत बससेवा सुरू करण्यात आली. ३० जून रोजी या सेवेचा शुभारंभ वराडी येथील श्रीकृष्ण हायस्कूल येथे झाला. बस सकाळ व दुपार अशा दोन फेऱ्या असणार आहे. यामुळे विद्यार्थी व पालकांनी समाधान व्यक्त केले. मुलींना मोफत बस पासेसचे वाटप देखील करण्यात आले. यावेळी सहायक वाहतूक अधीक्षक संतोष पोपळघट, सहायक वाहतूक नियंत्रक संतोष म्हस्के, बसचालक रामेश्वर काळे, गंगाधर मोरे, वंदना तोबरे, शाळेचे मुख्याध्यापक सुधीर गीते, वरझडीचे सरपंच अनिल पठाडे, दिलीप पठाडे, शिक्षक ईश्वर पठाडे, काकासाहेब काकडे, तुकाराम पठाडे, मुरलीधर पठाडे, साहेबराव पठाडे, किशोर पठाडे, करण पठाडे आदींची उपस्थिती होती.

## विहीरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**वैजापूर :** तालुक्यातील खंडाळा येथील एका शेतकऱ्याचा विहिरीत पडून मृत्यू झाला.ही घटना २९ जून रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास घडली. अरुण जगन्नाथ सोनवणे (५५ वर्ष) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. गट नंबर ६१३ मधील विहिरीवर सोनवणे हे विद्युत पंप चालू करण्यासाठी गेले होते.त्यावेळी पाय घसरून पडल्याने त्यांचा मृत्यू झाला.वैजापूर येथील उपजिल्हा रुग्णालयात त्यांच्या मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.

### निधन वार्ता

## किशोर यंदे



**छत्रपती संभाजीनगर :** किशोर मधुकरराव यंदे (५४ वर्ष) रा. लक्ष्मण चावडी, जुना मोंढा परिसर यांचे अल्पशा आजाराने २३ जून रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर २४ जून रोजी कैलासनगर येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, सून असा परिवार आहे.

### पैठण रोडवर सलग दुसऱ्या दिवशी कारवाई

# ३६२ अतिक्रमणे निष्कासित

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटाव मोहिमेला वेग आला असून मंगळवारी नक्षत्रवाडी ते महानुभाव रत्सावरील मोठ्या प्रमाणावर कारवाई सुरू आहे. ३० जून रोजी महानुभाव चौक ते नक्षत्रवाडी दरम्यान झालेल्या कारवाईत एकूण ४७७ अतिक्रमणे निष्कासित करण्यात आली होती. त्यानंतर मंगळवार, १ जुलै रोजीही महापालिकेच्या पथकाने ३६२ अतिक्रमणे निष्कासित करण्याची कारवाई केली.



महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक जी. श्रीकांत यांच्या आदेशानुसार आणि अतिक्रमण विभागाचे नियंत्रण अधिकारी संतोष वाहुळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. ३० जून रोजी महानुभाव चौक ते नक्षत्रवाडी दरम्यान करण्यात आलेल्या कारवाईत हॉटेल्स, लॉज, दुकाने, शेड, कंपाउंड, ओटे, गॅरेज, वॉशिंग सेंटर, कमान, जाहिरात फलक यांसारख्या पक्क्या व कच्च्या अतिक्रमणांवर कारवाई करण्यात आली. मंगळवार, १ जुलै रोजी नक्षत्रवाडी ते महानुभाव चौक या मार्गावरील अतिक्रमण हटवण्यासाठी सकाळपासून कारवाई सुरू आहे. या कारवाईत महापालिकेचे ३५० अधिकारी-कर्मचारी तसेच पोलिस विभागाचे ४०० अधिकारी व कर्मचारी सहभागी झाले आहेत. यासाठी १० जेसीबी, ४ पोकलॅन, १५ टिप्पर, २ रूग्णवाहिका, २ कोंडवाडा वाहने, २ अग्निशमन बंब, ४ इलेक्ट्रिक हायड्रॉलिक वाहने यांचा वापर करण्यात येत आहे.

नगररचना विभागाचे उपसंचालक मनोज गर्जे, कार्यकारी अभियंता अमोल कुलकर्णी, सहायक पोलीस आयुक्त रणजीत पाटील, अतिक्रमण उपायुक्त सविता सोनवणे, सहायक आयुक्त अर्जुन गिराम, प्राजक्ता वंजारी, अर्चना राजपूत, रमेश मोरे, संजय सुरडकर, अशोक गिरी, समीउल्लाह, भारत बिरारे, राहुल जाधव, नईम अन्सारी, इमारत निरीक्षक कुणाल भोसले, शिवम घोडके, सागर श्रेष्ठ, तृप्ती जाधव, सय्यद जमशेद, मजहर अली, नगररचना विभागाचे सौरभ साळवे, सूरज संवडकर, राहुल व नागरी मित्र पथकाचे प्रमोद जाधव हे अधिकारी व कर्मचारी कारवाईत सहभागी झाले आहेत. नक्षत्रवाडी ते महानुभाव चौक मार्गावर मोठ्या प्रमाणात सुरू असून, सर्व अतिक्रमणे हटवली जातील, अशी माहिती संतोष वाहुळे यांनी दिली.

### तीन दिवसात १ हजार ६१२ अतिक्रमणे जमिनदोस्त

■ महानगरपालिकेच्या वतीने सर्व्हिस रोडवर करण्यात आलेल्या अतिक्रमणविरोधी कारवाईस केंब्रिज चौकापासून सुरुवात करण्यात आली. २८ जून रोजी केंब्रिज चौक ते चिकलठाणा दरम्यान ४९० अतिक्रमणे, २९ जून रोजी चिकलठाणा ते एपीआय कॉर्नरदरम्यान ६४५ अतिक्रमणे, ३० जून रोजी महानुभव आश्रम चौक ते नक्षत्रवाडीदरम्यान ४७७ अतिक्रमणे जमिनदोस्त करण्याची कारवाई केली. तीन दिवसा महानगरपालिकेच्या अतिक्रमण विरोधी पथकाने एक हजार ६१२ अतिक्रमणे जमिनदोस्त केली.

# माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांना अभिवादन




**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी**

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती मंगळवार, १ जुलै रोजी उत्साहात साजरी करण्यात आली. सिडको बसस्थानक परिसरातील वसंतराव नाईक चौकात माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यासाठी विविध पक्ष-संघटनांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सकाळपासूनच गर्दी केली होती.

माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती मंगळवारी उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी सेवा प्रतिष्ठान व रामराज्य युवा प्रतिष्ठानतर्फे वसंतराव नाईक चौकात नरेंद्रसिंग राठोड यांनी बंजारा बोली भाषेतील गीते सादर करुन वसंतराव नाईक यांना अभिवादन केले. बंजारा समाजाचे ज्येष्ठ नेते बाबूराव पवार, वसंतराव नाईक शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव नितीन राठोड, पांढरे वादळ चे संयोजक राजपालसिंग राठोड, शहर जिल्हा कॉंग्रेसचे शहराध्यक्ष शेख युसूफ, माजी सभापती इक्बालसिंग गिल, बाबुराव कवसकर, अनिस पटेल, शेख कैसर बाबा, हरीभाऊ राठोड आदींनी माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यास अभिवादन केले.

# गुटख्याची वाहतूक करणाऱ्यास अटक ; २६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

महाराष्ट्रात बंदी असलेल्या सुगंधित गुटख्याची साठवणूक करुन वाहतूक करणाऱ्यास अन्न व औषध प्रशासन विभाग आणि शहर वाहतूक शाखा पोलिसांनी संयुक्त कारवाई करीत गजाआड केले. ही कारवाई २८ जून रोजी वाळूज परिसरातील ओॲसिस चौकात करण्यात आली.

महाराष्ट्रात बंदी असलेल्या सुगंधित गुटख्याची साठवणूक करुन एक जण दुचाकी क्रमांक (एमएच-२०-जीवाय-३९३१) वर घेवून जात असल्याची माहिती शहर वाहतूक शाखेचे उपनिरीक्षक श्रीशंकर शिरसाठ यांना मिळाल होती. उपनिरीक्षक शिरसाठ, अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी प्रशांत कुचेकर यांनी वाळूज परिसरातील ओॲसिस चौकात खबऱ्याने सांगितलेली दुचाकी अडवून दुचाकीस्वार वसीम अब्दुल रौफ (३५ वर्ष), रा. हरीमस्जिदजवळ, नवाबपुरा याला ताब्यात घेतले.

पोलिसांनी त्याच्याजवळील बॅगेची झडती घेतली असता बॅगेत २६ हजार १०० रुपये किंमतीचा सुगंधित तंबाखूचा आणि गुटख्याचा साठा मिळून आला.

पोलिसांनी गुटख्याचा साठा आणि गुटखा वाहतूक करण्यासाठी वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. याप्रकरणी अन्न व औषध प्रशासन विभागाचे अधिकारी प्रशांत कुचेकर यांनी दिलेल्या तक्रारीवरुन वसीम अब्दुल रौफ याच्याविरुध्द एमआयडीसी वाळूज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## चोरट्याने दुचाकी पळवली

**छत्रपती संभाजीनगर :** बजाजनगर, साई मंदिराच्या पाठीमागून वेदांत कोल्हे यांची बजाज पल्सर क्रमांक (एमएच-३७-एड़-८८३१) ही अंदाजे २५ हजार रुपये किंमतीची दुचाकी अज्ञात चोरट्याने २४ जून च्या रात्री ते २५ जूनच्या सकाळ दरम्यान चोरून नेली. या प्रकरणी वेदांत कोल्हे यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दुचाकी चोरुन नेणाऱ्या चोरट्याविरुध्द वाळूज एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# भावसिंगपुऱ्यात अल्पवयीन मुलीचा बालविवाह रोखला

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

पाच लाख रूपये घेऊन एका सतरा वर्षीय मुलीचा गुजरातच्या मुलाशी होणारा बालविवाह पोलिसांनी रोखला. भावसिंगपुरा परिसरातील लालमाती परिसरात २९ जून रोजी ही कारवाई करण्यात आली. पोलिस आलेले पाहताच गुजराती वऱ्हाडी मंडळी गायब झाली. या प्रकरणी छावणी ठाण्यात नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी नातेवाईकांना नोटीसा बजावल्या आहेत.

भावसिंगपुरा परिसरातील लालमाती येथील १७ वर्षीय अल्पवयीन मुलीचा गुजरात येथील २२ वर्षे पूर्ण झालेल्या तरुणाशी विवाह लावला जात असल्याची माहिती छावणी ठाण्याचे प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक डॉ. विवेक जाधव यांना मिळाली होती. त्यानुसार त्यांनी अंमलदार रवींद्र देशमुख, जालिंदर मान्टे, धर्मेंद्र राठोड यांना तेथे पाठविले. सोबतच बाल कल्याण समितीचे अधिकारी रितेश धुर्वे यांना पाचारण केले. पोलीस तेथे पोहोचले तेव्हा एका गल्लीत मंडप दिसला. तेथे ५० वऱ्हाडी मंडळी दिसून आले. दुसऱ्या बाजुला स्वयंपाक सुरु होता. मंडपात लग्नात मुलीला देण्यासाठी संसार उपयोगी साहित्य ठेवण्यात आले होते. पोलिसांनी मुलीच्या पालकांना वयाचे पुरावे मागितले, तेंव्हा त्यात ती १७ वर्षाची असल्याचे उघड झाले.

### गरिबीमुळेच बालविवाह

■ मुलीचे वडील मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करतात. गुजरात येथील व्यापारी कुटुंबातील मुलाचे स्थळ चालून आले. चांगल्या घरी मुलगी जात असल्याने आणि त्यांनी पाच लाख रुपये देण्याची तयारी दाखविल्यामुळे मुलीचा बालविवाह लावला जात होता, असा संशय आहे. दरम्यान, पोलिस घटनास्थळी जाण्यापूर्वी त्या भागातील समाजसेवकांनी या लग्नाला विरोध केला होता.

## डोणगावकर विद्यालयाचे विलास लहिरे यांचा सेवा गौरव

**लासूर स्टेशन /प्रतिनिधी**

गंगापूर तालुक्यातील डोणगाव येथील लोकनेते साहेबराव पाटील डोणगावकर माध्यमिक विद्यालयाचे सहशिक्षक विलास लहिरे यांचा सेवा गौरव समारंभ ३० जून रोजी उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी विलास लहिरे यांचा गंगापूर तालुका एज्युकेशन सोसायटीच्या वतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. यावेळी गंगापूर तालुका एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षा इंदुमती डोणगावकर, संस्थेच्या सचिव देवयानी डोणगावकर, गंगापूर सहकारी साखर कारखान्याचे



चेअरमन कृष्णा डोणगावकर, युवा नेते पृथ्वीराज डोणगावकर, मुख्याध्यापक गोविंद हिवाळे, माजी मुख्याध्यापक बी. जी. बनसोडे, गुंजाळ, कुलकर्णी, गंगापूर सहकारी साखर कारखान्याचे संचालक गजहंस, गंगापूर तालुका एज्युकेशन सोसायटीचे संचालक कदम, कांता सरोवर यांची प्रमुख उपस्थिती

# सेवानिवृत्त पोलिसाला दोन लाखांना लुटले

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

लाडगाव येथील सेवानिवृत्त पोलिस कर्मचारी आपल्या पत्नीला सोबत घेऊन कुंभेफळ येथील भारतीय स्टेट बँकेतून दोन लाख रुपये काढून लाडगाव येथे रिक्षातून जात होते. त्यावेळी अज्ञात महिलेने ब्लेडच्या साह्याने पिशवी कापून २ लाख रुपये पळविले. ही घटना २६ जून रोजी दुपारी अडीच वाजता छत्रपती संभाजीनगर-जालना मार्गावर घडली.

निवृत्त पोलिस कर्मचारी आनंदरूप माणिकराव बागल (रा. लाडगाव) यांनी करमाड पोलिस ठाण्यात दिलेल्या तक्रारीत म्हटले




की, २६ जून रोजी दुपारी पत्नीसह भारतीय स्टेट बँक, शाखा कुंभेफळ येथे जाऊन बँकेतून २ लाख रुपये काढले. काढलेले पैसे त्यांनी एका कापडाच्या पिशवीत टाकून ते लाडगाव येथे जाण्यासाठी दुपारी अडीच वाजता कुंभेफळ पोलिस चौकीजवळ येऊन थांबले. दरम्यान, या ठिकाणी अगोदरच एक रिक्षा उभी होती. त्या रिक्षात एक महिला बसलेली होती. त्यानंतर बागल हे पत्नीसह रिक्षात बसत असताना, एका हिरव्या पंजाबी ड्रेस घातलेल्या महिलेने त्यांच्या पत्नीला धक्का दिला. मी माझ्या हातातील पिशवीत ठेवलेले पैसे मांडीवर घेऊन बसलो. नंतर मला पिशवी खालच्या बाजूने ब्लेडने कापल्याचे दिसून आले. तसेच पिशवीतील पैशाची चोरी झाल्याचे निदर्शनास आले. घटना घडल्यानंतर बँकेत जाऊन सीसीटीव्ही कॅमेरे तपासले असता दोन अनोळखी महिला आमच्या जवळच घुटमळताना दिसून आल्या. पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# वृद्धेची सोनसाखळी लंपास

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी**

जवळच्याच रेशनच्या दुकानावर मोफत धान्य, कपडे व २ हजार रोख वाटप सुरू असल्याचे सांगून हातचलाखीने दोघांनी वृद्धेच्या गळ्यातील सोनसाखळी लंपास केली. २८ जून रोजी सायंकाळी ५.३० वाजता शहागंजसारख्या वर्दळीच्या भागात ही चोरी झाली.

कमल पाडळकर (रा. शहागंज) या २८ जून रोजी सायंकाळी महादेव मंदिराच्या दिशेने पायी जात होत्या. तेथील पेट्रोल पंपासमोर एका अज्ञाताने त्यांना आवाज देऊन थांबवले. जवळच मोफत धान्य, कपड्यांसह पैशांचे वाटप सुरू असल्याचे सांगितले. पाडळकर यांनी त्याला स्पष्ट नकार दिला. मात्र, त्याने तुम्हाला गरज नसेल तर तुम्ही घेऊन गरिबाला द्या, असे म्हणत त्यांचा विश्वास जिंकला. पाडळकर त्यांच्यासोबत जात असताना त्याने गरीब दिसण्यासाठी गळ्यातील साखळी काढून पिशवीत ठेवण्यास सांगितले. मात्र, त्याच दरम्यान त्याने ती हातचलाखीने लंपास करत पोबारा केला. सोबत त्याचा साथीदारही होता. बराच वेळ होऊनही तो परत न आल्याने पाडळकर यांना आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आले. यात चोरांनी त्यांची ५.५ ग्रॅमची सोनसाखळी लंपास केली.

### अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांचे प्रतिपादन

# छायाचित्र प्रदर्शनातून उलगडणार आणीबाणीतील घटनांचा इतिहास

**छत्रपती संभाजी नगर/प्रतिनिधी**

देशात २५ जून १९७५ रोजी आणिबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला २५ जून रोजी ५० वर्ष पूर्ण झाली आहेत. या काळात ज्या नागरिकांनी तुरुंगवास भोगला व भुमिगत राहून कार्य केले अशा नागरिकांचा इतिहास छायाचित्र व माहितीच्या स्वरुपात प्रदर्शनाच्या माध्यमातून पाहण्यास मिळत आहे. या प्रदर्शनाच्या माध्यमातून आणिबाणीतील सर्व घटनाक्रम व इतिहास नागरिकांना विविध वर्तमानपत्रातून आलेल्या बातम्या आणि छायाचित्राच्या माध्यमातून अनुभवण्यास मिळत आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी सोमवार, ३० जून रोजी केले.

जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आणीबाणीच्या कालावधीतील छायाचित्र व माहिती प्रदर्शनाचे आयोजन जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले, आहे. या प्रदर्शनाचे फित कापून जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांच्या हस्ते सोमवारी उद्घाटन करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाच्या उपजिल्हाधिकारी संगीता राठोड, भूसंपादन विभागाचे उपजिल्हाधिकारी एकनाथ बंगाळे, माहिती अधिकारी डॉ. मीरा ढास, छायाचित्रकार अनिल परदेशी आदींची उपस्थिती होती. अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने पुढे म्हणाले की, आपला देश हा लोकशाही पुरस्कृत देश आहे. १९७५ ला देशात आणीबाणी लागली यावेळी अनेक नागरिकांना तुरुंगास भोगावा लागला.

दरम्यान, तत्कालीन मराठवाड्यासारख्या दैनिकातून आणीबाणी संदर्भातील असलेल्या विविध घटनांचा वृत्तांत व त्या आठवणी या प्रदर्शनाच्या माध्यमातून जागृत होत असल्याचे अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी सांगितले. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रवेशद्वाराजवळ हे प्रदर्शन सर्वांसाठी खुले असून नागरिकांनी या प्रदर्शनास भेट द्यावी, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.




### आणीबाणीत अनेकांनी भुमिगत राहून कार्य केले

■ लोकशाहीचे महत्त्व अधोरेखीत राखण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले आहेत. आणीबाणीच्या काळात अनेकांनी भुमिगत राहून कार्य केली. या सर्व सहभागी नागरिकांना शासनातर्फे मानधन देण्यात येते असे अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी यावेळी सांगितले. तसेच या आणीबाणीत सहभाग घेतलेल्या व्यक्तींप्रती अप्पर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकूने यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

# कारच्या धडकेत दुचाकीस्वार शेतकरी ठार ; गाढेजळगाव फाटा येथील घटना

**करमाड/प्रतिनिधी**

डेअरीवर दुध टाकून दुचाकीवरून घरी जात असताना भरधाव कारने धडक दिल्याने दुचाकीस्वार शेतकरी जागीच ठार झाला. ही घटना छत्रपती संभाजीनगर-जालना महामार्गावरील गाढेजळगाव फाटा येथे २९ जून रोजी घडली.

गंगाधर बाबासाहेब घोडके (३५ वर्ष), रा. गाढेजळगाव, ता छत्रपती संभाजीनगरअसे अपघातात मृत्यू झालेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, गाढेजळगाव येथील गंगाधर घोडके हे शेतीसह दुध व्यवसाय करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. २९ जून रोजी ते नेहमी प्रमाणे सकाळी जनावरांचे शेण पाणी करून दुध टाकण्यासाठी जालना महामार्गावरील जुना टोल नाका (गोलटगाव फाटा) येथे गेले होते. दुध टाकून ते दुचाकी क्रमांक (एमएच-२०-ईएल-१४७०) वरून जालना महामार्गाने घराकडे परत येत होते. दरम्यान गाढेजळगाव फाटा येथील दुभाजकावर वळण घेत असतानाच छत्रपती संभाजीनगरकडून आलेल्या भरधाव कार क्रमांक (एमएच-२०-जीझेड-२६११) ने त्यांच्या दुचाकीला जोराची धडक दिली. अपघातात गंभीर जखमी झालेल्या गंगाधर घोडके यांना करमाड पोलिस ठाण्याचे सहाय्यक निरीक्षक प्रताप नवघरे यांनी स्थानिक नागरिकांच्या मदतीने उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर येथील घाटी रुग्णालयात



दाखल केले असता डॉक्टरांनी तपासून मयत घोषित केले. याप्रकरणी करमाड पोलिस ठाण्यात कारचालकाविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास उपनिरीक्षक भारत निकाळजे करीत आहेत.

दर रविवारी मोफत तपासणी



नस कमजोरी, शिघ्रपतन, थंडपणा, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा.
डॉ. ए. एच. शेख
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बस स्टॅण्डसमोर, हॉटेल मिझाजवळ, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)
9021111549 / 7020614645
www.drshaikhah.com

## न्यूज ब्रीफ

### पावसामुळे विद्युत पुरवठा खंडीत

**करमाड :** लाडसावंगी येथे पाऊस पडला की, वीजपुरवठा अनेक तास खंडित होतो. मात्र, यावर काही उपाय आहे की नाही, असा प्रश्न नागरिकांना पडला आहे. या वीज उपकेंद्रातून २२ गावांना वीजपुरवठा होतो. दरवर्षी पावसाळा सुरू होताच, लाडसावंगीतील वीजपुरवठा खंडित होण्याची जणू परंपराच आहे. वारे वादळ नसताना पावसाचे अगदी चार थेंब येताच, वीजपुरवठा बराच वेळ खंडित होतो. यात नागरिक व व्यावसायिकांचे हाल होत आहेत. शेतकऱ्यांना शेतीसाठीही पाणी वापरता येत नाही. लोकप्रतिनिधी लक्ष देत नसल्याने वीज वितरण कंपनीची मनमानी वाढली आहे.

### अवैध दारू विक्री; महिलेविरोधात गुन्हा

**गंगापूर :** तालुक्यातील गाजगाव शिवारात २६ जून रोजी दुपारी ३ वाजता अवैधरीत्या सुरू असलेल्या देशी दारूच्या अड्ड्यावर शिल्लेगाव पोलिसांनी छापा टाकला. यात, काशीबाई रामदास सुरासे (५८ वर्षे), रा.गाजगाव, गंगापूर या महिला आरोपीस अटक करून तिच्या ताब्यातून ५ हजार १५० रुपयांची दारू जप्त केली. या प्रकरणी पोलिस अंमलदार तात्यासाहेब बेंद्रे यांच्या फिर्यादीवरून महिला आरोपी सुरासे विरोधात शिल्लेगाव पोलिस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस अंमलदार दाणी अधिक तपास करीत आहेत.

### भालगाव येथून बकरी चोरीला

**वैजापूर :** तालुक्यातील भालगाव येथून चोरट्यांनी बकरी चोरून नेली. ही घटना २९ जूनच्या मध्यरात्रीच्या सुमारास घडली. लताबाई दादासाहेब शिंदे यांनी त्यांची बकरी घरासमोर बांधून ठेवली होती. ही बकरी चोरट्यांनी रात्रीच्या सुमारास चोरून नेली. या बकरीची किंमत १५ हजार रुपये इतकी होती. याप्रकरणी अज्ञात चोरट्याविरुद्ध विरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तपास हवालदार भालेराव हे करीत आहेत.

### अजय बनकर यांची निवड



**टेंभुर्णी :** जाफ्राबाद तालुक्यातील टेंभुर्णी काँग्रेस पक्षाच्या ब्लॉक अध्यक्षपदी अजय बनकर यांची नुकतीच निवड करण्यात आली. अजय बनकर यांची ब्लॉक अध्यक्षपदी नियुक्ती करण्याचे आदेश काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले होते. अजय बनकर यांची ब्लॉक अध्यक्षपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्वत्र त्यांचे कौतुक करण्यात येत आहे.

---

जिल्ह्यात ८० टक्के पेरणी पूर्ण : पावसाअभावी शेतकरी चिंताग्रस्त

# अत्यल्प पावसामुळे गंगापूरातील चार गावांवर दुबार पेरणीचे संकट

छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी



जिल्ह्यात सर्वदूर पेरणीयोग्य पाऊस झाल्याने बळीराजा पेरणीला लागला आहे. कृषी विभागाकडून प्राप्त आकडेवारीनुसार, जिल्ह्यात ८० टक्क्यांपेक्षा अधिक क्षेत्रावर खरिपाची पेरणी झाली. गंगापूर तालुक्यातील ४ गावांत पेरणीनंतर पुरेसा पाऊस न पडल्याने तेथे दुबार पेरणीचे संकट ओढवले असल्याने शेतकरी चिंतेत सापडला आहे.

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात मे महिन्यात अवकाळी पावसाने थैमान घातले होते. यामुळे शेतकऱ्यांना खरीप हंगामपूर्वी जमिनीची मशागत जूनच्या पहिल्या आठवड्यात करावी लागली. जिल्ह्यात सुमारे ६ लाख ८१ हजार ९०३ हेक्टरवर खरीप हंगामासाठी पेरणीयोग्य क्षेत्र आहे. चालू महिन्यात जिल्ह्यात पडत असलेल्या रिमझिम पावसाच्या जोरावर शेतकरी पेरता झाला असून आतापर्यंत साडेपाच लाख हेक्टरवर पेरणी झाली आहे. जिल्ह्यात पेरणीसाठी आवश्यक ६ इंच ओल निर्माण होताच शेतकऱ्यांनी पेरणीला प्राधान्य दिले. पेरणीनंतर पुरेसा पाऊस पडला तर पीक चांगल्या प्रकारे उगवून येते. गंगापूर तालुक्यात भेंडाळा, मोजाबाद, सिरसगाव आणि गंगापूर या चार गावांच्या शिवारात आवश्यक पाऊस पडला नाही. परिणामी, या गावांतील शेतकऱ्यांनी पेरलेल्या सोयाबीनसह अन्य पीक उगवून आले नाही. जमिनीत पडलेल्या ओलीवर बियाणे केवळ फुगले. मात्र, त्याला कोंब फुटलेच नसल्याचे जिल्हा कृषी अधीक्षक प्रकाश देशमुख यांनी सांगितले. या चार गावांत पुरेसा पाऊस न झाल्याने तेथील शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट ओढवल्याचे त्यांनी नमूद केले.

### जिल्ह्यात ११० मिमी पावसाची नोंद

■ जिल्ह्यात गेल्या वर्षी १ ते ३० जून या कालावधीत सुमारे १२५ मि.मी. पावसाची नोंद झाली होती. या वर्षी कालपर्यंत जिल्ह्यात १३७ मि.मी. पावसाची नोंद झाल्याची माहिती महसूल विभागाने दिली. मागील २९ दिवसांत सरासरी पडणाऱ्या पावसाच्या ११० टक्के हा पाऊस असल्याचे दिसून येते. असे असले तरी सर्व तालुक्यात व सर्व मंडळात पाऊस पडत नसल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे.

---

## सहा दिवसात होणार १८ महाराजांची कीर्तने

श्री संत मारुती महाराज दस्तापूरकर पुण्यतिथीनिमित्त कार्यक्रम

परभणी /प्रतिनिधी



श्री संत मारुती महाराज दस्तापूरकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त आणि त्यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त पंढरपूर येथील श्री संत मारुती महाराज संस्थानमध्ये ४ ते ९ जुलै या कालावधीत विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या सहा दिवसांच्या कालावधीत एकूण १८ महाराजांची कीर्तने, प्रवचने, भजन संध्या, ज्ञानेश्वरी पारायण व कथेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमाची सुरुवात ४ जुलै रोजी ह. भ. प. ज्ञानेश्वर महाराज डाके, डॉ. तुकाराम महाराज गरुड व योगीराज महाराज गोसावी यांच्या कीर्तनाने होणार आहे. ५ जुलै रोजी सोपान महाराज सानप शास्त्री, विजयकुमार फड व तुकाराम महाराज जेऊरकर यांची कीर्तने पार पडतील. ६ जुलै रोजी उमेश महाराज दशरथे, योगी नीरजनाथ आणि अर्जुन महाराज लाड गुरुजी कीर्तनाद्वारे भक्तिरस पेरणार आहेत. ७ जुलै रोजी मुकुंदकाका जाटदेवळेकर, विवेकानंद वासकर महाराज आणि ज्ञानेश्वर महाराज कदम यांच्या प्रवचनाने वातावरण भक्तिमय होणार आहे.

८ जुलै रोजी पुरुषोत्तम महाराज पाटील, अॅड. जयवंत महाराज बोधले व स्वामी हरी चैतन्य महाराज पळसखेडकर यांची कीर्तने रसिकांना अनुभवता येणार आहेत. ९ जुलै रोजी कार्यक्रमाची सांगता ज्ञानेश्वर महाराज पठाडे, सुदाम महाराज पानेगावकर आणि महादेव महाराज शास्त्री बोराडे यांच्या कीर्तनाने होणार आहे. या पावन धार्मिक सोहळ्याला परभणी जिल्ह्यातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन ह. भ. प. अच्युत महाराज दस्तापूरकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

---

## डॉ. संजय मेढे यांचा पुरस्काराने गौरव



परभणी /प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व दिल्ली येथील आर्ट ऑफ मॅजिक युनिव्हर्सिटी मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने डॉक्टरेट पुरस्कार अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय मेढे यांना नुकताच प्रदान करण्यात आला आहे.

अखिल भारतीय कैकाडी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष डॉ. संजय मेढे यांना महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार व दिल्ली येथील आर्ट ऑफ मॅजिक युनिव्हर्सिटी मॅजिक बुक ऑफ रेकॉर्डच्या वतीने डॉक्टरेट पुरस्कार मिळाल्याबद्दल कैकाडी महासंघाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दिगंबर जाधव, अशोक गायकवाड, अरुण जाधव, शिवाजीराव जाधव, विठ्ठल गायकवाड, राजाभाऊ जाधव, अंकुश जाधव, सुनील जाधव, संजय गायकवाड, मोतीराम जाधव, लखन जाधव, रामचंद्र जायभाय आदींची उपस्थिती होती.

### ३ घरफोड्या; ७ लाख रुपयांचा ऐवज लंपास

**जायकवाडी :** पैठण तालुक्यातील इसारवाडी येथे चोरट्यांनी तीन घरांचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. या तिन्ही घरांतून एकूण ७ लाख ९ हजार रुपयांचा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. ही घटना २७ जून रोजी मध्यरात्री घडली. याप्रकरणी एमआयडीसी पैठण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २७ जून रोजी रात्री दोनच्या सुमारास फिर्यादी विशाल शिवाजी काळे (रा. इसारवाडी, ता. पैठण) यांच्या बंद घरासह त्यापासून शंभर मीटर अंतरावरील इतर दोन घरांच्या दरवाजांचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. चोरट्यांनी तिन्ही घरांतील ७ लाख ९ हजार २०० रुपयांचा ऐवज लंपास केला.

## रस्ता अडवून विवाहितेचा विनयभंग; पतीवर चाकूहल्ला

सिल्लोड/प्रतिनिधी

शहरातील किराणा दुकानावर जाणाऱ्या ३२ वर्षीय विवाहितेचा रस्ता अडवून एकाने विनयभंग केला. यानंतर जाब विचारण्यासाठी गेलेल्या पतीवर आरोपीने चाकूहल्ला केला. याप्रकरणी दोन आरोपींविरुद्ध सिल्लोड शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला. ही घटना २८ जून रोजी सायंकाळी ६ वाजता टिळकनगरमध्ये घडली.

पीडित ३२ वर्षीय विवाहिता तिच्या मुलीसोबत किराणा दुकानावर जात असताना आरोपी समीर (रा. सिल्लोड) याने महिलेचा हात पकडून तू मला खूप आवडते, असे म्हणून विवाहितेला लज्जा वाटेल, असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. घटनेची माहिती मिळाल्यानंतर विवाहितेचा पती जाब विचारण्यासाठी गेला असता, आरोपी समीर व त्यासोबत असलेल्या एकाने पती-पत्नीला बेदम मारहाण केली.

पतीच्या खांद्यावर चाकूने हल्ला केला. जखमीवर उपजिल्हा रुग्णालयात उपचार करण्यात आले. पीडितेने दिलेल्या तक्रारीवरून सिल्लोड शहर ठाण्यात समीर व त्याच्या सोबतच्या एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोलिस निरीक्षक शेषराव उदार करत आहेत.

### गोवंश वाहतूक, चालकावर गुन्हा दाखल

**वैजापूर :** गोवंश जनावरांची वाहतूक करणाऱ्या पिक अप चालका विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई समृद्धी महामार्गावर २८ जून रोजी दुपारी दोन वाजता करण्यात आली. सोपान बाबासाहेब पवार (रा डोणवाडा ता जि छत्रपती संभाजीनगर) असे आरोपी पिकअप चालकाचे नाव आहे. सोपान पवार हा त्याच्या पिकअप मधून बेकायदा बैलांची वाहतूक करताना मिळून आला. पोलीसांनी पिक अप व बैल असा ६ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी पोलिस अंमलदार गणेश कुलट यांनी दिलेल्या फिर्यादीवरून चालक सोपान बाबासाहेब पवार याच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---

## 'त्या' हत्या प्रकरणातील दोन आरोपी सीसी कॅमेऱ्यात कैद

आरोपीच्या शोधासाठी तीन पथकांची स्थापना

वैजापूर/प्रतिनिधी

तालुक्यातील चिंचडगाव येथील कीर्तनकार महिलेच्या खून प्रकरणात सोमवारी पोलिसांच्या हाती लागलेल्या सीसीटीव्ही फुटेजमध्ये दोन चोरटे कैद झाले आहेत. पोलिस त्या दृष्टीने आरोपींना शोधत आहेत.

वैजापूर तालुक्यातील चिंचडगाव येथील सद्गुरू नारायणगिरी कन्या आश्रमात २७ जून रोजी रात्री चोरट्यांनी संगीता आण्णासाहेब पवार (४५ वर्षे) या कीर्तनकार महिलेचा खून केल्याची घटना घडली होती. या प्रकरणात विरगाव पोलिसांनी अद्याप एकाही आरोपीस अटक केलेली नाही. सोमवारी या प्रकरणात पोलिसांना आश्रमातील सीसीटीव्ही फुटेज मिळाले. त्यात अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटातील दोन चोरटे दिसत असून, ते एकमेकांशी हिंदी भाषेत बोलत आहेत. हे दोघे प्रारंभी आश्रमातील मोहटा देवी मंदिराचे चॅनल गेट लोखंडी सळईने तोडत आहेत.

ते तुटत नाही. त्यानंतर त्यातील एकाच्या निदर्शनास सीसीटीव्ही येतो. तो पाहून लोखंडी सळईने सदरील सीसीटीव्ही तोडतो. पोलिस त्या दृष्टीने तपास करीत आहेत. दरम्यान, या प्रकरणात तपासासाठी तीन पथकांची स्थापना केली आहे, अशी माहिती सहायक पोलिस निरीक्षक शंकर वाघमोडे यांनी दिली.

### शिक्षणाचा मार्ग खडतर



**अंजिठा :** सिल्लोड तालुक्यातील अंजिठा येथे असलेल्या उर्दू शाळेसमोरुन गटाराचे दुर्गंधीयुक्त पाणी वाहत असल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. शाळेसमोरुन वाहणाऱ्या गटाराची दुरुस्ती ग्रामपंचायतीने करावी अशी मागणी अंजिठा येथील ग्रामस्थातून करण्यात येत आहे.

(छाया : मजहर पठाण)

## महसूल पथकाकडून २५ ब्रास वाळूसाठा जप्त

परभणी /प्रतिनिधी

मानवत तालुक्यातील रामपुरी बु शिवारात नदी पात्राजवळ महसूल पथकाने २७ जून रोजी रात्री साडेआठ वाजता २५ ब्रास वाळूसाठा जप्त केला आहे. तसेच वाळूची अवैध वाहतूक करणाऱ्या वाहनावर कारवाई करीत दीड ब्रास वाळूही जप्त केली आहे.

तालुक्यातील रामपुरी बु शिवारात गोदावरी नदी पात्राजवळ २५ ते ३० ब्रास वाळूसाठा करून टेम्पोतून वाळूची अवैध वाहतूक केली जात असल्याची माहिती महसूल पथकाला मिळाली. माहितीच्या आधारे तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली मंडळ अधिकारी डी. बी. टेकाळे, ग्राम महसूल अधिकारी राम घुले, एम. आर. जाधव, महसूल सेवक अर्जुन तलवारे, अशोक यशोदे, चालक कच्छवे यांच्या पथकाने टेम्पोला अडवून तपासणी केली. यामध्ये अंदाजे एक ते दीड ब्रास वाळू आढळली. दरम्यान, नदीपात्राजवळ असलेला २५ ते ३० ब्रास वाळूसाठा जप्त करण्यात आला. ही वाळू तहसील कार्यालयाच्या परिसरात आणून टाकण्यात येत आहे. या वाळूचे वाटप घरकूल योजनेतील लाभार्थ्यांना करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार पांडुरंग माचेवाड यांनी दिली.

---

भोकरदन तालुक्यातील बळीराजाचा आर्त टाहो

# सरकार..मायबाप सांगा..कसे जगायचे आम्ही..?

गणेश खिस्ते

**पिंपळगावरेणुकाई :** भोकरदन तालुक्यात मागील पाच वर्षापासुन सतत वरुण राजाची अवकृपा असल्याने, कपाशी, तुर, सोयाबिन या पिकाचे अतोनात नुकसान होऊन, उत्पादनात घट आल्याने बळीराजा अक्षरशः मेटाकुटीस आला आहे. एकीकडे निसर्गाचा असमतोल तर दुसरीकडे शेतीपयोगी साहीत्याचे गगनाला भिडलेले दर यामुळे बळीराजाचे आर्थिकदृष्ट्या कंबरडे मोडले आहे. त्यामुळे सरकार.. मायबाप सांगा.. कसे जगायचे आम्ही... असा आर्त टाहो भोकरदन तालुक्यातील बळीराजा करीत आहे.

गेल्या काही वर्षापासून कधी ओला तर कधी कोरडया दुष्काळाची मालिका संपत नाही. निसर्गावर मात करणे अवघड असले तरी शासनाने आर्थिक मदत देऊन शेतकऱ्यांचा आर्थिक भार कमी होऊ शकतो परंतु ते सुध्दा होत नसल्याने शेतकरी हा राजकीय अनास्थेचा बळी ठरत असल्याचे वास्तव आहे. आधुनिक युगात शेतीचे संदर्भ बदलले असून, विकसित शेती करण्यावर भर दिल्या जात आहे. परंतु कोरडवाहू शेतीचे प्रमाण तालुक्यात जास्त असून सिंचन सुविधा मोजक्याच शेतकऱ्यांकडे उपलब्ध आहे. अशातच दरवर्षी रासायनिक खताचे वाढते दर, मजुरांच्या मजुरीत वाढ, मशागतीसह लागवडीवर येणाऱ्या खर्चात वाढ, रोपटे वर आल्यापासून कीटकनाशक औषधीवर होणारा खर्च अर्थात पेरणी ते मळणी पर्यंत व शेतकऱ्याच्या घरात माल येईपर्यंत खर्च करावा लागतो. निसर्गाच्या असमतोल व लहरीपणामुळे उत्पादनात आलेली घट ही शेतकऱ्यांना न परवडणारी आहे. भोकरदन तालुक्यात हजारो हेक्टर कृषी क्षेत्र असून त्यात, कपाशी मक्का व सोयाबीन खालोखाल काही प्रमाणात तुरीचे सुद्धा उत्पादन घेतले जाते. परंतु अशा प्रतिकुल वातावरणाने विपरीत परिणाम होत असतात, आता कपाशी, मक्का, सोयाबिन, तुरी पाठोपाठ रब्बीतील हरबरा, गहू ही पिके सुध्दा हातची जाण्याची भिती शेतकऱ्यांना सतावत असते. आर्थिक विवंचनेत तालुक्यातील शेतकरी राजा सापडला आहे. स्वत:ला शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून घेणारी नेते मंडळी शेतकऱ्यांच्या मुलभूत प्रश्नाकडे लक्ष देण्याऐवजी दुसऱ्याच प्रश्नाकडे लक्ष देत असल्यामुळे शेतकऱ्यांचा वाली कोण असा सवालही शेतकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे.



### शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे गरजेचे

■ शेतकऱ्यांविषयी लोकप्रतिनिधी यांचे प्रेम हे पुतना मावशी प्रमाणेच झाले असल्याचे दिसून येते. भोकरदन तालुक्यातील शेतकरी निसर्गाच्या अवकृपेत सापडला असून या शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे गरजेचे आहे. परंतु, ते पुसणार कोण असा सवालही शेतकऱ्यांतून उपस्थित केला जात आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्याचे वचन येवून त्यांच्या सन्मान निधीत वाढ करण्याची घोषणा महायुतीच्या नेत्यांनी केली होती. परंतु सत्तेच्या सिंहासनावर बसल्यावर महायुतीच्या नेत्यांना निवडणुकीदरम्यान दिलेल्या आश्वासनांचा विसर पडल असल्याचे शेती व्यवसायाला वैतागलेल्या एका शेतकऱ्याने सांगितले.

---

# तालुका खरेदी-विक्री संघाच्या निवडणुकीत महायुतीचे वर्चस्व

महायुतीचे १४, तर महाविकास आघाडीचा एक उमेदवार विजयी

करमाड/प्रतिनिधी



छत्रपती संभाजीनगर तालुका सहकारी खरेदी विक्री संघाची निवडणूक २९ जून रोजी शांततेत पार पडली आहे. या निवडणुकीत महायुती विरुद्ध महाविकास आघाडी अशी सरळ लढत झाली. महायुतीचे १५ पैकी १४ उमेदवार या निवडणुकीत विजयी झाले असून महाविकास आघाडीचे एकमेव उमेदवार सावता विठ्ठल गाडेकर हे एका मताच्या फरकाने निवडून आले.

या निवडणुकीत महायुतीचे विजयी उमेदवार वैयक्तिक सभासद प्रतिनिधी म्हणून राजेंद्र बाबुराव काकडे, राजेंद्र छगनराव काळे, दिनकर तेजराव गावंडे, शिवाजी सजनराव मते, धरमसिंग त्रिंबक सीसोदे तर महिला राखीव प्रतिनिधी मंदाकिनी भास्कर उकर्डे, नंदा सुरेश पठाडे, इतर मागासवर्गीय शिवाजी पुंजाराम तारव, वीमुक्त जाती, भटक्या जाती, विशेष मागास प्रवर्ग प्रतिनिधी म्हणून किसन गंगाधर वाघ, अनुसूचित जाती जमाती प्रवर्गात बाबासाहेब पुंजाराम मुगदल तर सहकारी संस्था सभासद प्रतिनिधी म्हणून भाऊराव तात्याराव मुळे, श्रीमंत मंन्साराम चौधरी, आप्पासाहेब मारुती शेळके, विठ्ठल सर्जेराव साद्रे हे १४ उमेदवार विजयी झाले आहे.

तर महाविकास आघाडीचे सहकारी संस्था प्रवर्गातून काँग्रेसचे सावता विठ्ठल गाडेकर हे एकमेव उमेदवार एका मताच्या फरकाने निवडून आले आहे.

या निवडणुकीत वैयक्तिक सभासदासाठी एकूण २ हजार ३६२ मतदार होते यापैकी १ हजार ९७७ मतदारांनी मतदानाचा हक्क बजावला यासाठी तीन बूथ उपलब्ध होते. सहकार अधिकारी सुभाष राठोड यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले. सर्व निवडणूक प्रक्रिया पार पडावी म्हणून ३५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

दैनिक महाभूमि

# जालना भूमि

बुधवार । २ जुलै २०२५

jalnabhoomi@gmail.com

न्यूज ब्रीफ

### विझोरा येथील कृषी महाविद्यालयात कृषी दिन साजरा



**धावडा :** भोकरदन तालुक्यातील विझोरा येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज कृषी महाविद्यालयात मंगळवार, १ जुलै रोजी कृषी दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रभारी प्राचार्य लक्ष्मण ठाले, अभिनाश गवळी, गोपाल लाठे, गोपाल लेणेकर, योगेश कानडजे, इतर महाविद्यालयातील कर्मचारी, विद्यार्थी सुरज निकम, किरण मिरगे, अभिषेक जाधव, शुभम मिसाळ यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते.

### पारनेर येथे माजी मुख्यमंत्री नाईक यांची जयंती साजरी



**अंबड :** तालुक्यातील पारनेर येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते व महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व.वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक अभिमन्यू गाढवे होते. ज्येष्ठ शिक्षक राजेश भापकर यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी विश्वनाथ पोटफोडे, दत्ता शेरे व सर्व विद्यार्थी उपस्थित होते .

### रांजनी येथे ८१ जणांनी केले रक्तदान



**परतूर :** रांजनी येथे यूवकांच्या वतीने मुनीरा हॉस्पिटल जामीया कॅम्पस येथे ब्लड डोनेशन कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. नूर हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर बदनापूर यांच्या संयुक्त विद्येमाने आयोजित शिबिरात रांजणी येथील ८१ जणांनी रक्तदान केले. यावेळी सरपंच अमोल देशमुख, सय्यद मकसूद अली, मुदु काझी, मोईन बेग, इरफान तांबोळी, माजी सरपंच राधाकिसन जाधव, जावेद शेख, शफीक अत्तार, अरबाज अत्तार कैलास जाधव आदी उपस्थित होते.

जालना जिल्ह्याची लोकसंख्या १९ लाख ▸ बांधकाम कामगार २ लाख ३८ हजार

# उदंड झाले बांधकाम कामगार!



**विनोद काळे**

**जालना :** २०११ च्या जनगणनेनुसार जालना जिल्ह्याची लोकसंख्या १९ लाख ५९ हजार ४६ एवढी आहे. जालना जिल्हयात शेती हाच प्रमुख व्यवसाय मानला जातो. असे असले तरी जालना जिल्ह्यात इमारत व इतर बांधकाम कामगारांची संख्या ही तब्बल अडीच लाखांवर गेल्याचे दिसत आहे. कामगार कल्याण मंडळाच्या आकडेवारीनुसार जिल्ह्यातील कामगारांची संख्या लक्षणीयरित्या वाढलेली दिसते. दरम्यान, यातील खरे कामगार किती आणि खोटे किती याची चाचपणी आता सुरू झाल्यामुळे बोगस कामगारांसह त्यांची नोंदणी करणारे दलाल आणि कामगार कार्यालयातील अधिकाऱ्यांची धाकधूक वाढली आहे.

राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी कामगार कल्याण मंडळाच्या योजनांमध्ये बोगस कागपत्रांच्या आधारे शासनाची आर्थिक फसवणूक करणाऱ्या दलालांच्या विरोधात कारवाईचा बडगा उगारला आहे. महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या योजनांमध्ये बोगस कागदपत्रांच्या आधारे बोगस कामगारांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी दलाल, एजंटांचे मोठे रॅकेट कार्यरत आहे. काही ठिकाणी या दलालांनी कामगारांच्या नावाने संघटना सुरू केल्याचे भासविले जात आहे. यातून बनावट कामगारांना मंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देत त्यांच्याकडून मोठया प्रमाणात पैसे उकळले जातात. दरम्यान, कामगार कल्याण मंडळाच्या योजनांवर दलालांकडून डल्ला मारला जात असल्याने कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी या अनागोंदीला चाप लावण्याचा निर्णय घेतला आहे. जिल्हास्तरावर दक्षता पथक स्थापन करण्यात येऊन कामगारांची झाडाझडती घेतली जात आहे. १० जुलैपर्यंत ही तपासणी दक्षता पथकांकडून केली जाणार असल्यामुळे योजनांचा लाभ घेणारे बनावट कामगार, त्यांच्याकडून पैसे उकळून योजनांचा लाभ मिळवून देणारे दलाल आणि अशा बनावट नोंदणीला मंजुरी देणारे कामगार अधिकारी यांची पाचावर धारण बसली आहे.

### दलालांचेच 'कल्याण'

■ बांधकाम कामगारांसाठी कामगार कल्याण मंडळाच्या तब्बल २९ कल्याणकारी योजना आहेत. मात्र, या योजनांवर लाभ खऱ्या कामगारांपेक्षा बोगस कामगारांनीच डल्ला मारल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे या योजनांचा लाभ बोगस कामगारांना मिळवून देणाऱ्या दलालांचेच यात अधिक कल्याण होत असल्याचे दिसून येत आहे.

### अशी आहे कामगारांची स्थिती

■ जालना जिल्हयात २ लाख ३८ हजार १८८ बांधकाम कामगारांचे अर्ज मंजूर करण्यात आले आहे. ३७५ जणांचे अर्ज नामंजूर करण्यात आले असून तब्बल २९ हजार १२१ कामगारांचे अर्ज प्रलंबित आहेत. तर नूतनीकरण केलेले जीवित कामगार १ लाख २० हजार ७१३ बांधकाम कामगार जिल्हयात आहे, अशी माहिती जिल्हा सरकारी कामगार अधिकारी अमोल जाधव यांनी दिली. दरम्यान, मयत कामगारांची माहिती अद्ययावत नसल्याचेही त्यांनी सांगितले.

## धक्कादायक : पोलिसाचा मुलगाच निघाला पिस्तूल विक्रेता?

गावठी पिस्तूलाची खरेदी-विक्री करणारे तिघे अटक

**जालना/प्रतिनिधी**

शहरातील सदर बाजार पोलिसांनी जिजामाता चौक परिसरात मंगळवार, १ जुलै रोजी कारवाई करीत गावठी पिस्तूल बाळगणाऱ्या एका तरुणास जेरबंद केले. या तरुणाचे नाव अविनाश अंकुश वाघमारे (२४) असे असून तो जुना जालना परिसरातील माळीपुरा येथील रहिवासी आहे.

दरम्यान, अविनाश वाघमारे याची पोलिसांनी चौकशी केली असता त्याने हा गावठी पिस्तूल शेख शकील शेख शाहेद याच्या मध्यस्थीने जय कन्हैया भांडारकर याच्याकडून खरेदी केल्याची कबुली दिली आहे. यातील गावठी पिस्तूल विकणारा आरोपी जय भांडारकर हा पोलीस मुख्यालयात कार्यरत असलेल्या एका पोलीस कर्मचाऱ्यांचा मुलगा असल्याचे समजते.

याप्रकरणी आरोपी अविनाश वाघमारे, शेख शकील आणि जय भांडारकर या तीन जणांविरुद्ध भारतीय हत्यार बंदी कायदा ४/२५ आणि मुंबई पोलीस कायद्याच्या १३५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी सदर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप भारती, पोलीस उपनिरीक्षक शैलेश म्हस्के, पोहेकॉं. रामप्रसाद रंगे, नजीर पटेल,दुर्गेश गोफणे, अजीम शेख, गणेश तेजनकर, भगवान मुंजाळ, राहुल कटकम, धनंजय लोंढे यांच्यासह दामिनी पथकाचे कर्मचारी यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली केली आहे.

### वसंतराव नाईक यांना अभिवादन

**जालना :** राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

यावेळी गणेश महाडीक, नम्रता चाटे, अनिल नव्हाते, सतिश तायडे, रविंद्र हेलगर, देवानंद डोईफोडे, अरुण डुकरे, दिपाली राऊत आदींची उपस्थिती होती.

## जालना ते शिर्डी साई पालखीचे प्रस्थान

श्री साई सेवा मंडळाचा उपक्रम ▸ २५० भाविक सहभागी

**जालना/प्रतिनिधी**



आषाढी एकादशी निमित्त प्रतिवर्षाप्रमाणे लकडकोट परिसरातील श्री साई सेवा मंडळाच्या वतीने जालना ते शिर्डी पालखी चे मंगळवार,१ जुलै रोजी वाजतगाजत, साई नामाच्या जयघोषात प्रस्थान झाले.

साई भक्त गुलाब राजगिरे यांनी २१ वर्षांपूर्वी पाच भाविकांना सोबत घेऊन पदयात्रेची सुरूवात केली होती. नंतर भाविकांचा प्रतिसाद वाढला. हळूहळू पदयात्रेचे पालखीत रूपांतर झाले. वीस वर्षांपासून पालखीची परंपरा सुरू आहे. मंगळवारी दुपारी बसस्थानक मार्गावर असलेल्या लक्कडकोट परिसरात आरती करण्यात आली. यावेळी माजी आ. कैलास गोरंट्याल, युवा सेना सचिव अभिमन्यू खोतकर, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, मेघराज चौधरी, अंकुश राजगिरे, आकाश जगताप, गणेश घुगे, सचिन क्षीरसागर, सुनील रत्नपारखे, रवींद्र ढगे, बाळू पाचरणे, संदीप साबळे, गुलाब राजगिरे, प्रकाश जायभाये यांच्यासह महिला व साई भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. २५० महिला व भाविक पालखीत सहभागी झाले आहेत. आषाढी एकादशीला रविवारी शिर्डी येथे पालखी पोहोचणार आहे. दरम्यान १३ जुलै रोजी लक्कडकोट येथे भंडारा होईल, असे गुलाब राजगिरे यांनी सांगितले.

### जिल्हा सांख्यिकी कार्यालयात राष्ट्रीय सांख्यिकी दिन

**जालना :** भारतीय संख्याशास्त्राचे जनक प्रशांतचंद्र महालनोबीस यांचा जन्मदिन २९ जून हा राष्ट्रीय सांख्यिकी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्या अनुषंगाने जिल्हा सांख्यिकी कार्यालयात राष्ट्रीय सांख्यिकी दिन साजरा करण्यात आला.

यावेळी कार्यालयात राष्ट्रीय नमुना पाहणीची ७५ वर्षे या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणुन राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयाचे अर्थशास्त्र विभागाचे प्रा. षाजी सहदेवन यांची उपस्थिती होती. त्यांनी याप्रसंगी सांख्यिकी या विषयातील मुलभूत संकल्पना दैनंदिन व्यवहारात कशा उपयोगात आणल्या जातात यावर मार्गदर्शन केले.

## राष्ट्रवादीच्या तालुका उपाध्यक्षपदी शोएब अकबर पठाण यांची निवड



**परतूर/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी युवक काँग्रेस परतूर तालुका उपाध्यक्षपद येथील शोएब अकबर पठाण यांची मंगळवार, १ जुलै निवड करण्यात आली. राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाधक्ष विक्रम धुमाळ यांनी निवड केल्याचे पत्र दिले.

यावेळी माजी आ.सुरेश जेथलिया प्रदेश सरचिटणीस नितीन जेथलिया, अंल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष खय्यूम खान पठाण, बळीराम कडपे, बाबासाहेब गाडगे, रहेमत खान पठाण, डॉ.जगताप, विजय कडपे, मोहम्मद लायेक कुरेशी, गौतम शेळके, किशोर राठोड, अमोल रामवत, अनंता भारसाकळे, राम राठोड यांच्यासह राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

### शेतकऱ्यांना डीबीटी पोर्टलद्वारे निधी वितरीत होणार

**जालना :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी डीबीटी पोर्टलद्वारे शासनाकडून येत्या दोन ते तीन दिवसात खालीलप्रमाणे तालुकानिहाय निधी वितरीत होणार आहे.

यामध्ये परतूर तालुक्यातिल २१३ शेतकऱ्यांसाठी २७ लक्ष ४५ हजार ९९ रुपये निधी वितरीत होणार आहे. मंठा तालुक्यातील ५७० शेतकऱ्यांसाठी ६७ लक्ष २५ हजार ७८९ रुपये, जालना तालुक्यातील ३४७ शेतकऱ्यांसाठी ३० लक्ष ७९ हजार ३९२ रुपये, जाफ्राबाद तालुक्यातिल ५१२ शेतकऱ्यांसाठी ५३ लक्ष ९० हजार, घनसावंगी तालुक्यातील १ हजार ७१७ शेतकऱ्यांसाठी २ कोटी ५४ लक्ष ५ हजार ९० रुपये इतका निधी वितरीत होणार आहे.

## घरकूल बांधकामाला वाळू मिळेना; गल्हाटी नदीत आंदोलनाचा इशारा

**शहापूर/प्रतिनिधी**

अंबड तालुक्यातील दाढेगाव येथील रमाई आवास घरकूल योजने अंतर्गत घरकूल मंजूर आहे. लाभार्थ्यांचे कामे सुरू आहेत. मात्र, बांधकामासाठी वाळू मिळत नसल्यामुळे मोठी अडचण निर्माण झाली आहे. दरम्यान, घरकुलांसाठी वाळू उपलब्ध करून न दिल्यास गल्हाटी नदीत आंदोलन करणार असल्याचा इशारा लाभार्थ्यांनी दिला आहे.

घरकूल योजनेचे लाभार्थी राजू काकडे, संजय काकडे, गोविंद काकडे यांचे घरकूल बांधकाम चालू आहे. शासनाने घरकूल लाभार्थ्यांना पाच ब्रास वाळू देण्याचे जाहीर केले.

यासाठी ऑनलाईन करुनही गोदावरी नदीची वाळू मिळत नसल्याने घरकुलाचे काम करायचे कसे, असा प्रश्न घरकूल लाभार्थ्यांच्या समोर उभा आहे. त्यामुळे बांधकामासाठी वाळू मिळाली नाही तर दाढेगाव येथील लाभार्थी गुरुवार, ३ जुलै रोजी नदीच्या पात्रात आंदोलन करतील, असा इशारा गट विकास अधिकाऱ्यांना निवेदनाद्वारे दिला आहे.

### राष्ट्रवादीच्या कार्यालयात स्व. वसंतराव नाईक यांना अभिवादन

**जालना/प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या जिल्हा कार्यालयात मंगळवारी माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार अरविंद चव्हाण, युवक प्रदेश सरचिटणीस धैर्यशील चव्हाण, अण्णासाहेब चितेकर, रीकंल तायड, सतिश वाहुळे, नवनाथ लोखंडे, राजेश पवार, संभाजी भुतेकर आदींनी स्व. नाईक यांना अभिवादन केले.

## परतूर पोलीस ठाण्याची सूत्रे सुदाम भागवत यांच्याकडे

**परतूर/प्रतिनिधी**




जालना जिल्ह्यात पोलीस दलात अंतर्गत फेरबदल करण्यात आले आहेत. पोलीस अधिक्षक अजय कुमार बन्सल यांनी सोमवार, ३० जून रोजी रात्री उशिरा सहा पोलीस निरीक्षकांसह सात पोलीस उपनिरीक्षकांच्या जिल्हांतर्गत बदल्या केल्या आहेत. दरम्यान, परतूर पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक एम.टी. सुरवसे यांची बदनापूर पोलिस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. तर बदनापूर येथील पोलिस निरीक्षक सुदाम भागवत यांच्याकडे परतूर पोलिस ठाण्याची सूत्रे देण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षकांनी जिल्हाअंतर्गत सहा पोलिस निरीक्षकांच्या बदल्या केल्या. प्रशासकीय सोयीसाठी आणि कामकाजात अधिक गतिमानता आणण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे समजते. या बदल्यात परतूर पोलीस निरीक्षकांसह उपनिरीक्षकांची बदली झाल्यामुळे कामकाजात नवीन ऊर्जा येईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. परतूरचे पोलीस निरीक्षक सुरवसे यांची बदनापूर येथे बदली करण्यात आली आहे. तर बदनापूरचे भागवत यांची परतूर पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. परतूर पोलीस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक विठ्ठल केंद्रे यांची मंठा पोलीस ठाण्यात बदली करण्यात आली आहे. दरम्यान, पोलीस निरीक्षक सुदाम भागवत यांनी मंगळवार, १ जुलै रोजी परतूर पोलीस ठाण्याचा पदभार सांभाळला आहे.

### गुन्हेगारीला आळा घालण्याचे आव्हान

■ परतूर तालुक्यात चोरी, दरोडे, लुटमार, खून यासारख्या गंभीर गुन्ह्यांचे प्रमाण वाढले आहे. याशिवाय तालुक्यातील अवैध धंद्यांना देखील लगाम घालण्याची गरज आहे. पोलीस निरीक्षक सुदाम भागवत बदनापूर येथे असताना तालुक्यांत मोठया प्रमाणावर अवैध धंदे वाढल्याचे दिसून आले होते. याबाबत सोशल मीडियावर देखील व्हिडिओ व्हायरल झाले होते. दरम्यान, आता परतूर तालुक्यातील अवैध धंद्यांच्या विरोधात ते कशी भूमिका घेतात, याकडे लक्ष लागले आहे.

जालना शहरातील सोनल नगर येथे महिला जागृती मेळावा

# मासिक पाळी महिलांसाठी वरदान : शीतल पवार

**जालना/प्रतिनिधी**



मासिक पाळी ही एक नैसर्गिक जैविक प्रक्रिया असून ती महिलांसाठी वरदान आहे. मासिक पाळी नियमितपणे येणे हे स्त्रीचे शरीर निरोगी असल्याचे लक्षण आहे, असे प्रतिपादन स्त्री आरोग्याच्या प्रशिक्षक शीतल पवार यांनी येथे केले.

जालना येथील क्रांतिसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्था, अक्कमहादेवी स्वयंसहायता महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था आणि प्रोजेक्ट बाला अंतर्गत शहरातील सोनल नगर येथे मासिक पाळी संदर्भात महिला जागृती मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून शीतल पवार बोलत होत्या. यावेळी क्रांतिसिंह बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष विष्णू पिवळ, अक्कमहादेवी बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या अध्यक्षा योगिता भोगावकर, योग, निसर्गो पचार चिकित्सक तथा पत्रकार विनोद काळे, सामाजिक कार्यकर्त्या रेणूका चव्हाण, आयएसडब्ल्यूएसचे जिल्हा समन्वयक नितीन जऱ्हाड, महिला व बालकल्याण विभागातील पुष्पा कापसे, मंगल उगले, नितेश चव्हाण, शुभम गोफने यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी शीतल पवार म्हणाल्या, मासिक पाळी ही महिलांच्या पुनरुत्पादक आरोग्यासाठी आवश्यक आहे. ती एक नैसर्गिक प्रक्रिया आहे. मासिक पाळी अशुद्ध नाही. त्यामुळे या प्रक्रियेकडे बघण्याचा नकारात्मक दृष्टिकोन बदलण्याची गरज आहे. महिलांनी याबाबत संकुचित मनोवृत्ती बाळगणे घातक ठरते आणि यातून पुढे गंभीर आजारांना सामोरे जावे लागते.

यावेळी उपस्थित महिला, किशोवयीन मुलींना प्रोजेक्ट बाला अंतर्गत कापडी सॅनिटरी पॅडस् वाटप करण्यात आले. तसेच यावेळी उपस्थित महिलांना बालविवाह प्रतिबंधाबाबत प्रतिज्ञा देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विष्णू पिवळ यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता भोगावकर यांनी केले. पुष्पा कापसे यांनी आभार मानले.

### योगामुळे निरामय आरोग्य : विनोद काळे

■ योग, प्राणायाम, यौगिक व्यायाम हे प्रत्येक वयोगटातील व्यक्तींसाठी अत्यंत उपयुक्त आहे. महिलांच्या निरोगी आरोग्यासाठी आणि विशेषतः मासिक पाळीच्या अनुषंगाने उद्भवणाऱ्या व्याधींना टाळण्यासाठी योग, प्राणायाम अतिशय उपयोगी आहे. महिलांना सकाळी सूर्योदयापूर्वी उठायची सवय असतेच; फक्त योगासाठी अर्धातास दिल्यास मासिक पाळीसह इतर समस्यांपासून सहज मुक्तता मिळू शकते, असा सल्ला योग, निसर्गोपचार चिकित्सक तथा पत्रकार विनोद काळे यांनी दिला.

### जेथलिया यांच्या संपर्क कार्यालयात वसंतराव नाईक यांची जयंती साजरी



**परतूर :** माजी आमदार सुरेश जेथलिया यांच्या परतूर येथील संपर्क कार्यालयात हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी माजी आ.सुरेश जेथलिया यांच्यासह, नितीन जेथलिया, अंल्पसंख्याक प्रदेश उपाध्यक्ष खय्यूम खान पठाण, प्रदेश सरचिटणीस बळीराम कडपे, मोहम्मद लायेक कुरेशी, बाबासाहेब गाडगे, रहेमत खान पठाण, विजय कडपे, गौतम शेळके, किशोर राठोड, अमोल रामवत,भारसाकळे, शोएब पठाण, राम राठोड आदी उपस्थित होते.

## वाढोणा येथे शेतातील बांधाच्या वादातून तरुणाचा खून

**परतूर/प्रतिनिधी**



शेतातून पावसाचे पाणी काढण्यासाठी चर खोदल्याच्या कारणावरून चुलत भावांमध्ये झालेल्या वादाचे पर्यावसन हाणामारीत झाले. यावेळी चुलता व त्याच्या मुलाने डोक्यात दगड घालून २४ वर्षीय तरुणाचा खून केला. परतूर तालुक्यातील वाढोणा येथे रविवारी सायंकाळी ही घटना घडली. किरण तुळशीदास तनपुरे (रा.वाढोणा) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी पोलिसांनी बापलेकास दोन तासात अटक केली. वाढोणा शिवारातील गणेश तनपुरे यांची शेती आहे. रविवारी किरण तनपुरे हा शेतात काम करत होता. त्यांचा चुलत भाऊ परमेश्वर तनपुरे व त्याचा मुलगा किशोर यांनी शेतातील सामाईक बांधावरून पाणी जाण्यासाठी गणेश तनपुरे यांच्या शेताच्या बाजूने चारी खोदली. त्यामुळे गणेश तनपुरे यांनी विचारणा केली असता परमेश्वर तनपुरे व मुलगा किशोर या दोघांनी शिवीगाळ करत गणेश यांना मारहाण करण्यास सुरुवात केली. वडिलांना चुलता व पुतण्या मारहाण करत असल्यामुळे किरण हा मध्यस्थ होऊन वडिलांना वाचवण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा बाप-लेकांनी बांधावरील दगड उचलून किरण तनपुरे याच्या डोक्यात दगड घातला. यात किरण हे जागीच ठार झाले. त्यानंतर दोघेही घटना स्थळावरून पसार झाले, असे फिर्यादीत म्हटले आहे. पोलिसांनी पंचनामा केला आणि किरण तनपुरेचा मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठवला. प्रकरणी गणेश तनपुरे यांच्या फिर्यादीवरून परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. त्यानंतर पोलिसांनी संशयित आरोपी परमेश्वर तनपुरे व किशोर तनपुरे यांना अटक केली.

## न्यूज ब्रीफ

### महिला व बालविकास कार्यालय नव्या जागेत

**अकोला :** जिल्हा महिला व बालविकास कार्यालय आता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातून महिला व बालविकास भवन या नव्या जागेत स्थलांतरित झाले आहे. या कार्यालयाबरोबरच जिल्हा बाल संरक्षण कक्षही महिला व बालविकास भवनात स्थलांतरित झाला आहे. या दोन्ही कार्यालयांचे नव्या जागेत कामकाज १ जुलैपासून सुरू करण्यात आले. महिला व बालविकास भवन ही वास्तू माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयानजिक संतोषी मातेच्या मंदिरालगत आहे. संबंधितांनी नोंद घेण्याचे आवाहन जिल्हा महिला व बालविकास अधिकारी गिरीश पुसदकर यांनी केले आहे.

### चोरीस गेलेली दुचाकी २४ तासांत हस्तगत; दोन आरोपी ताब्यात



**अकोला :** शहरातील गांधी रोडवरील आझाद कॉम्प्लेक्सच्या मागे उभी केलेली दुचाकी चोरीस गेल्यानंतर २४ तासांच्या सिटी कोतवाली पोलिसांनी ती हस्तगत केली. या प्रकरणातील दोन चोरट्यांना अटक केली. या कारवाईत सुमारे १ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. २९ जून २०२५ रोजी संध्याकाळी ५ ते ७ वाजताच्या सुमारास अकबर प्लॉट, पातुर येथील अल्ताफ बेग अनवर बेग यांची दुचाकी आझाद कॉम्प्लेक्समागे ठेऊन कपडे खरेदीसाठी गेलेल्या फिर्यादीची दुचाकी अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलीसांनी गुप्त माहितीच्या आधारे अब्दुल रब अब्दुल नासीर (वय २५, रा. मुजावरपुरा, बार्शीटाकळी) व मोहसीन खान जकीउल्लाह खान (वय २५, रा. दहीहांडा बेस, बार्शीटाकळी) हे दोघे चोरी केलेली दुचाकी एका वाहनात टाकून नेत असल्याचे आढळून आले.

---

**३० जूनपासून सेवा कार्यान्वित; व्यावसायिकांना मोठा दिलासा**

# अखेर महापालिकेचे परवाना वितरण, नूतनीकरणाची ऑनलाइन सेवा सुरू

**अकोला/प्रतिनिधी**

गेल्या तीन महिन्यांपासून पूर्णपणे ठप्प झालेली महापालिकेची व्यावसायिक परवाना काढण्याची व नूतनीकरणाची प्रक्रिया अखेर सोमवार, ३० जूनपासून पुन्हा सुरू होत आहे. यामुळे नवे व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या व्यापाऱ्यांना आणि नूतनीकरणाची वाट पाहणाऱ्या व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळेल.

मनपाच्या अधिकार क्षेत्रात व्यवसाय सुरू करण्यासाठी वैध परवाना आवश्यक असतो. दरवर्षी याचे नूतनीकरण करणे बंधनकारक असून, याच प्रक्रियेच्या ठप्प झाल्यामुळे मनपाला महसुली नुकसान सहन करावे लागत होते. मार्च २०२५ नंतर, मनपाच्या परवाना वितरणाचे सॉफ्टवेअर बंद





झाल्याने व्यावसायिकांना परवाने मिळणे बंद झाले. विशेषत: जे व्यावसायिक बँक, वित्त संस्था किंवा योजना द्वारे कर्ज घेऊन व्यवसाय सुरू करू इच्छित होते, त्यांना वैध परवाना नसल्याने अडचणींचा सामना करावा लागला.

**नव्या सॉफ्टवेअरचे काम पूर्ण**

■ महापालिकेने या अडचणीच्या पार्श्वभूमीवर अमरावती येथील एका खासगी कंपनीला नवीन परवाना व्यवस्थापन सॉफ्टवेअर तयार करण्याचे काम सोपवले. सदर सॉफ्टवेअरचे काम आता पूर्ण झाले असून, सोमवारपासून परवाना नूतनीकरण व नवीन परवाने ऑनलाइन प्रणालीद्वारे दिले जाणार आहेत.

**परवाना काढण्याची व नूतनीकरणाची प्रक्रिया**

■ प्रारंभ तारीख: सोमवार, ३० जून २०२५
ऑनलाइन अर्ज व प्रक्रिया सेवांमध्ये समावेश : नवीन व्यावसायिक परवाना अर्ज, परवान्यांचे नूतनीकरण
आवश्यक कागदपत्रे: आधार कार्ड, व्यवसायाचे नोंदणी प्रमाणपत्र, मागील वर्षाचा परवाना (नूतनीकरणासाठी)

---

# विदर्भासाठी सुगंधी वनस्पतीसह मसाल्यांचे पिके ठरणार आर्थिक परिवर्तनाचे स्रोत : डॉ. प्रभातकुमार

**राष्ट्रीय स्तरावरील वार्षिक पुनरावलोकन बैठक उत्साहात**

**अकोला/प्रतिनिधी**





महाराष्ट्राचा विशेषत: विदर्भाचा विचार करता फळ पिकांसाठी अत्याधिक सुरक्षित वातावरण असून शाश्वत विदर्भ विकासासाठी सुगंधी वनस्पतीसह मसाल्यांचे पिके आर्थिक परिवर्तनाचे स्रोत ठरतील असे आश्वासक प्रतिपादन भारत सरकारचे उद्यानिकी आयुक्त डॉ. प्रभातकुमार यांनी केले.

कालिकत, केरळ येथील सुपारी आणि मसाला पिके विकास संचालनालय आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठातर्फे नागपूर येथील कृषि महाविद्यालयाच्या सभागृहात ''उद्यानविद्यावर्गीय पिकांच्या एकात्मिक विकासाचे अभियान'' अंतर्गत राष्ट्रीय स्तरावरील दोन दिवसीय वार्षिक पुनरावलोकन बैठक नुकतीच पार पडली. यावेळी उद्घाटक म्हणून ते बोलत होते. केंद्र शासनामार्फत विविध योजनांद्वारे या क्षेत्राला आवश्यक पाठबळ दिले जात असून संशोधन संस्था, विद्यापीठे आणि कृषी विभाग यांनी समन्वयाने काम केल्यास या क्षेत्रात मोठी क्रांती घडू शकते असे देखिल डॉ. प्रभातकुमार यांनी आपल्या अभ्यासपूर्ण आणि तितक्याच व्यावहारिक संबोधनात सांगितले.

अकोला कृषी विद्यापीठाच्या उद्यान विद्या विभागाने मिशनचा खरा हेतू सफल करत चंद्रपूर,गडचिरोली सारख्या दुर्गम भागांपर्यंत एकात्मिक उद्यानिकी पद्धतीचा अवलंब आणि त्याला समूह गटांची तसेच गाव पातळीवरील प्रक्रिया केंद्रांची जोड देत कच्च्या मालावर प्रक्रिया करण्याचे तंत्रज्ञान कृतीत उतरवित खऱ्या अर्थाने प्रकल्पाचा उद्देश सफल केल्याबद्दल संबंधित प्रकल्प प्रमुख आणि त्यांचे सर्व सहकारी वर्गाचे कौतुक केले व देशभरातील इतर संबंधित संस्थानी देखील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या कार्याचे प्रत्यक्ष अवलोकन करीत त्याचा अवलंब करावा, असे आवाहनही याप्रसंगी केले.

या प्रसंगी एकूण २५ कोटी रुपयांचा निधी देशभरातील विविध संशोधन केंद्रांना आवंटित करण्यात आला.

---

# सामूहिक अत्याचारातील आरोपींना पोलीस कोठडी!

**अकोला/प्रतिनिधी**

'गे डेटिंग' ॲपवरून ओळख करून एका बँक अधिकाऱ्याला अज्ञातस्थळी बोलावून लैंगिक अत्याचार करणाऱ्या दोन आरोपींना अटक केल्यानंतर त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणातील दोन आरोपी अद्याप पसार असून, पोलिस त्यांचा शोध घेत आहेत. मनीष नाईक आणि मयूर बागडे अटकेतील या दोन आरोपींना अत्याचाराचा व्हिडीओ काढून, नंतर व्हिडीओद्वारे ब्लॅकमेलिंग करीत ८० हजारांची फसवणूक केल्याचेही समोर आले आहे.

अकोला येथील नामांकित बँकेत कार्यरत असलेल्या ३० वर्षीय अधिकाऱ्याची 'गे डेटिंग' ॲपवर एका व्यक्तीसोबत ओळख झाली होती. संबंधित व्यक्तीने त्याला शहराबाहेरील एका अज्ञातस्थळी भेटीसाठी बोलावल्यानंतर चार जणांनी एकत्र येत त्याच्यावर लैंगिक अत्याचार केल्याचे या बँक अधिकाऱ्याच्या फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

**दोन आरोपी अद्याप फरार**

■ तक्रार दाखल होताच पोलिस निरीक्षक मनोज केदारे यांच्या मार्गदर्शनाखाली खदान पोलिसांनी तातडीने तपास सुरु केला. यामध्ये मनीष नाईक आणि मयूर बागडे या दोघा आरोपींना अटक करण्यात आली आहे. उर्वरित दोन आरोपींचा शोध सुरु असून, विशेष पथक तयार करण्यात आले आहे.

---

# खरेदी विक्री संघाच्या संचालक पदी अन्वर पटेल यांची अविरोध निवड

**मानोरा/प्रतिनिधी**

खरेदी विक्री संघाची संचालक पदाची एक जागा रिक्त असल्यामुळे साहाय्यक निबंधक यांनी ३० जून ला निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. संचालक पदा करिता अन्वर पटेल यांचा एकमेव अर्ज दाखल दाखल झाल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी आर एस पोवार यांनी पटेल यांची संचालक म्हणून अविरोध निवड केल्याची घोषणा केली.

मानोरा खरेदी विक्री संघांचे अध्यक्ष मतीन पटेल यांचे निधन झाल्यामुळे रिक्त असलेल्या एका जागे करिता साहायक निबंधक आर. एस. पोवार यांनी संचालक पदाची निवडणूक ३० जून ला खरेदी विक्री संघाच्या कार्यालयात बोलाविली यावेळी ११ सदस्य उपस्थित असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी आर. एस. पोवार यांचे अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आली. यावेळी संचालक पदा करिता संलग्न सहकारी संख्येतून अन्वर पटेल यांनी अर्ज दाखल केले. विरोधात अर्ज दाखल नसल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी पोवार यांनी संचालक म्हणून पटेल अविरोध निवडून आल्याचे घोषित केले. कामकाज व्यवस्थापक संदीपान इंगळे, सहकार अधिकारी रोशन गाडेकर यांनी पार पाडले.

---

# महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेमध्ये गाठला ५ लाखांचा टप्पा

**अकोला :** वीज देयकासाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ इमेल व एसएमएसचा पर्याय निवडणाऱ्या लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये ५ लाखांचा टप्पा गाठला आहे. या योजनेत सोमवार ३० जून पर्यंत सहभागी झालेल्या ५ लाख ३ हजार ७९५ वीजग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

गो-ग्रीन योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या मोबाईल ॲप व संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी गो-ग्रीन योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांनी केले.

---

# शहर पोलिसांची कारवाई; तांदूळ शासकीय की खासगी?

**मूर्तिजापूर/प्रतिनिधी**

शहर पोलिसांनी राष्ट्रीय महामार्गावर अमरावतीकडे जाणारा ३० टन तांदूळ भरलेला ट्रक ताब्यात घेतला आहे. मात्र, हा तांदूळ शासकीय आहे की खासगी? याचा खुलासा महसूल विभागाच्या अभिप्रायानंतरच होणार आहे. त्यामुळे या प्रकरणी पुढील कारवाई प्रलंबित आहे.

२८ जूनच्या मध्यरात्रीच्या दरम्यान पोलिस निरीक्षक अजित जाधव यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सहायक पोलिस निरीक्षक अनिल पवार, मंगेश विल्हेकर, श्याम मडावी आणि पवन बोडखे यांच्या पथकाने राष्ट्रीय महामार्गावर पाळत ठेवली. रात्री २:३० वाजता सीजी ०८ एएच ५०२२ क्रमांकाचा मालवाहू ट्रक अकोल्याहून अमरावतीकडे जाताना आढळला.

पोलिसांनी अडवून चौकशी केली असता, ट्रकमधून सुमारे ३० टन तांदूळ वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. चालकाने तांदूळ गोंदियाकडे नेत असल्याचे सांगितले. मात्र, त्याच्याकडे कोणतेही वैध दस्तऐवज नव्हते. त्यामुळे ट्रक शहर पोलिस ठाण्यात ताब्यात ठेवण्यात आला असून, महसूल विभागाच्या अभिप्रायाची प्रतीक्षा आहे. शनिवारी आणि रविवारी शासकीय सुट्टी असल्याने अद्याप अभिप्राय प्राप्त झालेला नाही.

या अगोदरही याच ट्रक मालकाचा तांदळाने भरलेले वाहन मूर्तिजापूर पोलिसांनी पकडले होते. त्यावेळी संबंधिताने दस्तऐवज दाखवून तो तांदूळ खासगी असल्याचे सिद्ध केले होते आणि वाहन सोडवून नेले होते.

---

## दैनिक महाभूमि शब्दसंगम 671



**—: आडवी विधाने :—**

1) नाकापेक्षा मोती जड, मुख्य वस्तूपेक्षा तिच्या गौण अंगास जेथे विशेष महत्व देण्यात येते तेथे या उर्दू म्हणीचा उपयोग करतात
9) भाऊबहिणीचे प्रेम संबंध जपणारा दीपावलीतील एक दिवस
11) जागृत, सावध होणे
12 ) शेत, वर्दळ
13) सणासुदीला असणारा पुरणपोळीचा गोलमटोल तिखटमिखट सोबती
14) ग्राहक, खरेदी करणारा
18) रडकहाणी
21) ढीला, स्थूल
22) शासन चालविणारे
23) भय, भीती शंका
24) क्रोध, संताप
26) वरदान
28) लाख, एक ज्वालाग्राही पदार्थ
30) मत्स्य, बारावी रास
32) धरती, पृथ्वी
34) फार मऊ, मुलायम
35) हवन करणे, होमात टाकणे
37) धारण करणारा
39) सर्व, सगळे
41) बाण ठेवण्याची पिशवी
42) घराच्या खाली जमिनीत असलेली खोली
44) सौंदर्य, देखणेपणा
46अ) चिखल
47) स्वेच्छेने एखाद्याला आपला मुलगा मानणे
49) तांबूल
50) सगळीकडे
51) लढाऊ जहाजांचा समुदाय
53) अधीन, ताब्यातला
55) फिकीर, पर्वा 56) अपत्य, परंपरा
58) सखी, प्रेयसी
59) खाली खाली जाणे, अपकर्ष
61) रथ हाकणारा
62) फोडातून निघणारा द्रव्यांश
64) वीट, तिरस्कार
65) कागदावर लिहिलेली अक्षरे खोडण्याचे साधन
67) गाल
68) ख्रिस्ती उपासना मंदिर, ख्रिस्ती महामंडळ
69) सपीटाची सूतासारखी बारीक व लांब वळी
70) एक महाराष्ट्रीयन खेळ
71) एक ते दहा दरम्यानची एक समसंख्या
72) अभिप्राय, विचार
73) वातावरणाची स्थिती
75) समीक्षा
76) जंगल, अरण्य
77) धुंदी, कैफ
78) लहानपणापासूनच लग्न न करण्याचा निश्चय करून ते कठोरपणे पाळणारा

**—: उभी विधाने:—**

1) नुकत्याच फुटलेल्या मिशा
2) यज्ञ, याग
3) अपमान वगैरे सोसून मुकाटयाने बसणारी
4) द्वेष, शत्रुत्व, फिर्याद
5) कोळी जातीचा माणूस
6) फुलांची माळ
7) संसार, उत्पत्ती, जन्म
8) एकाचवेळी अनेकांनी रडणे
9) भक्त
10) निशा, रजनी
15) एक उपदिशा
16) तत्वांश, अर्क
17) मनुष्याचे शरीर धनुष्यासारखे वाकडे होते असा एक रोग
19) सदरा, सूट
20) आश्रय
25) कर्ज घेतलेल्या रकमेच्या मोबदल्यात सावकाराजवळ ठेवण्यात येणारे जिन्नस
26) आश्रय, प्रमाण
27) पाणथळ जमीन
29) अल्पकाळ टिकणारे
30) गरिबाचे खाणे
31) हत्तीचा चालक
33) साखरेच्या पाकात लिंबाचा रस घालून केलेले पक्वान्न
36) थोडेसुद्धा
38) विवाह केलेली स्त्री
39) उत्साहाचा दिवस, उत्सव
40) लहान मुलांचा लपाछपीचा खेळ
43) द्रव्य, संपत्ती
45) ज्या महिन्यात दोन संक्रांती एकत्र येतात तो महिना
46) जाणवू लागलेले, भासणारे
48) सत्पुरूषाची प्रतिवार्षिक मृत्यूतिथी
51) आपला स्वत:चाच तेवढा मतलब पाहणारा 52) रात्री फिरणारा
54) आश्रय मागण्यास आलेला
55) तुझे
56) प्रपंच, कुटुंब
57) नाव उतरून जाण्याजोगी जागा
59) काही खाल्ल्यावाचून, रिकाम्या पोटी
60) किनारा, काठ
63) बरेच दिवसांपासून पोटात राहिलेला गर्भ
66) शक्तिशाली
67) ललाट 70) मुख, तोंड
72) माकडांचा खेळ दाखविणारा
73) मुस्लिमांनी केलेली मक्का मदिन्याची यात्रा
74) तीक्ष्ण अग्राचा स्तंभ

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



uday munde - 8446302691

---

# व्याळा परिसरातील पेरण्या रखडल्या; समाधानकारक पावसाची प्रतीक्षा

**व्याळा/प्रतिनिधी**

परिसरातील शेतकरी यंदाही निसर्गाच्या लहरीपणामुळे अडचणीत सापडले आहेत. मागील वर्षी विलंबाने आलेल्या पावसानंतर सततचे खंड आणि नंतर झालेल्या अतिवृष्टीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. यंदाही त्याच संकटाची मालिका पुन्हा उभी राहिली असून, अद्यापही सुमारे ७० टक्के पेरण्या रखडल्या आहेत.

यावर्षी काही भागांत सुरुवातीला समाधानकारक पावसामुळे काही गावांमध्ये पेरण्या पार पडल्या. मात्र, व्याळा व परिसरातील शेतशिवारांमध्ये समाधानकारक पावसाचा अभाव असल्याने पेरणीत मोठा विलंब झाला. २६ व २७ जून रोजी झालेल्या अतिपावसामुळे अनेक शेतांमध्ये पाणी साचले असून, पेरणीला अडथळा निर्माण झाला आहे.

यामुळे अनेक शेतकरी दररोज ट्रॅक्टर घेऊन शेतात जात आहेत; मात्र, जमिनीत ओलावा नसल्यामुळे त्यांना परत यावे लागत आहे. बहुतांश भागांत रस्त्यांची गैरसोय असल्यामुळे ट्रॅक्टर शेतापर्यंत पोहोचविणेही कठीण झाले आहे.

**मागील दोन वर्षांपासून अनिश्चित पाऊस**

गेल्या दोन वर्षांपासून व्याळा व आजूबाजूच्या सुमारे पाच ते सहा किलोमीटर क्षेत्रात पावसाचे प्रमाण अत्यंत असमान आहे. कधी पाऊसच नाही, तर कधी अतिवृष्टी. या बदलांचा परिणाम शेतीवर थेट जाणवतो आहे. याच कारणामुळे शेजारील गावांमध्ये पेरण्या यशस्वी होत असताना व्याळा परिसरातील शेतकरी मात्र संकटात आहेत.

## न्यूज ब्रीफ

### वसंतराव नाईक यांना जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन

**वाशिम :** आधुनिक महाराष्ट्राच्या कृषी क्रांतीचे प्रणेते, दूरदृष्टीचे राजकारणी व राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त १ जुलै रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.जिल्हाधिकारी कार्यालयातील वाकाटक सभागृहात झालेल्या या अभिवादन कार्यक्रमात निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. याप्रसंगी कार्यक्रमात उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करत त्यांच्या कार्याचा गौरवपूर्वक स्मरण केला. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्राने हरित क्रांतीच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले होते. ग्रामीण विकास, सिंचन योजना, कृषी धोरणं यामधून त्यांनी राज्याच्या प्रगतीला गती दिली.

### राज्यस्तरीय साहसी पर्यटन समितीवर धिरज कातखेडे यांची तज्ज्ञ म्हणून निवड

**मंगरूळपीर :** येथील उपविभागीय



पोलीस अधिकारी कार्यालयातील पोलीस हेड कॉन्स्टेबल रवींद्र कातखेडे यांचा मुलगा धीरज कातखेडेची राज्यस्तरीय साहसी पर्यटन समितीवर निवड झाली आहे.
महाराष्ट्र शासन पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागाच्या २४ ऑगस्ट २०२१ च्या शासन निर्णयानुसार साहसी पर्यटन धोरणास मान्यता देण्यात आली असून साहसी पर्यटन उपक्रम धोरणाच्या परिणामकारक अंमलबजावणी करिता राज्यस्तरीय व विभागीयस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने पर्यटन संचालनायामार्फत तयार करण्यात आलेल्या नामिका सुचित पर्यटन संचालनालय महाराष्ट्र शासन यांच्याकडून धिरज रविंद्र कातखेडे, यांची साहसी पर्यटन समितीमध्ये जमीनीवरील साहसी उपक्रम तज्ञ म्हणून निवड करण्यात आली आहे.

### १५ ऑगस्टपर्यंत एचएसआरपी नंबर प्लेट अनिवार्य

**अकोला :** १ एप्रिल २०१९ पूर्वी निर्मित सर्व जुन्या वाहनांवर 'हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन प्लेट' (एचएसआरपी) बसविणे सरकारने अनिवार्य केले आहे. मात्र, अकोला जिल्ह्यात आतापर्यंत केवळ ११ हजार ८८२ वाहनांवरच ही प्लेट बसवण्यात आली आहे, जे आरटीओमध्ये नोंदणीकृत वाहनांच्या तुलनेत अत्यंत अल्प आहे. एचएसआरपी बसवण्याची अंतिम तारीख आता १५ ऑगस्ट २०२५ करण्यात आली आहे. याआधी ही मुदत ३१ मार्च व नंतर ३० जून अशी दोनवेळा वाढविण्यात आली होती.

---

निष्काळजी बेतणार जीवावर : नोटीसकडे संबंधितांचे दुर्लक्ष

# अकोला शहरातील शिकस्त इमारतींचा प्रश्न ऐरणीवर!

**अकोला/प्रतिनिधी**

शहरातील १८० धोकादायक इमारतींवर महापालिकेने झोननिहाय नोटिसा बजावल्या असल्या तरी अद्याप पाडकाम कोणीच केले नाही, त्यामुळे शिकस्त इमारतींचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. इमारत मालकांच्या निष्काळजीपणामुळे पावसाळ्यात एखादी दुर्घटना घडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, बहुतेक इमारती गांधीरोड, टिळक सराफा बाजार, रोडसारख्या गजबजलेल्या भागात असल्याने अधिक धोका आहे.

महापालिका प्रशासनाने केलेल्या सर्वेक्षणात शहरात एकूण १८० शिकस्त इमारती असल्याचे सांगण्यात आले आहे. पूर्व (६३), पश्चिम (८५), उत्तर (३१), दक्षिण (१) झोनमध्ये शिकस्त इमारतींची नोंद झाली असून, संबंधित मालकांना नोटिसा पाठवण्यात आल्या आहेत. मात्र, बहुतांश इमारत मालकांनी या नोटीसकडे दुर्लक्ष केले आहे.



संग्रहीत

### जबाबदारी इमारत मालकांची

■ महापालिकेने दिलेल्या नोटीसमध्ये इमारत पाडण्याची जबाबदारी मालकांची असल्याचे स्पष्ट केले आहे. नोटीस अंमलात न आणल्यास दुर्घटनांबाबत मालक जबाबदार राहतील, अशी भूमिका प्रशासनाने घेतली आहे. इमारत पाडण्यासाठी महापालिकेने पुढाकार न घेतल्यास हा प्रश्न असाच प्रलंबित राहण्याची शक्यता आहे.

### काय आहेत अडचणी?

■ शहरातील बहुतांश धोकादायक इमारतींमध्ये भाडेकरू वास्तव्यास आहेत. मालक इमारत पाडण्यासाठी तयारही झाले तरी काही भाडेकरू घर खाली करण्यास नकार देत आहेत. काही ठिकाणी जीर्ण इमारतीत वास्तव्य करणारे म्हणतात की, आमची राहण्याची सोय करून द्या, तर आम्ही घर पाडू, अशा अनेक अडचणी येत आहेत.

शहरात धोकादायक इमारतींमुळे मागील सहा वर्षांत तीन दुर्घटना घडल्या असून, डिसेंबर २०१९ मध्ये तेलीपुरा भागात इमारत कोसळून एका महिलेचा मृत्यू झाला होता. तर, ऑगस्ट २०२४ मध्ये बैदपुरा येथे इमारतीचा भाग कोसळल्याने रहिवाशांनी स्वतःच इमारत पाडली होती. यावरून जीर्ण इमारतींची स्थिती किती गंभीर आहे, हे स्पष्ट होते. शहरातील अनेक मोठ्या इमारती धोकादायक असूनही, त्या रिकाम्या झालेल्या नाहीत. या इमारतींमध्ये अजूनही नागरिक वास्तव्य करत आहेत.

### ४९ इमारतींचे पाडकाम पूर्ण

■ गेल्या जीर्ण इमारतींपैकी ४९ इमारतींचे पाडकाम झाल्याचे मनपा प्रशासनाकडून सांगण्यात आले. उर्वरित इमारत मालकांनी पाडकाम केले नाही. यंदा नोटीस बजावूनही दुर्लक्ष होत असल्याने, कोणत्याही क्षणी अनर्थ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे प्रशासनाने तातडीने कृती करण्याची गरज आहे.

---

## आजपासून १३१ बस घडविणार अकोलेकरांना पंढरीची वारी!

१३ जुलै कालावधीत धावणार विशेष बस



**अकोला/प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त भाविकांना विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपूरला जाता यावे याकरिता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) अकोला विभागाने दरवर्षीप्रमाणे यावर्षीही नियोजन केले असून, २ ते १२ जुलै दरम्यान २७० विशेष गाड्या चालविण्यात येणार आहेत. यामध्ये अकोला जिल्ह्यातील पाच आगारांमधून १३१ विशेष बस सोडण्यात येणार आहेत.

अकोला जिल्ह्यातील अकोला क्र. १, अकोला क्र. २, अकोट, तेल्हारा व मूर्तिजापूर या आगारांमधून भाविकांना थेट बस पंढरपूर जाण्या-येण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. राज्य शासनाकडून महिला, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग व इतर सवलतपात्र प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सवलतीच्या प्रवास भाड्याची सूट पंढरपूर वारीदरम्यान प्रवास करणाऱ्या प्रवाशांना दिली जाणार आहे.

### कोणत्या आगारातून किती बसेस धावणार?

| आगार | बसेस |
|---|---|
| अकोला क्र. २ | ३७ |
| अकोला क्र. १ | ५१ |
| अकोट | २० |
| तेल्हारा | १४ |
| मूर्तिजापूर | ०९ |

*आषाढी एकादशीनिमित्त अकोला जिल्ह्यातील पाच बसस्थानकांमधून विशेष बस सोडण्यात येणार आहेत. प्रवाशांच्या मागणीनुसार जादा बसची व्यवस्था केलेली आहे. या सुविधेचा प्रवाशांनी लाभ घ्यावा.*

*- **पवन लाजूरकर,** विभागीय वाहतूक अधिकारी*

---

## आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरु; ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**वाशिम/प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, अकोला अंतर्गत वाशिम येथे कार्यरत असलेल्या आदिवासी मुला-मुलींसाठीच्या चार वसतिगृहांमध्ये शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

वाशिम येथे मुलांसाठी १२५ क्षमतेची दोन वसतिगृहे आणि मुलींसाठी १२५ क्षमतेची दोन वसतिगृहे अशी एकूण चार वसतिगृहे आहेत. या वसतिगृहांमध्ये इयत्ता १०वी, १२वी व पदवी परीक्षा उत्तीर्ण झालेल्या अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाणार आहे.

आवेदन प्रक्रिया ही पूर्णपणे ऑनलाईन असून इच्छुक विद्यार्थ्यांनी या संकेतस्थळावर जाऊन अर्ज भरावा. ऑनलाईन भरलेला अर्ज आणि आवश्यक कागदपत्रांची एक प्रत संबंधित वसतिगृह कार्यालयात प्रत्यक्ष जमा करणे आवश्यक आहे.

अर्जासोबत अनुसूचित जमातीचे जात प्रमाणपत्र, शैक्षणिक गुणपत्रिका, रहिवासी दाखला, उत्पन्नाचा दाखला इत्यादी आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

ज्युनिअर कॉलेज १५ ते ३० जुन, डिप्लोमा २५ जुन ते १० जुलै,पदवी २५ जुन ते १० जुलै, पोस्ट ग्रॅज्युएशन २५ जुन १० जुलै, व्यावसायिक २५ जुन ते १० जुलै या कालावधीत अर्ज स्विकारण्यात येणार आहे.

या प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहिती आणि मार्गदर्शनाकरिता वसतिगृह कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अकोला आणि वसतिगृहांचे गृहपाल, वाशिम यांनी केले आहे.

---

## कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांचे असहकार आंदोलन

शासन सेवेत समायोजनाची मागणी : एकत्रीकरण समितीचे जिल्हा परिषदेत निदर्शने

**अकोला/प्रतिनिधी**

राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करून घ्या, अशी मागणी करीत सोमवारी राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीने जिल्हा परिषदेत धाव घेतली. समितीने ३० जून रोजी लक्षवेधी असहकार आंदोलन केले.

एनएचएम अंतर्गत ग्रामीण भागात आरोग्य सेवा उपलब्ध होण्यासाठी कोट्यवधी रुपये सरकारकडून खर्च होतात. जिल्हा परिषदेच्या मार्फतही योजना राबविण्यात येतात. जिल्हयात



राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत अधिकारी व कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचाऱ्यांमुळे आरोग्य विभागातील सेवा गोरगरीबांसह गाव खेड्यात पोहोचत आहे. मात्र अनेकदा वेतन वेळेवर होत नसल्याचे कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

यासह अन्य मागण्यांसाठी कर्मचाऱ्यांनी आंदोलनही केले होते. दरम्यान ३० जून रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानाअंतर्गत कार्यरत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदमध्ये धाव घेतली. यावेळी डॉ. आर. एम. नागे, इम्रान खान, किशोर फाळके, सुदाम भिंगारे, अभिजित मुंदरे, डॉ. महेश इंनानी, डॉ. प्रिती कोगदे, आशिष शिंदे, डॉ. मनीष मेन, डॉ. मोहम्मद जाफर, डॉ.पंकज इंगोले, डॉ. सपना बाटे, डॉ रुपाली वळतकर यांच्यासह कंत्राटी अधिकारी कर्मचारी होते.

### शासन आदेशाची अंमलबजावणी कधी?

■ राष्ट्रीय आरोग्य अभियाना अंतर्गत कार्यरत १० वर्ष व त्यापेक्षा जास्त सेवा झालेल्या कर्मचाऱ्यांचे शासन सेवेत समायोजन करण्यासाठीचा शासन आदेश १४ मार्च २०२४ रोजी जारी झाल्याचे राष्ट्रीय आरोग्य अभियान एकत्रीकरण समितीचे म्हणणे आहे.

---

## एमटीएस परीक्षेत बाल शिवाजी शाळेचे सुयश

**अकोला/प्रतिनिधी**

येथील ब्राह्मण सभा संचलित बाल शिवाजी प्राथमिक शाळेत एमटीएस जळगाव यांच्यातर्फे २०२४-२५ या सत्रात घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवित अकोल्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

इयत्ता दुसरीतील अद्वैता शिवाजी देशमुख ही राज्यातून २१ वा क्रमांक, नील अनिल लव्हाळे २८ वा, स्पृहा नीळकंठ वानरे २३ वी वर्ग ३ रीचा शिव श्रीकृष्ण धाये २८ वा, आदित्य नीलेश गावंडे २८ वा. शाश्वत संतोष हाडोळे २६ वा, मिहीर जितेंद्र जोशी २१ वा. कैवल्य चैतन्य कुलकर्णी १८ वा. अनुश्री धीरज पाटील २७ वी, आरुष उमेश वैद्य २४ वा आर्य राजाराम मैसने २३ वी वर्ग ४ थीची स्वरा सुधीर चव्हाण १४ वी पार्थ विक्रम घाइट ११ वा, अनुश्री विवेक खपली १३ वी रियांश मंगेश कुलकर्णी १९ वा प्रणव स्वप्नील पाटीलखेडे १५ वा. पार्थ गणेश तिहिले १४ वा वर्ग ६ वी ची समृद्धी सुधीर भगत १० वी स्वरा प्रफुल्ल भालतिलक ८ वी श्रेयस विनायक पाठक ६ वा वर्ग ७ वी चा अथर्व रवींद्र भांबेरे ९ वा व वसुंधरा प्रकाश रेवस्कर ४ थी अशा एकूण २२ विद्यार्थ्यांनी राज्यातून तसेच केंद्रातून गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे तसेच मार्गदर्शक शिक्षिकांचे कौतुक संस्थेचे अध्यक्ष अविनाश देव यांनी केले.

---

## मुदत संपली : पाणीटंचाई निवारणाच्या १७२ उपाययोजना बाकी!

२१३ गावांत २४३ उपाययोजनांची कामे पूर्ण

**अकोला/प्रतिनिधी**

जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी कृती आराखड्यात प्रस्तावित उपाययोजनांची कामे करण्याची मुदत सोमवार, ३० जून रोजी संपली. या मुदतीत जिल्ह्यातील २१३ गावांत पाणीटंचाई निवारणाच्या २४३ उपाययोजनांची कामे पूर्ण करण्यात आली असून, उर्वरित १७२ उपाययोजनांची कामे बाकीच राहिल्याचे वास्तव आहे.

यंदाच्या गेल्या उन्हाळ्यात जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाणीटंचाई कृती आराखडा मंजूर करण्यात आला होता. या आराखड्यात जिल्ह्यातील टंचाईग्रस्त ३७९ गावांसाठी विविध ४१५ उपाययोजना प्रस्तावित करण्यात आल्या होत्या. त्यापैकी यंत्रणांच्या प्रस्तावानुसार २२२ गावांत २५१ उपाययोजनांच्या कामांना मान्यता देण्यात आली आहे.

### ३.८९ कोटींचा खर्च ; निधी मिळणे बाकी!

■ जिल्ह्यातील पाणीटंचाई निवारणासाठी ३७१ गावांतील ४१५ उपाययोजनांकरिता ५ कोटी ८७ लाख रुपयांचा अपेक्षित खर्च कृती आराखड्यात प्रस्तावित होता. त्यापैकी जूनअखेरपर्यंत ३ कोटी ८९ लाख रुपये खर्चाच्या २४३ उपाययोजनांची कामे पूर्ण करण्यात आली असून, या उपाययोजनांच्या कामांचा निधी शासनाकडून जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाला उपलब्ध होणे अद्याप बाकी आहे, अशी माहिती जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता संतोष मार्के यांनी दिली.

---

## पावसाची प्रतीक्षा ; प्रकल्पांत अल्प जलसाठा

**अकोला/प्रतिनिधी**

अकोला पाटबंधारे विभागांतर्गत येणाऱ्या प्रमुख सिंचन प्रकल्पांमध्ये ३० जून २०२५ रोजी सकाळी ७ वाजेपर्यंतच्या स्थितीनुसार सरासरीपेक्षा तुलनेने कमी जलसाठा नोंदविण्यात आला आहे.

काटेपूर्णा प्रकल्पाची पाणीपातळी ३४०.८६ मीटर असून, १७.०१९ दशलक्ष घनमीटर, म्हणजेच १९.७० टक्के साठा नोंदविण्यात आला आहे. सोमवारी या प्रकल्प क्षेत्रात ४ मिमी, तर एकूण पाऊस ६९ मिमी झाला आहे. वाण प्रकल्पात ३९६.१२ मीटर पातळी असून, २८.४६ साठा, म्हणजेच ३४.७२ टक्के पाणी आहे. सोमवारी ७ मिमी व एकूण १५८ मिमी पावसाची नोंद झाली आहे. मोर्णा प्रकल्पात ३६२.३० मीटर पातळी असून, १७.९५ (४३.३१ टक्के) साठा आहे. सोमवारी ५ मिमी व एकूण १७७ मिमी पावसाची नोंद झाली. निर्गुणा प्रकल्पात ३९०.९० मीटर पातळी असून, २६.७२ दलघमी, म्हणजेच ९२.६२ टक्के साठा आहे. सोमवारी पाऊस झाला नाही.

उमा प्रकल्पाची पातळी ३३७.८० मीटर असून, साठा केवळ ०.५३६ दलघमी, म्हणजे ४.५९ टक्के आहे.

एकूण पाऊस ५० मिमी नोंदविण्यात आला. दगडपारवा प्रकल्पात ३१४.६५ मीटर पातळी असून, २.४६ दलघमी (२४.१४%) साठा आहे. सोमवारी येथे ६ मिमी व एकूण ८३ मिमी पावसाची नोंद झाली आहे.

---

मनपाच्या सहकार्याने उद्यानांमध्ये करणार वृक्षांची लागवड

## श्री शिवाजी महाविद्यालयातर्फे ऑक्सिजन पार्क उपक्रम

**अकोला/प्रतिनिधी**

श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय येथील राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) विभागातर्फे पर्यावरण संवर्धनासाठी ऑक्सिजन पार्क उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत महानगरपालिकेच्या सहकार्याने शहरातील विविध उद्यानांमध्ये मोठ्या प्रमाणात ऑक्सिजनयुक्त वृक्षांची लागवड करण्यात येणार आहे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामेश्वर भिसे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या अभिनव उपक्रमात पिंपळ, कडुलिंब, तुळस यांसारख्या झाडांची निवड करण्यात आली आहे, जी मोठ्या प्रमाणात ऑक्सिजन निर्माण करणारी असून पर्यावरणाच्या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहेत. हा उपक्रम तीन टप्प्यांमध्ये राबविण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यात वेगवेगळ्या उद्यानांमध्ये जागेची पाहणी, माती परीक्षण, झाडांची निवड आणि प्रत्यक्ष लागवड अशी पद्धत राबवली जाणार आहे. महानगरपालिकेचे आयुक्त, उपायुक्त आणि सर्व कर्मचारी वृंद यांचाही यामध्ये सक्रिय सहकार्य लाभणार आहे. या उपक्रमात महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वंयसेवक मोठ्या उत्साहाने सहभागी झाले आहेत. याशिवाय महाविद्यालयातील डॉ. संजय तिडके, डॉ. आनंदा काळे, डॉ. अश्विनी बलोदे, प्रा. सचिन भुतेकर, प्रा. शुभम राठोड आणि प्रा. मयुरी गुड्डे हे प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत.

### स्वच्छता आणि पर्यावरण संवर्धनाचे ध्येय

■ शहरातील अनेक उद्यानांची सध्या वाईट अवस्था आहे. तिथे स्वच्छता व झाडांची संख्या वाढवण्याची गरज आहे. ऑक्सिजन पार्क या उपक्रमातून केवळ वृक्ष लागवडच नव्हे तर स्वच्छता, पर्यावरण जागरूकता आणि नागरिकांसाठी हिरवे आरोग्यदायी पर्यावरण निर्माण करण्याचा उद्देश आहे.

*या उपक्रमाला विविध संस्था, संघटना आणि पर्यावरण प्रेमी '' नागरिकांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत आहे. ऑक्सिजन पार्क सारख्या उपक्रमामुळे शहरी भागात ऑक्सिजनचे प्रमाण वाढेल, पर्यावरण सुदृढ राहील आणि लोकांचे आरोग्यही चांगले राखले जाईल.*

*- **रोहन बुंदेले,** विद्यार्थी, शिवाजी महाविद्यालय, अकोला*

*शहरातील विविध उद्यानांमध्ये ऑक्सिजनयुक्त झाडे लावल्यास नागरिकांना नैसर्गिकरीत्या स्वच्छ हवा मिळेल. ही मोहीम शासनाच्या वृक्षलागवड उपक्रमाला बळ देणारी आहे. मनपा प्रशासनाच्या सहकार्याने ही मोहीम राबवण्यात येत आहे.*

*- **डॉ. रामेश्वर भिसे,** प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, अकोला*

---

## पंचायत समिती कर्मचाऱ्यांची वसाहत झाली जीर्ण

विभागाचे होतेय दुर्लक्ष : कर्मचाऱ्यांना रहावे लागते भाड्याच्या घरात

**मानोरा/प्रतिनिधी**

तालुक्यातील पंचायत समिती कार्यालयीन कर्मचाऱ्यांसाठी पंचायत समिती कार्यालय आवारात वसाहत तयार करण्यात आली होती. मात्र,कर्मचारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे या वसाहतीच्या देखभाल दुरुस्तीकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे या कर्मचारी वसाहतीची दुरवस्था झाली असून, या वसाहतीत मागील दहा -पंधरा वर्षांपासून कर्मचारी सुद्धा राहत नाही. वसाहतीतील अनेक निवासस्थाने जीर्ण झाली असून काही कर्मचारी भाड्याच्या घरात राहत असल्याचे चित्र आहे.

मानोरा पंचायत समितीची प्रशासकीय इमारत दोन मजली बांधकाम करण्यात आले. मात्र त्या सोबत त्याच आवारात असलेले कर्मचारी निवासकडे लोकप्रतिनिधी, प्रशासन यांनी निवासस्थान बांधकामाकडे लक्ष दिले नाही.

दहा पंधरा वर्षापूर्वी येथील निवासस्थान चांगल्या स्थितीत असल्यामुळे येथे वास्तव्यास असलेले कर्मचारी निवास स्थान मध्ये राहायचे. प्रशासन यांनी निवास दुरुस्तीकडे दूलक्ष केल्यामुळे निवास करिता असलेल्या इमारतीला काटेरी झुडपाने वेढा घातला असून इमारत जीर्ण झाली आहे. दरवाजे खिडक्या सुद्धा तुटलेल्या आहे. याकडे लोकप्रतिनिधी प्रशासन यांनी जीर्ण झालेली इमारत पाडून नवीन कर्मचारी वसाहत निर्माण करण्यात यावी, अशी मागणी जनतेतून होत आहे.

*पंचायत समिती सभापती निवासस्थान दुरुस्ती करिता लोकप्रतिनिधी वेळोवेळी निधी उपलब्ध करून देवून ती इमारत दुरुस्त करतात, मात्र कर्मचारी निवासाकडे लक्ष देत नाही कर्मचारी निवास नव्याने निर्माण व्हावे म्हणून सरपंच संघटना पाठपुरावा करणार*

*- **बबन देशमुख,** तालुका अध्यक्ष, सरपंच संघटना, मानोरा*

## न्यूज ब्रीफ

### विहिरीत पडून युवकाचा मृत्यू

**खामगाव :** शेतात असलेल्या विहिरीत पडून युवकाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील घारोड शिवारात उघडकीस आली आहे. निरोड येथील रहिवाशी मारोती रामदास मोहिते (३७) हा युवक ३० जून रोजी घारोड-निरोड कडे जाणाऱ्या जुन्या गाड रस्त्यावरील रायपूरे यांच्या शेतातील विहिरीत पडून मरण पावला. ही घटना काही वेळाने उघडकीस आल्यानंतर गावात एकच खळबळ उडाली. घटनेची माहिती मिळताच हिवरखेड पोलिसांनी घटनास्थळी धाव घेवून पंचनामा केला व नागरिकांच्या मदतीने मृतदेह विहिरीच्या बाहेर काढला. याप्रकरणी हिवरखेड पोस्टेला आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरु आहे.

### दुचाकीवरून पडल्याने महिलेचा मृत्यू

**खामगाव :** वादळी वारा व पावसामुळे धावत्या दुचाकीवरून तोल गेल्याने खाली पडून डोक्याला गंभीर मार लागल्याने महिलेचा मृत्यू झाल्याची घटना शेगाव मनसगाव रोडवर घडली. शेगाव येथून संतोष नारायण पारिखे (४३) रा. काझीखेड ता. बाळापूर व त्यांची बहीण कमलाबाई शंकर आमझरे (४५) रा. वानखेड हे २९ जून रोजी दुचाकी क्र. एमएच-३०-एएस-६५२५ ने जात असतांना मनसगाव शिवारातील लासूरकर यांच्या शेताजवळ वादळी वारा व पावसामुळे कमलाबाई आमझरे यांचा तोल गेल्याने त्या दुचाकीवरून खाली पडल्या. यात त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाली. त्यामुळे त्यांना त्वरित सईबाई मोटे सामान्य रुग्णालय शेगाव येथे दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

पंढरपूर येथे विठ्ठलाच्या भेटीसाठी भाविकांना घेवून पहिली बस रवाना

# आषाढीच्या वारीसाठी खामगाव आगारातून सुटणार ४० बसेस

**खामगाव / प्रतिनिधी**

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूर येथे विठ्ठलाच्या दर्शनासाठी जाणाऱ्या सर्व भाविक आणि वारकऱ्यांसाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही खामगाव आगाराकडून पंढरपूर स्पेशल बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १ जुलै रोजी पंढरपूसाठी पहिली बस वारकऱ्यांना घेवून रवाना झाली आहे. यंदाही खामगाव आगाराकडून ४० बसेसची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती येथील आगारप्रमुखांकडून देण्यात आली आहे.

आषाढी एकादशीनिमित्त पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी बुलढाणा विभागातून २ जुलैपासून एसटी महामंडळाच्या विशेष बससेवेचा आरंभ होणार आहे. १३ जुलैपर्यंत चालणाऱ्या या सेवेअंतर्गत एकूण २५० विशेष बसेस विविध तालुक्यांतील प्रमुख ठिकाणांवरून विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरकडे धावणार आहेत. खामगाव एसटी आगारातून ४० बसेस सोडण्यात येणार आहेत.




### ७५ वर्षावरील भाविकांना मोफत प्रवास

पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या भाविकांसाठी परिवहन मंडळाने सवलती सुध्दा जाहीर केलेल्या आहेत. यामध्ये ७५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना मोफत प्रवास करता येणार आहे. तसेच महिलांना ५०टक्के सवलत सुद्धा लागू असणार आहे. अशी माहिती खामगाव स्थानक प्रमुख स्वाती तांबटकर यांनी दैनिक 'महाभूमि'ला दिली.

### ४४ प्रवासी असतील तर थेट गावात बस

एखाद्या गावातून ४४ प्रवासी एकत्र प्रवासासाठी तयार असतील, तर आगाऊ भाडे स्वीकारून थेट त्या गावातून बस देण्याचे निर्देश देण्यात आले असून या सुविधेचा भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान खामगाव आगारातून पंढरपूर स्पेशल बस सेवा २८ जून पासून सुरू करण्यात आली आहे. दरम्यान १ जुलै रोजी पंढरपूर स्पेशल बस भाविकांना घेऊन पंढरपूरकडे रवाना झाली आहे. तसेच आगारातून दररोज ६ गाड्या रवाना केल्या जाणार असल्याचेही येथील स्थानक प्रमुख स्वाती तांबटकर यांनी सांगितले. यात्रेच्या पार्श्वभूमीवर विभागातील बुलढाणा, चिखली, खामगाव, मेहकर, मलकापूर, जळगाव जामोद, शेगाव, देऊळगाव राजा, लोणार, सिंदखेड राजा आदी ठिकाणांवरूनही पंढरपूर यात्रेसाठी विशेष बसेस सोडल्या जातील. प्रत्येक आगार व्यवस्थापकाने त्यांच्या बसस्थानकातून सुटणाऱ्या वारी बसेसवर नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही देण्यात आले आहेत. यात्रेच्या काळात गर्दीची अधिक शक्यता असल्याने, अतिरिक्त फेऱ्या आणि बसेस उपलब्ध ठेवण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना दिल्या गेल्या आहेत. आषाढी यात्रेदरम्यान विशेष बससेवेचे विस्तृत नियोजन करण्यात आले आहे.

# चोरट्यांचा धुमाकूळ; १ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल लंपास

**खामगाव / प्रतिनिधी**

मागील काही दिवसात ग्रामीण भागात चोऱ्यांचे प्रमाण वाढले असून तालुक्यातील नांद्री येथील एका शेतकऱ्याच्या घरातून अज्ञात चोरट्याने सोन्याची पोथ, रोख रक्कम व घरासमोर उभी केलेली दुचाकी असा एकूण १ लाख ४५ हजारांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे

नांद्री येथील ज्ञानेश्वर गुलाबराव ठोंबरे यांच्या घराचे मागील गेट तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला व घरातील लोखंडी कपाट उघडून त्यातील २ ग्रॅम वजनाची सोन्याची पोथ (किं.८० हजार रू.) १५ हजार रोख रक्कम तसेच घरासमोर उभी असलेली काळ्या रंगाची मोटारसायकल लंपास केली. ही घटना १ जुलै रोजी सकाळी उघडकीस आली. याबाबत ज्ञानेश्वर ठोंबरे यांनी हिवरखेड पोलीस स्टेशनला तक्रार दिली असून पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून तपास सुरु केला आहे.

### हिंगणा कारेगाव येथेही चोरी

तालुक्यातील हिंगणा कारेगाव येथे चोरट्यांनी तुर, हरभरा व गव्हाचे कट्टे तसेच रोख रक्कम लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. येथील ओम सुरेंद्र फाळके (२५) यांच्या घराचा कडीकोंडा तोडून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला व घरातील तुरीचे पाच व हरभऱ्याचे दोन कट्टे लंपास केले तसेच लोखंडी कपाटातील १५ हजार रुपये देखील चोरुन नेले. त्याचप्रमाणे याच गावातील योगेश्वर रामेश्वर चव्हाण यांच्या घरातून देखील चोरट्यांनी गव्हाचे दोन कट्टे लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी ओम फाळके यांच्या तक्रारीवरुन खामगाव ग्रामीण पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल केला आहे.

# दुचाकी पेटवली; तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मलकापूर / प्रतिनिधी**

पानटपरीला लाथा मारल्यानंतर पोलिसांत तक्रार दिल्याच्या रागातून तिघांनी दुचाकी जाळली. ही घटना २९ जून रोजी रात्री शहरात घडली.

काळीपुरा भागातील रहिवासी संदीप नारायण जामोदे (४४) हे पानटपरी चालवतात. २९ जून रोजी रात्री १० वाजताच्या सुमारास त्यांनी पानटपरी बंद केली. तसेच दुचाकी पानटपरीसमोर उभी करून संदीप हे त्यांचा मित्र अंकुश मनोहर वानखेडे यांच्या दुचाकीवरून शिवनेरी धाबा येथे जेवणासाठी गेले. त्यानंतर रात्री एक वाजताच्या सुमारास त्यांना अजय राजपूत यांचा फोन आला. संदीप यांच्या पानटपरीच्या शटरला चार मुले लाथा मारत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे संदीप व त्यांचा मित्र अंकुश वानखेडे यांनी पानटपरीच्या जवळ जाऊन पाहिले. त्यावेळी तिथे निखील गव्हाळे व विशाल मुरे दोघे रा. माता महाकाली नगर मलकापूर हे टपरीच्या शटरला लाथा मारताना दिसले. त्यामुळे संदीप यांनी मित्रासोबत पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. तक्रार देऊन परत पानटपरीकडे रात्री तीनच्या सुमारास आले असता निखील गव्हाळे व विशाल मुरे हे संदीप यांची दुचाकी जाळताना दिसले. संदीप व त्यांचा मित्र अंकुश वानखेडे यांनी गाडी का जाळत आहात, अशी विचारणा केली असता त्या दोघांनी शिवीगाळ करून तुम्हालाही जाळून टाकू अशी धमकी दिली. या घटनेत दुचाकी संपूर्ण जळून खाक झाली. त्यामुळे ८० हजारांचे नुकसान झाले. या प्रकरणी संदीप जामोदे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलिसांनी निखील गव्हाळे, विशाल मुरे व एका अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास मलकापूर पोलीस करीत आहेत.

# सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्यांचे वितरण

**शेगाव / प्रतिनिधी**

सहकार क्षेत्रात भरीव योगदान देणारे तसेच नेहमीच गरजवंताच्या हाकेला धावून जाणारे सेवाभावी व्यक्तिमत्व अदिती अर्बन चे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक महाभूमिचे मुख्य संपादक सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण जिल्ह्यात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



दरम्यान शेगाव तालुक्यातील शाळांमध्ये गरजू विद्यार्थ्यांना शालेय पाठ्यपुस्तकांसह साहित्यांचे मोफत वितरण ३० जून रोजी करण्यात आले. सहकार क्षेत्रात एक वेगळी ओळख निर्माण करणारे अदिती अर्बनचे संस्थापक अध्यक्ष तथा दैनिक महाभूमिचे मुख्य संपादक सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त ३० जून रोजी अदिती अर्बन शाखा शेगाव यांच्या वतीने शेगाव तालुक्यातील पूर्णा हायस्कूल भोनगाव, स्व. नारायणराव वानखेडे हायस्कूल अडसूळ, पारिजात विद्यालय मनसगाव, श्री साई विद्यालय जलंब, सातपुडा विद्यालय पहूरजिरा, महाराष्ट्र विद्यालय जानोरी, सेठ ग.भी. मुरारका हायस्कूल शेगाव, महात्मा फुले विद्यालय शेगाव, येथील विद्यार्थ्यांना मोफत वह्या, पुस्तके, पेन, पेन्सिल इत्यादी शालेय साहित्यांचे मोफत वितरण करण्यात आले. यावेळी शाखा व्यवस्थापक विशाल खंडागळे पाटील, हरिश्चंद्र बानाईत, कपिल भारंबे तसेच शाळेतील मुख्याध्यापक शिक्षक, विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

# जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात वृक्षारोपण



**खामगाव / प्रतिनिधी**

येथील जिल्हा परिषद कनिष्ठ महाविद्यालयात शिक्षक भारतीचे राज्य संघटक तथा अदिती अर्बनचे संस्थापक अध्यक्ष सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून १ जुलै रोजी शिक्षक व विद्यार्थ्यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबविण्यासाठी वृक्ष लागवड करणे काळाजी गरज आहे. हा हेतू समोर ठेवून येथील जिल्हा परिषद मुलांच्या शाळेतील मुख्याध्यापक आणि शिक्षकांनी ३० जून रोजी शिक्षक भारती या शिक्षक संघटनेचे प्रदेश सचिव सुरेश देवकर यांच्या वाढदिवसानिमित्त तसेच १ जुलै रोजी हरित क्रांतीचे जनक तसेच महाराष्ट्र राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या जयंतीचे औचित्य साधून शाळेच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्राचार्य उद्धव मुळे, कैलास कराड, संतोष मिसाळ, वृषाली मोहने यांच्यासह विद्यार्थी व विद्यार्थिनींची उपस्थिती होती.

### 'अतिक्रमण धारकांना त्वरित गाळे उपलब्ध करून द्या'

**खामगाव :** नगर परिषदेने अतिक्रमण हटाव मोहीम राबवून विकासात्मक कारवाईला सुरुवात केली आहे. परंतु ज्या अतिक्रमणावर बुलडोजर चालवण्यात आला आहे. त्यांच्यावर बेरोजगारीचे संकट कोसळले आहे. त्या बेरोजगारांसाठी त्वरित नगर परिषदेने गाळे उपलब्ध करून द्यावे. अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने मुख्याधिकारी डॉ. प्रशांत शेळके यांना निवेदन देऊन करण्यात आली आहे.

निवेदनात नमूद आहे की, नगर परिषदेच्या अतिक्रमण हटाव मोहीमेमुळे अतिक्रमणधारकांवर बेरोजगारीची कुऱ्हाड कोसळली असली तरी या अतिक्रमणधारकांनाच प्राधान्याने नगर परिषदेकडून बनविण्यात येणाऱ्या गाळ्यांचे सदर अतिक्रमण धारकांनाच उपलब्ध करून देऊन त्यांचा रोजगार पुन्हा सुरू करण्यास सहकार्य करावे. असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# महामार्गात गेलेल्या जमिनीचा मोबदला मिळवून देण्यासाठी शरद पवारांकडे मागणी

**मलकापूर / प्रतिनिधी**

छत्रपती शिवराय प्रतिष्ठाण मलकापूर यांची राष्ट्रीय महामार्ग क्र.६ मध्ये जमीन गेली असून या १५०० चौ.मी. जमिनीचा वाढीव मोबदला २०२४ पासून केंद्र सरकारकडून मिळाला नसल्याने या प्रतिष्ठानची अनेक कामे बंद पडली आहेत. यामुळे केंद्र सरकारकडून तो वाढीव मोबदला मिळविण्यासाठी मदत करावी, अशा मागणीचे निवेदन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे संस्थापक अध्यक्ष माजी केंद्रीय कृषीमंत्री शरदचंद्र पवार यांच्याकडे छत्रपती शिवराय प्रतिष्ठानचे संचालक व शिष्टमंडळाने ३० जून रोजी मुंबई येथे भेट घेवून दिले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते श्रीराम पाटील, छत्रपती शिवराय प्रतिष्ठानचे सचिव ॲड.साहेबराव मोरे, संचालक प्रकाश पाटील, ज्ञानदेवराव हिवाळे, इंजि.सचिन तायडे, उद्योजक इंजि. कोमल तायडे आदींनी ३० जून रोजी



शरदचंद्र पवार यांची वायबी सेंटर मुंबई येथे भेट घेत छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या मंगल कार्यालयाच्या कार्याची माहिती दिली. छत्रपती शिवराय प्रतिष्ठाची १५०० चौ.मी. जमीन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ मध्ये गेली असून सुरूवातीची माफक नुकसान भरपाई मिळाल्यानंतर आर्बिट्रेशन बुलढाणा यांचेकडे अपील दाखल करून त्याचा निकाल २४ एप्रिल २०२४ रोजी होऊनही ती नुकसान भरपाईची रक्कम वाढवून देण्यात आली. मात्र या निकालाला तब्बल १ वर्षाच्यावर कालावधी उलटल्यानंतरही केंद्र सरकारकडून या नुकसान भरपाईची वाढीव रक्कम अद्यापही देण्यात आली नाही. याबाबत स्वत: लक्ष घालून ही रक्कम मिळवून द्यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने शरदचंद्र पवार यांचेकडे केली आहे. यावेळी शिष्ट मंडळाने संसदरत्न खा.सुप्रिया सुळे यांचीही भेट घेतली. यावेळी शरदचंद्र पवार व खा.सुप्रिया सुळे यांनी छत्रपती शिवराय प्रतिष्ठानच्या उद्घाटन समारंभाच्या कार्यक्रमाला येण्याचे आश्वासन शिष्टमंडळाला दिले.

# अतिवृष्टीने फळबागांचे नुकसान; शेतकऱ्यांकडून मदतीची मागणी

### तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**संग्रामपूर / प्रतिनिधी**

गत वर्षात झालेल्या अतिवृष्टीमुळे पळशी झाशी येथील संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते.अद्याप अतिवृष्टीची मदत शेतकऱ्यांना मिळालेली नाही. त्यामुळे पळशी झाशी येथील शेतकऱ्यांना तात्काळ अतिवृष्टीची मदत द्या, या मागणीचे निवेदन १जुलै रोजी तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना देण्यात आले.

निवेदनात नमूद आहे की, तालुक्यातील पळशी झाशी येथील शेतकऱ्यांचे २०२४-२०२५ मध्ये अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे संत्रा फळबागेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पंचनामा होऊन सर्व प्रकारच्या याद्या ह्या महसूल विभागाकडे उपलब्ध आहेत. अजूनपर्यंत कुठल्याच प्रकारची शासनाकडून मदत मिळालेली नाही. ही मदत १५ दिवसांच्या आत जर मिळाली नाही तर येत्या २१ जुलै पासून सर्व शेतकऱ्यांना सोबत घेऊन लोकशाही मार्गाने आंदोलन करू, असा इशारा या निवेदनातून देण्यात आलेला आहे.

या निवेदनावर अमोल ठाकरे, सुनील मुकुंद, विजय ठाकरे, नाना पाटील, गजानन मुकुंद, सुभाष मारोडे, अशोक भिवटे, दिलीप मुकुंद, सुनिल देशमुख, अरूण खोट्टे, रामेश्वर साबे, संजय देशमुख, वासुदेव ठाकरे, अनंत उंबरकर आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या या निवेदनावर आहेत.निवेदनाच्या प्रतिलिपी मुख्यमंत्री कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय यांना पाठविण्यात आलेले आहेत.

बाह्य शैक्षणिक अवेक्षण चमूने केली संस्थेतील सर्व सोई सुविधांची पाहणी

# खामगाव शासकीय तंत्रनिकेतनमधील सर्व अभ्यासक्रमांना अतिउत्कृष्ट मानांकन

**खामगाव / प्रतिनिधी**

येथील शासकीय तंत्रनिकेतन खामगावच्या सर्व अभ्यासक्रमांना बाह्य शैक्षणिक अवेक्षण चमूने संस्थेतील सर्व सोई सुविधांचा आढावा घेऊन अतिउत्कृष्ट मानांकन दिले आहे. त्यामुळे तंत्रनिकेतन संस्थेच्या शिरपेचात एक नवीन तुरा रोवला गेला आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा मंडळाद्वारे संस्थेत शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची गुणवत्ता तपासणी करून त्यांना मानांकन प्रदान केल्या जाते. शासकीय तंत्रनिकेतन खामगाव येथे पदविका अभियांत्रिकी संस्थांसाठी आवश्यक असलेले मानांकन मिळविण्यासाठी ३ एप्रिल २०२५ रोजी बाह्य शैक्षणिक अवेक्षण चमूने भेट दिली होती. या चमूत एक चेअरमन तर ३ विषयतज्ञांचा समावेश असतो. चमूचे स्वागत झाल्यानंतर संस्थेचे शैक्षणिक




अवेक्षक प्रा. राजेश मंत्री यांनी संस्थेच्या पॉवर पॉईन्टचे सादरीकरण केले होते आणि निगडीत विषयासंबंधी चमूने विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे संबंधित अधिकाऱ्यांनी दिली होती. मंडळाच्या निकषानुसार संस्था स्तरावर विद्यार्थ्यांकरिता उपलब्ध असलेल्या सोई सुविधांचा प्रत्यक्षात आढावा घेतला.

जसे की, कर्मशाळा, ग्रंथालय, ॲकेडमिक्स, संगणक प्रयोगशाळा, भौतिकशास्त्र प्रयोगशाळा, रसायनशास्त्र प्रयोगशाळा, भाषा प्रयोगशाळा, कार्यालय, मुलांचे वसतीगृह, मुलींचे वसतीगृह, जिमखाना, खेळांची मैदाने, माजी विद्यार्थी सभागृह, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मुलींसाठी स्वतंत्र विश्रामकक्ष, सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीन, प्रशिक्षण व आस्थापना कक्ष, प्लेसमेंट रेकॉर्ड्स इत्यादी. कार्यालयातील आस्थापना विभाग, अकाउंट विभाग, विद्यार्थी विभाग, कर्मचाऱ्यांचे पगारपत्रक, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती इत्यादी सर्व बाबी तपासून पाहिल्या. विषयतज्ञांनी विविध विभागातील सैध्दांतिक व प्रयोगशाळेच्या सर्व शैक्षणिक बाबी तपासल्या आणि सर्व विद्यार्थ्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या व त्यांचे निराकरण करण्याच्या सूचना संस्थेला देण्यात आल्या होत्या.

३० जून रोजी मंडळाच्या वेबसाईटवर प्रकाशित झालेल्या पत्रान्वये संस्थेतील संगणक, विद्युत आणि यंत्र अभियांत्रिकी विभागांना अतिउत्कृष्ट असे मानांकन प्राप्त झालेले असून अणुविद्युत व स्थापत्य या संस्थांना मागील वर्षीच एन.बी.ए. (नवी दिल्ली) मानांकन प्राप्त झालेले आहे. अशा तऱ्हेने आज रोजी संस्थेच्या सर्वच शाखांना अतिउत्कृष्ट असे मानांकन प्राप्त झालेले असून संस्थेच्या इतिहासात प्रथमच असे घडलेले आहे.

### संस्थेच्या शिरपेचात एक नवीन तुरा रोवल्या गेला – प्रा. प्रभुणे

ग्रामीण भागात असणाऱ्या संस्थेला असे मानांकन प्राप्त झाल्यामुळे संस्थेच्या शिरपेचात एक नवीन तुरा रोवला गेला आहे. महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर यांच्या कल्पक नेतृत्वाखाली, सहसंचालक मनोज अंधारे यांच्या मार्गदर्शनातून व प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांच्या कौशल्यपूर्ण प्रशासनात संस्थेतील सर्व अधिकारी आणि कर्मचारी संस्थेला अग्रेसर करण्यासाठी झटत आहेत. संस्थेचे प्लेसमेंट रेकॉर्ड उत्कृष्ट असून संस्थेच्या २४२ विद्यार्थ्यांची निवड विविध उद्योगधंद्यांमध्ये झालेली आहे व या मानांकनाचा फायदा विद्यार्थ्यांना निश्चित मिळेल. असे मानस संस्थेचे प्राचार्य डॉ. समीर प्रभुणे यांनी व्यक्त केलेले आहे.

# प्रशासनाच्या लेखी आश्वासनानंतर स्वाभिमानीचे समाधी आंदोलन स्थगित

**नांदुरा / प्रतिनिधी**

कर्जमाफी, पीक विमा यासह अनेक मागण्या घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी शिरसोडी येथील स्मशानभूमी येथे समाधी आंदोलन पुकारले होते. परंतु प्रशासनाकडून जिल्हाध्यक्ष नारखेडे यांना लेखी आश्वासन देऊन सदर आंदोलन तूर्तास स्थगित केले.



स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे यांनी सदर आंदोलनाच्या माध्यमातून झोपलेलं सरकार जागे करण्यासाठी तसेच विधानसभा निवडणुकीत महायुती सरकारने शेतकऱ्यांचा सातबारा कोरा करणार असे सांगून जनतेची फसवणूक केली. आता कर्ज माफी द्यायची वेळ आली तर समिती नियम, अटी ह्या सर्व गोष्टी समोर करत आहे. तर दुसरीकडे जगाचा पोशिंदा शेतकरी कर्जबाजारीपणामुळे आत्महत्या करत आहे. मात्र शासन आमदार, खासदारांना चांदीच्या ताटात जेऊ घालत आहे. अजित पवार यांच्या सिंचन घोटाळ्याची ७० हजार कोटीची फाईल कुठे आहे? त्याच्या चौकशीसाठी कोणती समिती नेमली? याचे उत्तर मुख्यमंत्री फडणवीस यांनी जनतेला द्यावे. पीक विमा सरकारने व कंपनीने रखडून ठेवले, दुष्काळी अनुदानमध्ये तलाठी यांनी घोटाळे केले. अशा अनेक समस्या घेऊन स्वाभिमानी शेतकरी संघटनेने समाधी घेण्याचा निर्णय घेतला होता. परंतु प्रशासनाकडून योग्य ती दखल घेऊन पोलीस बंदोबस्त ठेवून लेखी आश्वासन देऊन आंदोलन तूर्तास स्थगित केले आहे. १५ ते २० दिवसात योग्य निर्णय लागला नाही तर हा लढा या पेक्षा तीव्र स्वरूपात होईल. असा इशारा देण्यात आला. यावेळी जिल्हाध्यक्ष निलेश नारखेडे, बाळू ठाकरे, नांदुरा तालुका अध्यक्ष रामदास डोसे, युवक तालुकाध्यक्ष गोलू पाटील, पंकज देवीकार, योगेश लांजुळकर, दिलीप पाटील, ईश्वर वानखेडे, चक्रधर वानखेडे, निलेश तायडे, चेतन गटमने, सारंग खर्चे, रामदास फरपट, युवराज बोरसे, माणिक आढाव, पुरुषोत्तम भोलवनकर, विशाल मुऱ्हेकर, अनंत वराडे, वैभव नाफडे, विकास बोदवडे, रमेश भोलवनकर, गोपाल वेरूकार, अभय खापरे, विठ्ठल खर्चे, संतोष गवई आदींचा सहभाग होता.

न्यूज ब्रीफ

## वडिलाच्या वर्षश्राद्धाला वृक्षारोपण



**चिखली :** तालुक्यातील पाटोदा येथील स्व.सुखदेवराव नामदेवराव बागुल यांच्या वर्षश्राद्ध कार्यक्रमानिमित्त ३० जून रोजी हिंदू स्मशानभूमीत वृक्षारोपण करुन झाडे लाव, झाडे जगवा असा संदेश देत वड, पिंपळ, चिंच या देशी वृक्षांचे रोपण करण्यात आले. यावेळी सरपंच प्रदीप सोळंकी, गजानन सोळंकी, जगन्नाथ सोळंकी, वैद्य, अनिल सोळंकी, राहुल सोळंकी, पुंजाजी सोळंकी, दगडूबा बागुल, गजानन बागुल, किशोर बागुल, संगीता बागुल, सुनीता बागुल, निला बागुल, पल्लवी बागुल, स्वाती बागुल, नारायण वैद्य, विकास गवई, संदीप गुंजाळकर, यांच्यासह बागुल परिवार आणि ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## जिल्हा कारागृहात आंतरराष्ट्रीय योग दिवस

**बुलढाणा :** जिल्हा कारागृह बुलढाणा व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, बुलढाणा यांच्या संयुक्त विद्यमाने ११ वा आंतरराष्ट्रीय योग दिन कारागृहामध्ये उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमास कारागृह अधीक्षक संदीप भुतेकर, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणचे सचिव नितीन पाटील, ॲड. विक्रांत मारोडकर, वरिष्ठ तुरुंगाधिकारी मेघा बाहेकर, तसेच कारागृहातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमात योग शिक्षिका डॉ. वैशाली नाईक यांनी उपस्थितांना नियमित योगाभ्यासाचे शारीरिक व मानसिक लाभ समजावून सांगितले.

## स्टेट बँकेच्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण

**उदयनगर :** भारतीय स्टेट बँक स्थापन होऊन सत्तर वर्ष झाली आहे. १ जुलै रोजी अमडापूर भारतीय स्टेट बँक शाखा मॅनेजर रमेश करमकर यांच्या पुढाकाराने बँक इमारतीच्या समोर कृषी दिनाचे औचित्य साधून रातराणी, जुई, परिजातक, अपोली फायकस, ग्रीन फायकस, सोनचाफा, चाफा अशा विविध वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. वर्धापदिनानिमित्त सरपंच वैशाली गवई व बँक मॅनेजर यांच्या हस्ते केक कापण्यात आला. यावेळी शाखा व्यवस्थापक रमेश करमकर यांनी आम्ही अपंग व वयोवृद्धांसाठी व्हील चेअर ची उपलब्धता, शेतकरी व बेरोजगार युवकांसाठी राबवत असलेल्या अनेक योजनांची माहिती दिली.

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद..

# कागदाचा वापर कमी करण्यावर भर, पर्यावरणासाठी सरसावले बुलढाणेकर!

बुलढाणा /प्रतिनिधी

वीजबिलांसाठी छापील कागदाचा वापर पूर्णपणे बंद करीत केवळ इमेल व एसएमएसचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांनी महावितरणच्या गो-ग्रीन योजनेमध्ये सक्रिय सहभाग घेतल्याचे दिसत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील ७ हजार ८२ ग्राहकांनी यामध्ये सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला आहे.




पर्यावरणाला हातभार लावण्यासाठी गो-ग्रीन योजनेत सहभागी होण्याची ऑनलाइन सुविधा व योजनेची सविस्तर माहिती महावितरणच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. वीजग्राहकांनी गो-ग्रीन योजनेमध्ये सहभागी व्हावे व पर्यावरणपूरक योजनेत योगदान द्यावे असे आवाहन महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी केले आहे.

इमेल व एसएमएसचा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात १० रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे ग्राहकांचा वीजबिलामध्ये वार्षिक १२० रुपयांचा आर्थिक फायदा होत आहे. विशेष म्हणजे गो-ग्रीन योजनेचा पर्याय निवडल्यानंतर संबंधित ग्राहकांच्या पहिल्याच वीजबिलामध्ये पुढील १२ महिन्यांची म्हणजे १२० रुपयांची सवलत एकरकमी देण्यात येत आहे. पूर्वी ही सवलत प्रत्येकी १० रुपये प्रत्येक बिलामध्ये मिळत होती.

वीजग्राहकांसाठी ऐच्छिक असलेल्या गो-ग्रीन योजनेला राज्यात प्रतिसाद वाढत आहे. या योजनेत आतापर्यंत ५ लाख ३ हजार ७९५ पर्यावरणस्नेही वीजग्राहक सहभागी झाले आहेत. या ग्राहकांना ६ कोटी ४ लाख ५५ हजार ४०० रुपयांचा वार्षिक फायदा होत आहे.

### गो-ग्रीन योजनेचे फायदे

- महावितरणच्या संगणक प्रणालीमध्ये वीजबिल तयार झाल्यानंतर लगेचच संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत इमेलवर व मोबाईलवर एसएमएसद्वारे दरमहा वीजबिल पाठविण्यात येत आहे. वीजबिलांच्या तारखेपासून सात दिवसांमध्ये रकमेचा तत्पर भरणा केल्यास एक टक्के सवलत दिली जाते. त्यासाठीही वीजबिल तात्काळ ऑनलाईनद्वारे भरणे सोयीचे झाले आहे. वीजग्राहकांना इमेलद्वारे प्राप्त झालेले दरमहा वीजबिल संगणकात सॉफ्ट कॉपीमध्ये जतन करून ठेवता येते. वीजबिलासह मागील ११ महिन्यांचे असे एकूण १२ महिन्यांचे वीजबिले मूळ स्वरुपात उपलब्ध आहेत.

## राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेत बुलढाण्याच्या प्रांजलचे सुयश




बुलढाणा /प्रतिनिधी

राजधानी दिल्ली येथे २६ व २७ जून रोजी पार पडलेल्या महिलांच्या राष्ट्रीय खेलो इंडिया स्पर्धेत बुलढाणा जिल्ह्यातील प्रांजल प्रविण नरवाडे हिने महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करत १७ वर्षीय वयोगटातील मुलींमधुन संपूर्ण भारतातून तिसरे स्थान पटकाविले आहे.

प्रांजल अवघ्या १३ वर्षाची असून ती बुलढाणा जिल्ह्यातील शिवण आर्चरी ॲकडमीमध्ये चंद्रकांत इलग यांच्याकडे धनुर्विद्येचे प्रशिक्षण घेत आहे. तिने आपल्या यशाचे श्रेय तिचे प्रशिक्षक इलग यांना दिले असून भविष्यात चांगली कामगिरी करण्याचा तिचा मानस आहे. या अगोदर प्रांजलने शालेय नॅशनल व असोसीयशन नॅशनलचे सुध्दा मेडल प्राप्त केले आहे. ती २ वेळा नॅशनल व २ वेळा स्टेट विनर राहिलेली आहे. या स्पर्धेत तिला प्रमाणपत्र व रोख पारितोषीक बक्षीस म्हणून देण्यात आले आहे. ह्या विजयानंतर तिला पुढील ३ वर्षासाठी 'खेलो इंडिया' भारत सरकार तर्फे स्कॉलरशिप पण सुरु झाली आहे.

# पीएम किसान सन्मान निधीचा २० वा हप्ता मिळणार!

### ई-केवायसी, आधार सीडिंग करण्याचे आवाहन

बुलढाणा /प्रतिनिधी

केंद्र शासन पुरस्कृत प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचा लाभ जुलै, २०२५ मध्ये वितरीत करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील ३ हजार ३९६ शेतकऱ्यांची ई केवायसी आणि ४ हजार ५३४ शेतकऱ्यांचे आधार सीडिंग प्रलंबित आहे. शेतकऱ्यांनी प्रलंबित ई-केवायसी, आधार सीडिंग व बँक खात्याला डिबीटी इनेबल करणे किंवा इंडिया पोस्ट पेमेंट बँक मध्ये खाते उघडून त्या खात्याला आधार संलग्न करून डिबीटी इनेबल करण्याचे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेसाठी केंद्र आणि शासनाकडून वार्षिक प्रत्येकी सहा हजार आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेमार्फत वार्षिक प्रत्येकी सहा हजार रुपये शेतकरी कुटुंबांना दिले जात आहेत. त्यासाठी ई-केवायसी आणि आधार सीडींग करणे अत्यावश्यक आहे, नसल्यास शेतकरी लाभापासून वंचित राहतील. त्यासाठी शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि कार्यालय व तालुक्यातील कृषी सहाय्यक किंवा गाव नोडल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

# नुकसानग्रस्तांच्या मदतीसाठी ५०० कोटींच्या पॅकेजची मागणी

आ. खरात यांनी घेतली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट..

मेहकर /प्रतिनिधी

मेहकर व लोणार तालुक्यांमध्ये २५ व २६ जून रोजी झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसाने शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उबाठा) गटाचे आ. सिद्धार्थ खरात यांनी विधानसभा अधिवेशनात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन ५०० ते ७०० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज जाहीर करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात आ. खरातांनी म्हटले आहे की, दोन्ही तालुक्यांमध्ये सरासरी २१२ मिमी पावसाची नोंद झाली असून, मेहकर तालुक्यातील काही भागांमध्ये हा पाऊस २०० ते २२७ मिमी दरम्यान कोसळला. शासनाच्या नियमांनुसार ६५ मिमी पेक्षा अधिक पावसाला



नैसर्गिक आपत्ती मानून मदत दिली जाते, त्यामुळे या भागात झालेला पाऊस त्याच्या अनेक पट अधिक असल्यामुळे परिस्थिती पूर्णतः बिघडली आहे. पावसाने नद्या व नाले भरून वाहत होते, काहींनी आपला प्रवाह बदलल्याने शेतजमिनी खरडून गेल्या आहेत. मोठ्या प्रमाणावर माती वाहून गेली असून काही जमिनींवर मोठे टोळ साचल्यामुळे त्या कायमस्वरूपी नापिक झाल्या आहेत. काही भागात तर शेतांमध्ये जलाशय निर्माण झाल्यासारखे चित्र आहे. शेतकऱ्यांनी केलेली पेरणी पूर्णतः वाया गेली असून, गाळ साचल्यामुळे पुढील शेतीसाठीही अडचण निर्माण झाली आहे. शेतांमधील बोअरवेल, विहिरी, सोलर पंप, स्प्रिंकलर सेट, केबल्स आणि पाइपलाइन यांचेही मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेत रस्ते, गाव रस्ते, विद्युत पोल, केबल्स, सा.बा.विभागाचे रस्ते, पंतप्रधान ग्रामसडक योजनेचे मार्ग, जलसंधारण विभागाच्या पाझर तलाव व कालवे, समृद्धी महामार्ग, शेततळी आदींचे नुकसान झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः या भागाला भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि किमान ५०० ते ७०० कोटी रुपयांचे विशेष पॅकेज तात्काळ जाहीर करावे, अशी विनंती करण्यात आली आहे.

### पालकमंत्री यांनाही निवेदन..

- या निवेदनाची शासन स्तरावर दखल घेतली जावी आणि शेतकऱ्यांना तात्काळ दिलासा मिळावा, ही संबंधित भागातील जनतेची अपेक्षा आहे.निवेदनाची प्रत पालकमंत्री मकरंद पाटील,बुलढाणा यांना सुद्धा भेटून देण्यात आली आहे.

## भोसा जि.प. सिंचन तलावाचा सांडवा फुटला

**मेहकर :** भोसा येथील जिल्हा परिषद सिंचन तलावाचा सांडवा फुटल्याने परिसरातील शेती आणि पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. २५ व २६ जून रोजी झालेल्या संततधार पावसामुळे मेहकर तालुक्यातील अनेक शेतशिवार जलमय झाले असून, अंकुरलेल्या पिकांचे नुकसान होण्याची भिती आहे.

नदीकाठच्या शेतांमध्ये पाणी शिरल्यामुळे माती वाहून गेली असून, तलाव फुटल्याने खालच्या भागातील शेती खरडून गेली आहे. तलावातील पाण्याची पातळीही मोठ्या प्रमाणात खाली गेली आहे. विशेष म्हणजे, या तलावाच्या सांडव्याखाली असलेला केटीवेअर पूर्णपणे गाळाने बुजून गेला आहे. पाच वर्षांपासून या केटीवेअरला गेट बसविण्यात आलेले नाही.

## अंढेरा ग्रामस्थांनी केला लाईनमन पन्हाळेंचा सत्कार

अंढेरा /प्रतिनिधी

महावितरण विभागात कार्यरत असलेले भूषण पन्हाळे हे गेल्या अनेक दिवसांपासून अंढेरा येथे लाईनमन म्हणून काम पाहत होते. मात्र, नुकतीच त्यांची देऊळगाव येथे बदली झाली असता गावकऱ्यांनी त्यांनी दिलेल्या चांगल्या सेवेबद्दल निरोप समारंभाच्या कार्यक्रमांचे आयोजन करुन त्यांचा शाल, श्रीफळ देवून सत्कार केला.



श्री औंढेश्वर महाराज मंदिरावर आयोजित निरोप समारंभाच्या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून ठाणेदार रुपेश शक्करगे यांची उपस्थिती होती. यावेळी गावकरी व मान्यवरांच्या हस्ते लाईनमन भूषण पन्हाळे यांचा शाल, श्रीफळ व सन्मापत्र देवून गौरव करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विष्णू बनकर यांनी केले. यावेळी प्रा. दिलीप सानप, संतोष नागरे, रामेश्वर वाघ, नितीन सानप, राजू विभोते, बंडू देशमुख, गजानन सानप, कैलास नागरे, बद्री मुंडे. गणेश सानप. कैलास सानप. अमोल इंगळे, संतोष सानप पाटील, गजानन तेजनकर, विष्णू केदार, अनंता ताठे, माधव सानप, कडुबा सानप, रवी सानप,पप्पू राठोड, संजय डोईफोडे, धामोदर आणा, सुनील पवार, रवी तेजनकर, रामा मगर, कैलास देशमुख आदिंसह पत्रकारांची उपस्थिती होती.

# शेतकऱ्यांना एक रुपयात विमा देण्याची मागणी

डोणगाव /प्रतिनिधी

शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणारी एक रुपयामध्ये पीकविमा योजना राज्यसरकारने बंद केली आहे. त्यामुळे शेतकरी विमा संरक्षणापासून वंचित राहत आहे. सदर पीकविमा योजना पुर्ववत सुरु करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे प्रशांत पाटील यांनी १ जुलै रोजी जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. येत्या १५ दिवसात मागणी मान्य न झाल्यास डोणगाव ग्रां.प. समोर साखळी उपोषण करण्याचा इशारा दिला आहे.



निवेदनात नमुद आहे की, मेहकर तालुक्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे डोणगाव, शेलगाव देशमुख, भोसा, भिवापूर, गोहगाव दांदळे, पांगरखेड, लोणी गवळी, आंधृड, कऱ्हाडवाडी या गावांमध्ये शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. पुरामुळे शेतकऱ्यांची अंकुरलेली पीके वाहून गेली. जमीन खरडून गेली आहे. शेतकऱ्यांचे तुषारसंच, ठिबकसंच व सोलरसंच वाहून गेले आहे. पाण्यामुळे अनेक विहीरी खचल्या आहेत, मोटरपंप निकामी झाले आहे. डोणगाव सह अनेक गावात पाणी शिरल्याने नागरिकांच्या घरातील जिवनावश्यक वस्तू वाहून गेल्या आहेत. डोणगाव, शेतकऱ्यांना राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल म्हणजेच एनडीआरएफ च्या निकषाप्रमाणे तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी. डोणगाव जिल्हा परिपद सर्कल मधील गावांमध्ये रखडलेल्या अर्धवट जलजीवन मिशन अंतर्गत येणाऱ्या सर्व पाणी पुरवठा योजना तात्काळ पूर्ण करण्यात याव्या. वाहून गेलेले शेतरस्ते तातडीने दुरुस्त करण्यात यावे.

महालक्ष्मी नगर मधील मुलींच्या प्राथमिक शाळेकडे जाण्यासाठी रस्ता नाही तरी सदर शाळेकडे जाणारा रस्ता त्वरीत दुरुस्त करण्यात यावा. सदर मागण्या पूर्ण कराव्या व नागरीकांना न्याय द्या अन्यथा मी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी मेहकरच्या वतीने नागरीकांसह येत्या १५ दिवसात ग्रामपंचायत कार्यालयासमोर साखळी उपोषण करणार असल्याचा इशारा दिला आहे.

तोंडी आदेशावर विश्रामगृह पाडणाऱ्या दोषींना निलंबित करा

# काँग्रेसचा सार्वजनिक बांधकाम विभागाला घेराव

चिखली /प्रतिनिधी

ब्रिटीशकालीन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या विश्राम गृहाच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी जिल्हाधिकारी यांनी तब्बल ८० लाखाचा निधी मंजुर केला असता सदर इमारतीचे जतन होणे अपेक्षित होते. यामुळे ऐतिहासिक ठेवाही जपता आला असता आणि नवीन इमारात बांधण्याचा खर्चही वाचला असता. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी रातोरात्र प्रताप करत इमारत पाडली. कुठल्याही प्रकारच्या शासकीय परवानग्या नसतांना केवळ तोंडी आदेशावर विश्रामगृह पाडण्यात आले. यावर चिखली तालुका व शहर काँग्रेसने घेराव आंदोलन करत ब्रिटीशकालीन विश्राम गृहाची इमारत मजबुत करण्याऐवजी नियमबाहय पाडणाऱ्या आधिकाऱ्यांना निलंबित करावे, अशी मागणी केली आहे.

काँग्रेसकडून ३० जून रोजी तहसिलदार यांच्यामार्फत जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद आहे की, नियमांनुसार धोकादायक किंवा दुरूस्त होण्यापलीकडच्या स्थितीत





असल्याखेरीज कोणतीही इमारत पाडण्यात येवु नये. असे असतांना चिखली येथील विश्रामगृहाच्या बाबतीत हे पाडकाम नियमांमधील नमुद केलेल्या आधिकारांच्या मर्यादेबाहेर आहे. सरकारने सार्वजनीक बांधकाम विभागाचे नाव बदलुन सार्वनीक पाडकाम विभाग ठेवावे. सध्या बांधकाम व दुरूस्ती करण्याऐवजी त्यांचा वास्तु पाडण्यावरच जास्त भर आहे. अभियंता व ठेकेदारांच्या सरकारातील मालकांनी त्यांना बांधकाम पाडण्याची व मलीदा लाटण्याची पुर्ण मुभा दिली असावी, असे वाटते. याची सखोल चौकशी होवुन संबंधीतांना निलंबीत करून त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे. तसेच सरकारी मालमत्तेची नुकसान भरपाई त्यांचेकडुन तात्काळ वसुल करून घेण्यात यावी, अन्यथा चिखली काँग्रेसच्या वतीने यापुढे स्वरूपाचे आंदोलन छेडण्यात येईल व याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील, असा इशाराही देण्यात आला आहे. यावेळी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे, तालुका अध्यक्ष राम जाधव, शहर अध्यक्ष राहुल सवडतकर, अतहरोद्दीन काझी, डॉ. मोहमंद इसरार, कुणाल बोंद्रे, सचिन बोंद्रे, प्रा.राजु गवई, प्रा. निलेश गांवडे, विकास लहाने, रिक्की काकडे, डॉ. सत्येंद्र भुसारी, ज्ञानेश्वर सुरूशे, किशोर कदम, शहेजादअली खान, पांडुरंग पाटील भुतेकर, जय बोंद्रे, रामेश्वर भुसारी, विजु पाटील शेजोळ, ईश्वर इंगळे, शिवराज पाटील, डॉ. अमोल लहाने, मनोज लाहुडकर, डॉ. संजय घुगे, मनोज जाधव, अच्युतराव पाटील, शिवा म्हस्के, प्रकाष राठोड, प्रसाद डुकरे, सागर वायाळ, विजय सोनवाल,प्रविण वानखेडे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### तोंडी आदेश दिल्याचे केले मान्य

- वरिष्ठ अधिकाऱ्याने काँग्रेसला दिलेल्या पत्रात विश्रामगृहाचे काम प्रत्यक्षात सुरु केले होते. मात्र काही भाग ढासळल्याने कनिष्ठ अभियंता आर.एस. कड यांनी जीवित हानी होवू नये, म्हणून कंत्राटदाराला इमारत पाडण्याचे तोंडी आदेश दिल्याचे सांगितले आहे. इमारत पाडत असतांना विविध विभागांच्या परवानग्या आवश्यक होत्या. घसरा मूल्य, इमारतीतील साहित्य, इमारत वापरण्यायोग्य नाही. याचे मूल्यांकन होणे गरजेचे असतांना कंत्राटदाराला तोंडी आदेश देऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने इमारत पाडल्याने मोठ्या प्रमाणात प्रश्न उपस्थित होत आहे.

### अधिकाऱ्यांचे बोलविते धनी कोण?

- चांगल्या स्थितीतील वास्तु पाडण्याचे काहीच कारण नव्हते. शासनाचा निधी मंजुर असतांना डागडुजी,दुरूस्ती करून ती इमारत पुन्हा चांगल्या प्रकारे वापरात येवु शकत होती. परंतु ती इमारत पाडण्याचा घाट का घातल्या गेला ? त्यांचे बोलविते धनी कोन ? आणि सरकारच्या पैशाचा म्हणजेच जनतेच्या पैशाचा असा अनाठाई खर्च कोण करीत आहे ? याची सखोल चौकशी होवुन संबंधीतांना निलंबीत करून त्यांच्यावर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राहुल बोंद्रे यांनी केली आहे.

## सरपंच पदाची आरक्षण सोडत ८ जुलैला

मोताळा /प्रतिनिधी

ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय मुंबई यांच्या ५ मार्च च्या अधिसूचनेनुसार, मोताळा तालुक्यातील एकूण ६५ ग्रामपंचायतींसाठी सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या व मुंबई ग्रा. पं.निवडणूक नियमामधील तरतुदींनुसार हा कार्यक्रम पार पाडण्यात येणार आहे.

आरक्षण सोडत सन २०२५ ते २०३० या कालावधीत सार्वत्रिक निवडणुकांद्वारे गठीत होणाऱ्या ग्रामपंचायतींमध्ये अनु.जाती, अनु.जमाती, इतर मागासवर्गीय तसेच खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षण निश्चित करण्याच्या दृष्टीने होणार आहे. आरक्षण सोडतीमुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये विविध समाजघटकांचे सशक्तीकरण आणि प्रतिनिधित्व सुनिश्चित होणार आहे. सदर आरक्षण सोडत ८ जुलै रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात येणार असून, मोताळा तालुक्यातील सर्व लोकप्रतिनिधी, राजकीय पक्षांचे पदाधिकारी, तसेच नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# कृषी योजनांचा लाभ हवाय, फार्मर आयडी काढला का?

बुलढाणा /प्रतिनिधी

कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांचा लाभ शेतकऱ्यांना मिळावा, यासाठी शेतकरी ओळख क्रमांक १५ एप्रिल २०२५ पासून अनिवार्य करण्यात आले आहे. ज्या शेतकऱ्यांनी अजूनही शेतकरी ओळख क्रमांक बनवलेले नसेल, तर त्यांनी तात्काळ आपल्या नजीकच्या नागरी सुविधा केंद्र किंवा ग्राम कृषी विकास समितीकडे जाऊन नोंदणी करून शेतकरी ओळख क्रमांक बनवून घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी मनोजकुमार ढगे यांनी केले आहे.

जिल्ह्यात प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेत एकूण ४,३४,४६८ लाभार्थी असून, त्यापैकी २,९९,९६८ शेतकऱ्यांनी आतापर्यंत फार्मर आयडी काढले आहेत. शेतकरी ओळख क्रमांक अंतर्गत कृषी व संलग्न विभागाकडून शेतकऱ्यांच्या शेताची, आधार क्रमांकाशी संलग्न अशी माहिती एकत्र करून "फार्मर रजिस्ट्री" तयार करण्यात येणार आहे. या माहितीच्या आधारे लाभार्थ्यांची अचूक निवड करून



कृषी योजनांचा लाभ अधिक प्रभावी आणि पारदर्शक पद्धतीने वितरित करता येईल. शेतकरी ओळख क्रमांक तयार झाल्यानंतर शेतकऱ्यांना वारंवार प्रमाणिकरण करण्याची आवश्यकता राहणार नाही. तसेच सातबारा उतारा आधार कार्डाशी लिंक करून ठेवणे आवश्यक आहे. आधार कार्ड, आधारशी लिंक असलेला मोबाईल क्रमांक, आधारशी लिंक असलेले बँक खाते, ७/१२ उतारा (सातबारा) किंवा नमुना ८ जिल्ह्यात आतापर्यंत एकूण ३,९०,१२३ शेतकऱ्यांचे शेतकरी ओळख क्रमांक अर्थात 'फार्मर आयडी' तयार करण्यात आले आहेत. शेतकरी ओळख क्रमांक शिवाय कृषी विभागाच्या कोणत्याही शासकीय योजनेचा लाभ मिळणार नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपला शेतकरी ओळख क्रमांक त्वरित बनवून घ्यावा, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

## भारताच्या क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत होतील..

# 'राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५' ला मंत्रिमंडळाची मंजुरी



**नवी दिल्ली:** भारत सरकारने नवीन 'राष्ट्रीय क्रीडा धोरण २०२५' ला मान्यता दिली आहे. ज्याद्वारे जागतिक क्रीडा बाजारपेठेत देश मजबूत होईल. यामुळे भारताच्या क्रीडा पायाभूत सुविधा मजबूत होतील आणि देश २०३६ च्या ऑलिंपिकचे आयोजन करण्याचा दावा करू शकेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिमंडळाने मंगळवारी या धोरणाला मंजुरी दिली. हे धोरण २००१ च्या मागील राष्ट्रीय क्रीडा धोरणाची जागा घेईल. मंत्रिमंडळाच्या मंजुरीनंतर, क्रीडा मंत्री मनसुखलाल मांडवीय यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर लिहिले की, 'नवीन धोरण भारतातील क्रीडा संस्कृतीला तळागाळात प्रोत्साहन देईल. त्याचे लक्ष खेळाडू विकास आणि पायाभूत सुविधा वाढविण्यावर असेल.'

केंद्रीय मंत्रालय, नीती आयोग, राज्य सरकारे, राष्ट्रीय क्रीडा महासंघ , खेळाडू, क्षेत्र तज्ञ आणि सार्वजनिक भागधारकांच्या सहकार्याने हे धोरण मंजूर करण्यात आले.

### काय आहे क्रीडा धोरणात ?

- गावोगावी क्रीडा कार्यक्रम घेऊन जाणे आणि त्यांना बळकट करणे. जेणेकरून मुलांची प्रतिभा सुरुवातीच्या टप्प्यातच ओळखता येईल आणि त्यांना एका मोठ्या व्यासपीठावर तयार करता येईल.
- गावे आणि शहरे दोन्ही ठिकाणी क्रीडा पायाभूत सुविधा वाढविण्यासाठी स्पर्धा आणि लहान लीगना प्रोत्साहन देणे.
- प्रशिक्षण आणि खेळाडूंच्या समर्थनासाठी जागतिक दर्जाची व्यवस्था निर्माण करणे.
- राष्ट्रीय क्रीडा महासंघांची क्षमता वाढवणे.
- क्रीडा विज्ञान, औषध आणि खेळाडू कार्यक्रमांसाठी तंत्रज्ञान विकसित करणे.
- क्रीडा प्रशिक्षक, तांत्रिक अधिकारी, पंच आणि सहाय्यक कर्मचारी विकसित करणे.
- भारतात क्रीडा पर्यटनाला प्रोत्साहन देणे आणि प्रमुख आंतरराष्ट्रीय कार्यक्रमांचे आयोजन करणे.
- क्रीडा उत्पादन प्रणाली मजबूत करणे आणि क्रीडा क्षेत्रातील स्टार्टअप्सना प्रोत्साहन देणे.
- सार्वजनिक-खासगी भागीदारी अंतर्गत क्रीडा स्पर्धांमध्ये खासगी क्षेत्राचा सहभाग वाढवणे, जेणेकरून सरकारवर निधीसाठी जास्त दबाव येऊ नये.
- आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, महिला, आदिवासी समाज आणि अपंग लोकांचा खेळात सहभाग वाढवणे.
- पारंपारिक आणि स्थानिक खेळांना प्रोत्साहन देणे.
- शिक्षणात खेळाला करिअरचा पर्याय बनवणे, जेणेकरून तरुणांनाही खेळाला करिअर म्हणून पाहावे.

# 'कॅप्टन कूल' आता धोनीचा ब्रँड!

## टोपण नावाचे घेतले पेटंट..





Trade Marks Registry

INTELLECTUAL PROPERTY INDIA

Registered Trade Marks and Application Status Information

Guideline for Use.

(NOT FOR LEGAL USE)

As on Date : 29/06/2025

Status : Accepted & Advertised

View Examination Report

| | |
|---|---|
| TM Application No. | 5966261 |
| Class | 41 |
| Date of Application | 05/06/2023 |
| Appropriate Office | KOLKATA |
| State | JHARKHAND |
| Country | India |
| Filing Mode | e-Filing |
| TM Applied For | CAPTAIN COOL |
| TM Category | TRADE MARK |
| Trade Mark Type | WORD |
| User Detail | Proposed to be used |
| Certificate Detail | |
| Valid upto/ Renewed upto | |
| Proprietor name | (1) MAHENDRA SINGH DHONI Single Firm |

**नवी दिल्ली :** भारतीय क्रिकेट संघाचा सर्वात यशस्वी कर्णधार आणि करोडो चाहत्यांच्या गळ्यातील ताईत असलेल्या महेंद्रसिंग धोनीने आता आपल्या 'कॅप्टन कूल' या प्रसिद्ध टोपण नावावर कायदेशीर हक्क प्रस्थापित केला आहे. धोनीने हे नाव ट्रेडमार्क म्हणून नोंदवण्यासाठी अर्ज केला होता, जो आता स्वीकारण्यात आला आहे. त्यामुळे यापुढे 'कॅप्टन कूल' हे केवळ टोपण नाव नसून धोनीचा अधिकृत ब्रँड बनला आहे.

धोनीने हा ट्रेडमार्क विशेषतः क्रीडा प्रशिक्षण, कोचिंग सेवा आणि प्रशिक्षण केंद्रांशी संबंधित व्यावसायिक वापरासाठी मिळवला आहे. ट्रेड मार्क्स रजिस्ट्री पोर्टलवर उपलब्ध माहितीनुसार, धोनीचा अर्ज स्वीकारण्यात आला असून तो १६ जून २०२५ रोजी अधिकृत ट्रेडमार्क जर्नलमध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

मैदानावर अत्यंत तणावाच्या क्षणीही शांत आणि संयमी राहण्याच्या त्याच्या वृत्तीमुळे चाहते आणि समालोचकांनी त्याला 'कॅप्टन कूल' हे नाव दिले होते. २००७ चा टी-२० विश्वचषक, २०११ चा एकदिवसीय विश्वचषक आणि २०१३ ची चॅम्पियन्स ट्रॉफी यांसारख्या मोठ्या स्पर्धा जिंकताना त्याच्या या समयोचित गुणाचे दर्शन घडले होते.

धोनीच्या वकील मानसी अग्रवाल यांनी सांगितले की, हा कायदेशीर प्रवास सोपा नव्हता. सुरुवातीला, ट्रेडमार्क रजिस्ट्रीने कायद्याच्या कलम ११(१) अंतर्गत यावर आक्षेप घेतला होता, कारण या नावाने आधीच एक नोंदणी अस्तित्वात होती.

मात्र, धोनीच्या कायदेशीर टीमने प्रभावी युक्तिवाद करत सांगितले की, 'कॅप्टन कूल' या नावाला धोनीच्या दीर्घकालीन आणि व्यापक वापरामुळे एक विशेष ओळख प्राप्त झाली आहे. हे नाव आता पूर्णपणे धोनीच्या व्यक्तिमत्त्वाशी जोडले गेले आहे. अखेरीस हा युक्तिवाद मान्य झाला आणि धोनीच्या नावाची अधिकृत नोंदणी झाली.

या निर्णयामुळे धोनीने मैदानाप्रमाणेच व्यावसायिक क्षेत्रातही एक मोठी खेळी जिंकली आहे.

## पाकिस्तानी संघाला कसोटी क्रिकेटसाठी मिळाला नवा प्रशिक्षक

**नवी दिल्ली:** पाकिस्तानी संघाला कसोटी क्रिकेटमध्ये नवीन प्रशिक्षक मिळाला आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने सोमवारी माजी अष्टपैलू खेळाडू आणि राष्ट्रीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक अझहर महमूद यांची कसोटी संघाचे कार्यकारी मुख्य प्रशिक्षक म्हणून नियुक्ती केली. त्यांनी आकिब जावेद यांची जागा घेतली आहे. महमूद यांनी संघाचे गोलंदाजी प्रशिक्षक आणि सहाय्यक मुख्य प्रशिक्षक म्हणून खूप काळ काम केले आहे.

डिसेंबर २०२४ मध्ये जेसन गिलेस्पी यांनी राजीनामा दिल्यापासून पाकिस्तानच्या कसोटी संघासाठी पूर्णवेळ मुख्य प्रशिक्षक नाही. त्यानंतर आकिब जावेद यांनी दक्षिण आफ्रिकेच्या दोन कसोटी सामन्यांच्या दौऱ्यासाठी आणि वेस्ट इंडिजविरुद्धच्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी अंतरिम पदभार स्वीकारला होता.

२०२४ च्या सुरुवातीला पाकिस्तानच्या न्यूझीलंड दौऱ्यापूर्वी अंतरिम आधारावर नियुक्ती झाल्यापासून अझहर राष्ट्रीय संघाचे सहाय्यक प्रशिक्षक होते. १९९६ पासून २० वर्षांच्या कालावधीत १४३ एकदिवसीय आणि २१ कसोटी सामन्यांमध्ये त्यांनी पाकिस्तानचे प्रतिनिधित्व केले.

## विम्बल्डन: गतविजेत्या अल्काराझची विजयाने सुरुवात

**नवी दिल्ली:** दोन वेळा विजेता राहिलेला कार्लोस अल्काराझने विम्बल्डनच्या पहिल्या फेरीत इटलीच्या फॅबियो फोग्निनीचा पराभव केला आहे. ब्रिटिश खेळाडू ऑलिव्हर टार्वेटनेही पुढच्या फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धेत अल्काराझला दुसरे मानांकन मिळाले आहे. इटलीचा जॅनिक सिनर पहिल्या क्रमांकावर आहे.

ग्रँड स्लॅम स्पर्धेच्या पहिल्या दिवशी, गवतावर खेळल्या गेलेल्या सेंटर कोर्टवर चार तासांपेक्षा जास्त काळ चाललेल्या सामन्यात २२ वर्षीय स्पेनच्या अल्काराझने ७-५, ६-७ (५-७), ७-५, २-६, ६-१ असा विजय मिळवला. सामन्याच्या निर्णायक सेटमध्ये १५ मिनिटांचा ब्रेक होता.



### अल्काराझचा सलग १९ वा विजय

- अल्काराझचा हा सलग १९ वा विजय आहे. त्याने फ्रेंच ओपनमध्ये जॅनिक सिनरला हरवून त्याचे पाचवे ग्रँड स्लॅम जेतेपद जिंकले आणि त्यानंतर ब्रिटिश ग्रासवर क्वीन्स जेतेपदही जिंकले. आता त्याचा सामना २१ वर्षीय टेरव्हेटशी होईल, ज्याने विम्बल्डनमधील त्याच्या पहिल्या सामन्यात स्वित्झर्लंडच्या लिआंड्रो रिडीला हरवले.




## 'फोर मोर शॉट्स प्लीज'चा नवीन सीझन लवकरच येणार प्रेक्षकांच्या भेटीला...

नवीन सीझनमध्ये ओळख, स्वातंत्र्य आणि भावना अधिक खोलवर एक्सप्लोर केल्या जातील, तेही शोच्या त्याच सिग्नेचर शैलीत म्हणजेच प्रामाणिकपणा, ग्लॅमर आणि जबरदस्त विनोदात. यावेळी काही नवीन चेहरे देखील दिसतील. हा सीझन दहापट जास्त मस्ती, केमिस्ट्री आणि उत्साहाने भरलेला असणार आहे.

प्राइम व्हिडिओनं आज १ जुलै रोजी घोषणा केली की, अमेझॉन 'फोर मोर शॉट्स प्लीज'चा शेवट सीझन लवकरच प्रीमियर होणार आहे. प्रेक्षक त्याच्या पुनरागमनाची आतुरतेनं वाट पाहत असताना, या आंतरराष्ट्रीय एमी-नामांकित वेब सीरीजच्या पुढील भागाच्या घोषणेनं उत्साह आणखी वाढवला आहे. प्रीतिश नंदी कम्युनिकेशन्स, रंगिता नंदी आणि इशिता नंदी निर्मित, शोनं आजच्या महिलांच्या जीवनातील चढ-उतारांचे वास्तविक चित्रण केले आहेत. चौथा सीझन हा आनंदानं भरलेला असणार आहे.





## विद्या बालनचा 'कमळी' प्रोमो आवडला चाहत्यांना

बॉलिवूड अभिनेत्री विद्या बालन ही एका व्हिडिओमुळे चर्चेत आली आहे. या व्हिडिओत ती एका शिक्षिकेच्या वेशभूषेत असल्याची दिसत आहे. यामध्ये तिच्याबरोबर एक विद्यार्थीनी आहे, जिचे नाव हे कमळी आहे. विद्याचा हा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर धुमाकूळ घातल आहे. आता हा व्हिडिओ अनेकांना आवडत आहे. विद्याने आजवर अनेक हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता विद्या व्हिडिओत चक्क मराठी बोलताना दिसत आहे. अनेकजण असा अंदाज लावत आहे, की विद्या नवीन मालिका 'कमळी'मध्ये दिसले, मात्र असे काही नसून ती फक्त मालिकेच्या प्रोमोमध्येच आहे. आता सोशल मीडियावर व्हायरल झालेला प्रोमो हा अनेकांना आवडला आहे. 'कमळी' ही नवीन मालिका ३० जून रोजी प्रेक्षकांच्या भेटीला आली आहे.आता ही मालिका देखील अनेकांना आवडत आहे. दरम्यान व्हायरल झालेल्या प्रोमोच्या कमेंट विभागात अनेक लोकांनी आपल्या प्रतिक्रिया दिल्या आहेत. एका चाहत्यानं या व्हिडिओच्या पोस्टवर लिहिलं, 'विद्या मॅडम तुम्ही खूप छान मराठी बोलता.' दुसऱ्या एकानं लिहिलं, 'सुंदर छान अप्रतिम' आणखी एकानं लिहिले, 'क्या बात.. विद्या ताई... अहो टॅलेंटेड तर तुम्ही आहातच.. एक्टिंग तर तुमच्या रक्तात आहेच आणि त्यांनी तुम्ही आमच्या सगळ्यांची मन जिंकली आहेतच.. पण आज इतकं छान मराठी बोलून आमच्या सारख्या मराठी मातृभाषा असणाऱ्या भारतीय प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य केले.. वा खूपच सुंदर अगदी तुमच्या देखण्या रूपाप्रमाणे.. आणि नावाप्रमाणे.. विद्या.' याशिवाय काहीजणांनी यावर हॉर्ट आणि फायर इमोजी शेअर करून कमळी आणि विद्या बालनवर प्रेमाचा वर्षाव केला आहे.

## अभिनेत्री छाया कदमचा पंढरपूर वारीतील व्हिडिओ व्हायरल



महाराष्ट्रात सध्या सर्वत्र वारीचा उत्साह पाहायला मिळत आहेत. या वारीमध्ये सामान्यापासून ते कलाकारांपर्यंत अनेकजण सहभागी होत आहेत. अनेक कलाकारांनी वारीमधील अनेक फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर केले आहेत. सध्या वारीचा आनंद चित्रपटसृष्टीतील कलाकार घेत आहेत. आता मराठमोळी अभिनेत्री छाया कदम ही पंढरीच्या वारीत गेली आहे. तिचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे. यापूर्वी अभिनेत्री सायली संजीव या पंढरीच्या वारीत गेली होती. ती पालखी सोहळ्यात सहभागी झाली होती. या वारीतील तिचे सोशल मीडियावर अनेक व्हिडिओ व्हायरल झाले होते. तिचे व्हिडिओ हे अनेकांना आवडले होते.

### छाया कदम भक्तीमध्ये तल्लीन..

- छाया कदमाचा हा व्हिडिओ अनेकांना पसंत आला आहे. व्हिडिओमध्ये छाया कदम पंढरीच्या वारीत भक्तीमध्ये तल्लीन असल्याची दिसत आहे. तिच्याबरोबर काही भक्त देखील पंढरीच्या वारीत विठ्ठलाचा जप करताना दिसत आहेत. या व्हिडिओच्या एका दृष्यात छाया कदम डान्स आणि वारकऱ्यांबरोबर फुगडी देखील घालताना दिसत आहे. वारीचा मंत्रमुग्ध करणारा अनुभव मराठमोळी अभिनेत्री छाया कदमने आपल्या सोशल मीडियावर शेअर केला आहे. व्हिडिओत छाया कदमने साडी नेसली आहे. तिने तिच्या केसात गजरा लावून डोक्यावर टिळा लागवला आहे. यामध्ये ती सुंदर दिसत आहे. तसेच व्हिडिओत छाया ही बांगड्या भरताना दिसत आहे.




### बुलढाणा

**एआरडी**

सितारे जमीन पर (यू/ए) (हिंदी) दुपारी २, सायंकाळी ५.३०, रात्री ९:१५

माँ (यू/ए) (हिंदी) दुपारी २:१५, सायंकाळी ५:४५

कन्नपा (यू/ए) (हिंदी) रात्री ९:००

### खामगाव

| | |
|---|---|
| श्री गजानन टॉकिज हाऊसफुल्ल | दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९ |
| सनी पॅलेस टॉकिज हाऊसफुल्ल | दुपारी १२, दु. ३, सायं. ६, रात्री ९ |

### जालना

**निलम टॉकीज**

हाऊसफुल ५ दु.१२.५, सायं.४, रा.९ वा. रात्री ९ :००, रा.८.५०, ९,३०

फायनल डेस्टिनेशन्स : दु. १२ : २० ; ३ : २०

थंडर बोल्ट : दुपारी १२ :००; सायंकाळी ६ : ००

**कृष्णा मल्टिप्लेक्स**

हाऊसफुल ५ दु.१२.५, सायं.४, रा.९ वा.

केसरी वीर : १२ :००; ६ :००

केसरी : ३ :१५; ९ :३०

चूक भूल माफ : १२ :००; २ :३०; ७ : ०५; ९ :३०

**रत्नदीप सिनेमा**

केसरी वीर : सकाळी ११ :४०; दुपारी २ : ५०, रात्री ९ :३०

### छत्रपती संभाजीनगर

**इनॉक्स प्रोझोन मॉल**

हाऊसफुल ५ स.११.१५, दु.३.३०, रात्री १०

ठग लाइफ स.५.४५

फायनल डेस्टिनेशन ब्लडलाईन्स (इंग्रजी) : सकाळी १०: १०, दुपारी ५ : ३०, सायंकाळी ८ : ००,

फायनल डेस्टिनेशन ब्लडलाईन्स (हिंदी) : दुपारी ३ : ००,

कराटे किड्स लिजंड्स : दुपारी १: २०, दुपारी ३ : ४५,

मिशन इम्पॉसिबल द फायनल रॉकींग (इंग्रजी): सकाळी ११ : ३०, सायंकाळी ६:३०, रात्री १०:००

### अकोला

| | | |
|---|---|---|
| मिराज | माँ | स. १०.००, दु. १.००, दु.४.००, साय.७.०० |
| मिराज | कन्नप्पा | सायं. ७.१५ |
| मिराज | सितारे जमिन पर | स. १०.००, दु.१२.१५ , १.१५,३.३०, ४.३०, सायं. ७.४५, रात्री १०.००, रात्री ११.०० |
| मानेक | माँ | दु. १२.३० , दु. ३.३०, सायं. ६.३०, रात्री ९.३० |
| वसंत | कन्नप्पा | दु. १२.३० , दु. ३.३०, सायं. ६.३०, रात्री ९.३० |
| न्यू रिगल | कुबेरा | दु. १२.०० , दु. ३.०५, सायं. ६.१०, रात्री ९.१५ |

## शेफाली जरीवालाच्या आकस्मिक मृत्यूचे गूढ वाढत चालले..



'कांटा लगा' फेम शेफाली जरीवालाच्या ४२ व्या वर्षी झालेल्या आकस्मिक मृत्यूचे गूढ अधिकच वाढत चालले आहे. पोलीस मृत्यूच्या कारणांचा तपास करत असतानाच, आता तिची जवळची मैत्रीण आणि अभिनेत्री पूजा घई हिने एक धक्कादायक खुलासा केला आहे. पूजाच्या म्हणण्यानुसार, शेफालीने मृत्यूच्या दिवशी चेहऱ्याशी संबंधित एक आयव्ही ड्रिप ट्रीटमेंट घेतली होती.

पोलिसांनी तिच्या पतीच्या हवाल्याने सांगितले की, घरी सत्यनारायण पूजेसाठी उपवास केल्यावर आणि फ्रिजमधील अन्न खाल्ल्यानंतर ती बेशुद्ध पडली होती, ज्यामुळे रक्तदाब कमी झाल्याची शक्यता वर्तवण्यात आली. शेफालीच्या घरातून अँटी-एजिंग गोळ्या सापडल्याच्या बातम्याही समोर आल्या होत्या.आयव्ही ड्रिपमुळे गूढ आणखी वाढले आता आयव्ही ड्रिपची माहिती समोर आल्याने, या ट्रीटमेंटचा तिच्या आरोग्यावर काही विपरीत परिणाम झाला का, या दिशेनेही पोलीस तपास करत आहेत. सध्या शेफालीच्या शवविच्छेदन अहवालाची प्रतीक्षा केली जात आहे, ज्यानंतरच मृत्यूचे खरे कारण स्पष्ट होईल. मात्र, तिच्या मैत्रिणीच्या नव्या खुलाशामुळे या प्रकरणाचे गूढ आणखी वाढले आहे.

### मैत्रिणीने केला मोठा खुलासा

शेफालीच्या मृत्यूनंतर अनेक तर्कवितर्क लावले जात आहेत. आता तिची मैत्रीण पूजा घई हिने एका मुलाखतीत सांगितले की, मृत्यूच्या दिवशी शेफालीने आपल्या चेहऱ्यासाठी एक आयव्ही ड्रिप घेतली होती, ज्यामध्ये व्हिटॅमिन सी समाविष्ट होते. पूजा म्हणाली, 'त्या दिवशी तिने ड्रिप आणि व्हिटॅमिन सी घेतले होते. ही एक खूप सामान्य गोष्ट आहे. कोविडनंतर आपल्यापैकी अनेकजण नियमितपणे व्हिटॅमिन सी घेतात.' पूजा पुढे म्हणाली की, जेव्हा ती शेफालीच्या घरी होती, तेव्हा पोलिसांनी त्या व्यक्तीला चौकशीसाठी बोलावले होते ज्याने शेफालीला ही ड्रिप दिली होती. पूजा म्हणाली, 'मी तिथेच उभी होते, जेव्हा पोलिसांनी त्या व्यक्तीला बोलावून ड्रिपमध्ये कोणते औषध होते याची माहिती घेतली. तेव्हाच ही गोष्ट समोर आली. 'तपासात समोर आले अनेक अँगल सुरुवातीला शेफालीच्या मृत्यूचे कारण कार्डिअॅक अरेस्ट असल्याचे सांगण्यात आले.